
# शब्द रुची

एप्रिल २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे ५६



पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे

# 'चेकपॉईंट चार्ली' पुस्तक प्रकाशन



डॉ. अनिल अवचट



मंगला गोडबोले



सुमित्रा भावे



डॉ. माधवी मेहेंदळे



पुस्तकातील उताऱ्याचे वाचन करताना गौरी लागू



सूत्रसंचालन संजय डोळे



डॉ. माधवी मेहेंदळे लिखित 'चेकपाईन्ट चार्ली' या पुस्तक प्रकाशनसमयी धनश्री धारप, मंगला गोडबोले, डॉ. माधवी मेहेंदळे, डॉ. अनिल अवचट आणि सुमित्रा भावे

४२

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

एप्रिल २०१६, वर्ष तिसरे
अंक बारावा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अभ्यागत संपादक : आल्हाद गोडबोले

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय...

डोंगरमाथ्यावरून ओघळणारे पाणी वळणे घेत धावत सुटते, तशा स्वाभाविक झोकदार रंग-रेखांनी सजलेले चित्र पाहायला मिळाले की, कोपऱ्यातली चित्रकाराची सही पहायची गरजही पडत नसे. दीनानाथ दलाल हे त्यांचे नाव. जन्म ३० मे १९१६ चा. म्हणजे हे त्यांचे शताब्दी वर्ष. स्वातंत्र्योत्तर दोन तपांच्या कालावधीत महाराष्ट्रीय जनमानसांत दलाल यांना जे स्थान होते, तसे त्यापूर्वी फक्त राजा रविवर्मा यांना लाभले होते. या दोघांनी चित्रकलेच्या सार्वत्रिकीकरणासाठी केलेले प्रयत्न हे, त्यांच्या एकेकट्या चित्राच्या गुणवत्तेपेक्षा कैकपटीनं महत्त्वाचे ठरतात. दलाल यांना हा लौकिक लाभण्याचे कारण त्यांनी मुहूर्तमेढ रोवलेला 'दीपावली' हा दिवाळी अंक. दलाल यांना जाऊन ४५ वर्षे उलटली, पण आजही हा अंक दलाल यांचा म्हणूनच ओळखला जातो. साहित्याच्या प्रांतात चित्रकाराने आपला ठसा उमटवावा, ही दोन्ही कला-विश्वाच्या रसिकांना विशेष भावणारी बाब. दलाल यांच्या शताब्दीनिमित्ताने त्यांचे स्मरण करताना त्यांचा हाच वारसा वेगळ्या रूपात चालविलेल्या 'चिन्ह'कार सतीश नाईक यांना त्यांचा 'अक्षर-प्रवास' कागदावर उतरविण्यास सुचविले आणि दलाल यांच्या 'शृंगार-नायिका' अत्यंत देखण्या रूपात आणलेल्या रोहन प्रकाशनाच्या ग्रंथाकडे महेंद्र दामले यांचे लक्ष वेधले. 'दलाल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रुचीचा अंक काढणार आहोत. तुझ्या लेखी चित्रकलेतल्या दलालांपेक्षा दीनानाथ दलालांचे मोठेपण कोणते?' अशा तिरकस प्रश्नाला अभिजित ताम्हणे याने लेखाच्या रूपात दिलेले उत्तर चोख असेच आहे.

अस्सल भारतीय स्त्रीचे, किंबहुना भारतीय नायक-नायिकांचे, मॉडिल चित्रकलेत उभे करणारे दलाल, साहित्याच्या प्रांतात ज्यांच्या प्रतिभेला बहर आला, फुलला ते दलाल आणि सतीश नाईकसारख्या तरुणाला 'चिन्ह'सारखी अफलातून मुद्रा अक्षरवाङ्मयावर उमटविण्याची प्रेरणा ठरणारे दलाल असा हा तिहेरी वेध, म्हणजे या महान चित्रकाराला केलेला सलाम आहे!

**– आल्हाद गोडबोले**
भ्रमणध्वनी – ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com

अनुक्रमणिका

**दलाल : रविवर्म्यानंतरचे श्रेष्ठ चित्रोद्यमी** – अभिजित ताम्हणे / ४
**शृंगार नायिका : एक समकालीन उत्सव!** – महेंद्र दामले / ८
**आलो येथवरी हा असा!** – सतीश नाईक / १०
**एक सहवास आठवणीतला** – राम देशपांडे / ३६
**अमेरिकेचं छिद्रान्वित परराष्ट्रधोरण** – डॉ. अनंत पां. लाभसेटवार / ३८
**माझं लडाख** – आत्माराम परब, नरेंद्र प्रभू / ४२
**पद्मगंधा प्रकाशन, रोहन प्रकाशन, मौज प्रकाशन, साधना प्रकाशन** / ४६
**'ग्रंथाली' परिक्षणे** – चांगदेव काळे / ५२

**अपरिहार्य कारणास्तव 'तत्त्वमंथन' हे सदर या अंकात प्रसिद्ध होऊ शकले नाही.**

# दलाल : रविवर्म्यानंतरचे श्रेष्ठ चित्रोद्यमी

अभिजित ताम्हाणे



(चित्र सौजन्य : सुमंत जोगदंड)

***आवरणचित्रं असोत की 'दीपावली' अंकाच्या मधली चित्रं असोत की पुस्तकातली रेखाचित्रं... भावदर्शन हे चित्रकार म्हणून आपलं कर्तव्य आहे, हे पथ्य दलालांनी पाळलं आणि लोकांनीही त्यासाठी दलाल यांना नावाजलं. मात्र यापलीकडे, शैली सांभाळण्याच्या फंदात दलाल पडले नाहीत.***

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला आणि विसावं शतक उजाडत असताना, साधारण १८७५ ते १९०५ या काळात राजा रविवर्मा यांचं जे स्थान महाराष्ट्रीय जनमानसात होतं तेच चित्रकार दीनानाथ दलाल यांचं १९४० ते १९७०च्या दशकात (विसाव्या शतकाच्या मध्यकाळात) होतं आणि इतिहासात राहील, हे निर्विवाद. दोघेही काळाच्या पुढे होते, हेसुद्धा निर्विवाद तथ्यच आहे. मात्र, आधीच्या काळात रविवर्मा यांनी किंवा पुढे दीनानाथ दलालांनी जी 'चित्रोद्यमा'ची वाट निवडली, ती निवडण्याऐवजी जर ते पूर्णवेळ केवळ ललितकलेकडे, केवळ स्वान्तसुखाय निर्मितीकडे वळले असते तर भारतीय चित्रकलेत नक्कीच काहीतरी महत्त्वाची भर ते घालू शकले असते, असंही विधान अनेकदा जाणकारांनी केलं आहे. या तीन्ही विधानांची चर्चा पुन्हा उभी करणं, एवढाच या मजकुराचा हेतू आहे.

या एवढ्या दोनच मुद्यांवर हे टिपण केंद्रित आहे. त्या विधानांची चर्चा ही दलाल किंवा रविवर्मा यांना आपले 'लेख-नायक' मानून त्यांच्यापुरतीच करण्याऐवजी, भारतीय चित्रकलेचा इतिहास लक्षात घेऊन केली असता ती अधिक वस्तुनिष्ठ होईल, असा विश्वास आहे. अर्थात हा लेखच असून विद्यापीठीय निबंध नाही. त्यामुळे मोजक्याच मुद्यांवर पण भरपूर दृश्य-संदर्भांची वळणं घेत हा प्रवास होईल.

अशा अक्षुण्ण महत्तेचा दलालांच्या आधीचा एकमेव चित्रकार म्हणजे राजा रविवर्मा. युरोपीय पद्धती आणि भारतीय आशय यांचा मिलाफ घडवण्याचं महत्कार्य रविवर्मा यांनी केलं नसतं, तर 'भारतीय चित्रकला' निराळी आणि 'भारतीय माणसांची इंग्रजी' यथातथ्य व्यक्तिचित्रं निराळी, असा प्रकार पाहायला मिळाला असता. रविवर्मा यांचा मृत्यू सन १९०६ मध्ये झाला. तोवर भारतात पाश्चात्य चित्रकला शिक्षण सुरू झालं होतं खरं, पण ती शिक्षणपद्धती काय होती? तिथंही मेकॉलेवादच होता. ब्रिटिशांनी इथे बांधलेल्या इमारती सजवण्यासाठी 'पाश्चात्त्य पद्धतीची भित्तिशिल्पं घडवणारे भारतीय कारागीर' ब्रिटिशांना या कलाशाळांच्या उभारणीतून मिळाले होते. आजच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टर्सचे तेव्हाचे पेंटिंग विभागप्रमुख जॉन ग्रिफिथ्स यांनी अजिंठ्याच्या चित्रांचा त्यांच्यापरीनं पुनरुद्धार (रविवर्मा यांच्या हयातीत, १८७२ ते १८८५ या बारा वर्षांत) केला. तोही; ही भारतीय कला आहे, हे टिकवायचं आहे, जे दिसतं आहे त्याची यथातथ्य नक्कल आधी करायची आणि मग मूळ चित्र कसं असेल हे लक्षात घेऊन मग मूळ गुहाचित्रांवर, त्यांतून उडालेला रंग जशाच्या तशा पद्धतीनं लावायचा, अशा प्रकारे झाला होता. या भारतीय शैली-जतनाला 'जे.जे.'मध्ये रीतसर अधिष्ठान मिळालं, ते १९२६ नंतर- जगन्नाथ अहिवासी यांच्या काळात, म्हणजे राजकीयदृष्ट्या, 'स्वदेशी'च्या गांधीयुगात. हा 'अहिवासी गुरुजींचा भारतीय कला' वर्ग स्थिरावलेला असताना आणि दुसरीकडे, जी. एस. दंडवतीमठ यांच्या नूतन कला मंदिरात अहिवासी यांच्यापेक्षा निराळं भारतीयत्व जपण्याचा प्रयत्न सुरू असताना दलाल हे मुंबईत विद्यार्थी होते. दलालांचं कलाशिक्षण १९३६ साली पूर्ण झालं, तर एस. एम. पंडित (यांचाही जन्म दलालांप्रमाणेच १९१६ सालचा) हे नूतन कला मंदिरात साधारण त्याच वेळी शिकले. तोवर 'भारतीयते'ची रविवर्म्यापेक्षा आणि अहिवासींच्या वर्गाने जी (लघुचित्राधारित) भारतीयतेची घडी घालून दिली तिच्यापेक्षाही निराळी- अनेकदा आपापली- वाट अनेक चित्रकार शोधू लागले होते. या चित्रकारांना भारतीय रेषेचे गोलाईदार लालित्य हवे होते, सौष्ठवपूर्ण सौंदर्याच्या (विशेषत: स्त्री-सौंदर्याच्या) त्यांच्या कल्पना भारतीय शिल्पकलेपासून ते रविवर्मा येथवरच्या कलेने घडलेल्या होत्या, त्यांना 'भारतीय लोकजीवना'तले विषय खुणावू लागले होते

आणि हे विषय मांडताना पाश्चात्त्य यथातथ्यवाद नको अशी या चित्रकारांची धारणा होती, असे साधारण १९३५ ते १९४५ पर्यंतची डी. सी. जोगळेकर, के. के. हेब्बर, ए. ए. आलमेलकर यांची चित्रे पाहिल्यास लक्षात येते. विशेषत: जोगळेकर यांच्या 'नूरजहां व जहांगीर' या चित्रात वस्त्रे अगदी लघुचित्रांबरहुकूम, पार्श्वभूमी' आणि 'पुरोभूमी' यांतील फरक लघुचित्रांसारखाच ठसठशीत, परंतु या चित्रातील (बेगम, बादशहा, बागेतील वाटेचा कठडा आणि त्यापुढली फुलझाडे व मोठी झाडे, आकाश या साऱ्या) घटकांचे रंगकाम आणि चित्रण (रेंडरिंग आणि ड्रॉइंग) पाश्चात्त्य शिक्षणानुसार- असा मिलाफ दिसतो. भारतीयता ही शैली म्हणून दिसायला हवी, हा आग्रह या सर्वांचाच होता. पण याच काळात पाश्चात्त्य आधुनिकतावादी कलेच्या प्रस्फोटात एकेक चित्रकार त्याच्या-त्याच्या शैलीसाठी ओळखला जातो आहे, शैली ही 'स्कूल' नसून इंडिव्हिज्युअल स्टाइल (व्यक्तित्वठसा या अर्थानं)' होते आहे, असं दिसू लागलं होतं. त्याहीनंतर पुढे भारतीय आधुनिकतावादी कलेचे वारे १९४७ पासूनच वाहू लागले, त्याबद्दल भारतीय आधुनिकतावादाच्या मुंबईतल्या वाटचालीचे (मुंबईकर) अभ्यासक मॉर्टिमर चटर्जी यांनी अलीकडेच लिहिलं आहे- 'राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर कलेतल्या भारतीयतेची चर्चा मागे सरू लागली; कारण भारतीयता जपणं हे पाश्चात्त्यांना विरोध करण्याचं एक साधन होतं... आता यापुढे विरोध का करायचा?'. ही विधानं साकल्यानं पाहिली असता पटण्याजोगीही आहेत. यानंतरची 'भारतीय चित्रं' उरली, ती जनप्रिय चित्रं म्हणून. या प्रांतात एस. एम. पंडित, रघुवीर मुळगावकर आणि दीनानाथ दलाल यांची छाप राहिली. पंडित यांनी जी रंगचित्रं केली, ती रविवर्म्याच्या पौराणिक चित्रांसारखी 'थीमॅटिक कॉम्पोझिशन्स' आहेत- प्रसंगाधिष्ठित रचनाचित्रं. पण पंडित हे त्या चित्रांत एकाच बाजूनं प्रकाश आणतात, कधी 'रेम्ब्रॉं लाइट'प्रमाणे मागूनही चित्रविषय प्रकाशमान करून चेहऱ्याच्या किंवा केसांच्या कडेला जांभळी छटा देतात... मुळगावकर रंगचित्रांतही गोडगुलाबीच राहून फिक्या रंगसंगतीनं प्रासादिकतेचा अनुभव देतात, असे काही व्यक्तित्वठसे आपल्याकडेही तयार झाले.

यापेक्षा रविवर्मा वेगळे, याचं कारण त्यांना मिळालेला पहिलेपणाचा अपरंपार फायदा. आणि दलालसुद्धा वेगळे, याचं कारण त्यांनी शैलीचा बडिवार (दोन्ही अर्थांनी) माजवला नाही. दलालांच्या ब्रशची जाडबारीक रेषा किंवा मानवाकृतींचं (विशेषत: कथासंग्रह-कादंबऱ्या यांच्या आवरणचित्रांमधले तरुण, तरुणी) देहसौष्ठव हे आज कुणालाही चटकन आठवेल आणि त्या अर्थानं तो दलालांचा व्यक्तित्वठसाच ठरेल. पण सौष्ठव शोधणारी ही 'दलाल-शैली' त्या देहधारी पात्रांचे डोळेदेखील प्रसंगानुरूप दाखवण्यास सिद्ध असे. आवरणचित्रं असोत की 'दीपावली' अंकाच्या मधली चित्रं असोत की पुस्तकातली रेखाचित्रं... भावदर्शन हे चित्रकार म्हणून आपलं कर्तव्य आहे, हे पथ्य दलालांनी पाळलं आणि लोकांनीही त्यासाठी दलाल यांना नावाजलं. मात्र




**साहित्यव्यवहाराशी असेला संबंध वाढवणं, हा दीपावली अंक सुरू करण्याच्या दलालांच्या निर्णयाचा एक कारक घटक असावा, असं म्हणायला जागा आहे. साहित्यव्यवहाराशी कोणाही तत्कालीन चित्रकारांपेक्षा अधिक संबंध दलालांचा होता. तो जपणं, हा दलाल यांच्या आवडीचा भाग असेल; परंतु त्यांचा 'चित्रोद्यम' त्यामुळे फुलला, बहरला हे नाकारता येणार नाही.**

यापलीकडे, शैली सांभाळण्याच्या फंदात दलाल पडले नाहीत. छत्रपतींच्या राज्याभिषेकाचं चित्र वेगळं आणि 'स्नान करणाऱ्या स्त्रिया' आणखी वेगळं आणि काश्मीरमध्ये तांबुसपिवळ्या चिनार वृक्षांखालून शिकारा वल्हवत जाणाऱ्या स्त्रीचं आणखी वेगळं!

शिळाप्रेसचं - म्हणजे लिथोग्राफीचं तंत्र रविवर्मा यांनी शिकून घेतलं. मळवलीस स्वत:चा छापखाना काढला. दलालांनी 'टू कलर'चं तंत्र अवगत करून घेतलं आणि उठावदार चित्रं केली. दीपावली' हे वार्षिक १९४५ पासूनच सुरू झाल्यामुळे छपाईतंत्राशी दलालांचा असलेला संबंध अधिकच घट्ट झाला आणि ते या क्षेत्रातील अनेकांना दीपस्तंभासारखे वाटू लागले. साहित्य-व्यवहाराशी असेला संबंध वाढवणं, हा दीपावली अंक सुरू करण्याच्या दलालांच्या निर्णयाचा एक कारक घटक असावा, असं म्हणायला जागा आहे. साहित्यव्यवहाराशी कोणाही तत्कालीन चित्रकारांपेक्षा अधिक संबंध दलालांचा होता. तो जपणं, हा दलाल यांच्या आवडीचा भाग असेल; परंतु त्यांचा 'चित्रोद्यम' त्यामुळे फुलला, बहरला हे नाकारता येणार नाही.

'राजा रविवर्मा : द फर्स्ट इंडियन आंत्रप्रेन्यूर- आर्टिस्ट' असा अभ्यासू निबंध पार्थ मित्तर यांनी लिहिला आहे. हा चित्रोद्यम रविवर्मा यांनी केवळ संस्थानिक, श्रीमंत व्यक्ती यांसारखे आश्रयदाते मिळवून वाढवला नव्हता तर मध्यमवर्गीयांसाठी शिळाप्रेसवरली चित्रं

उपलब्ध करून देऊन चित्रव्यवहाराचा परीघ वाढवण्याची उद्यमशीलता रविवर्मा यांनी दाखवली, असं मित्तर यांचं म्हणणं आहे. हेच दलाल यांच्या 'दीपावली'बद्दल म्हणता येतं.

'स्वान्तसुखाय चित्रं' हा मुद्दा रविवर्मा यांच्याबाबतीत खरं तर फारसा लागू होत नाही. लक्ष्मी आणि सरस्वती यांच्या रविवर्माकृत शिळाप्रेस आवृत्त्या आणि बडोदे येथील गायकवाड संग्रहालयातील लक्ष्मी/सरस्वती यांची मूळ तैलचित्रं, यांत भरपूर फरक आहे. शिळाप्रेसवर तडजोड आहेच. पण दलालांनी आधी संभाव्य तडजोडींचा अभ्यास करून, त्यावर मात करणारं तंत्रच विकसित केलं असल्यानं, छापील चित्रांची मूळ आर्टवर्क असलेली चित्रं पाहतानाही दर्जात फरक पडत नाही. याखेरीज जी चित्रं प्रदर्शनांत पाठवण्यासाठी कॅनव्हासवर किंवा माउंट बोर्डसारख्या जाड पृष्ठभागावर दलालांनी केली आहेत, त्या चित्रांतल्या रंगलेपनात आर्टवर्कसारखं रंगांचं सुलभीकरण नाही. या चित्रांमध्ये रंगछटा भरपूर आहेत. रंग लावण्याची पद्धत मात्र जाड थर लावणारी नाही. काही चित्रांमध्ये तर रंगांचे पातळ थर एकमेकांवर देऊन मिश्ररंगाचा परिणाम साधणं, असा प्रकारही शोधता येतो. मात्र ठसठशीत फरक दिसतो तो, मानवाकृतीच्या चित्रणासंदर्भात. स्त्रीदेहाचं जे सौष्ठव मुखपृष्ठांसाठी दलाल यांनी जपलं, ते कॅनव्हास वा बोर्डवरल्या रंगचित्रांमध्ये अगदी अपवादानंच दिसतं. इथं मकबूल फिदा हुसेन यांची आठवण मुद्दाम काढायला हवी. हुसेन यांनी स्वतःच्या चित्रांतल्या मानवाकृतींची- किंवा कुठल्याही आकृतींची एक बाह्यरेषाधारित पद्धत जपली होती. भरपूर संख्येनं चित्रं करणाऱ्या भारतीय चित्रकारांपैकी हुसेन यांचं नाव आज त्यांच्या मृत्यूनंतर इतक्या वर्षांनीही वरचंच ठरेल. ठरीव-ठाशीव आकृतीकरण (फिगरेशन) हे संख्यावाढीसाठी नेहमीच उपयोगी पडतं असं हुसेन यांच्या उदाहरणातून जर ध्यानी घ्यायचं, तर दलाल यांनी आवरणचित्रांसाठी वापरलेलं आकृतीकरण हे केवळ कॅनव्हासवर नाही म्हणून कमअस्सल कसं ठरवणार? असो.

स्पर्धात्मक कलाप्रदर्शनं हा स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भारतातल्या कलाक्षेत्राचा एक महत्त्वाचा आविष्कार ठरला होता. त्या प्रदर्शनांची रया १९८० च्या दशकापासून हळूहळू लयाला जात चालली आणि आता तर अशा प्रदर्शनांना कोणी विचारतही नाही हे खरं असलं, तरी १९६० च्या दशकापर्यंत या प्रदर्शनांची शान नक्कीच कायम होती. आज 'बिएनाले'साठी चित्राची निवड होणं किंवा 'आर्ट फेअर'मध्ये स्वतंत्र प्रोजेक्ट मिळणं हे दृश्यकलावंतांना जितकं सुखावणारं आहे, तितकं सुख त्या काळी स्पर्धात्मक कलाप्रदर्शनांमधल्या बक्षिसात होतं. अशी १३ बक्षिसं दलाल यांनी मिळवली आहेत. तीही, 'कमर्शिअल आर्ट' अशी निराळी श्रेणी बक्षिसपात्र मानली जात नसताना... म्हणजे अन्य सर्व 'स्वान्तसुखाय' चित्रांवर मात करून! बॉम्बे आर्ट सोसायटीची विविध पारितोषिकं यांत आहेतच, पण अमृतसरचंही मेडल आहे.

तरीही, दलाल 'निव्वळ चित्रकार' असायला हवे होते, अशी सदिच्छा बोलून दाखवलेल्यांची संख्या कमी नाही. साधारण १९५० ते ७० या काळातल्या अन्य 'कोणाही चित्रकारानं ललितकलेत तसं यश मिळवलेलं नाही, जसं दलालांनी व्यावसायिक मानल्या जाणाऱ्या कलेत मिळवलं होतं' असं एक निरीक्षण या सदिच्छेमागे असूही शकेल. पण या काळातले एफ. एन. सूझा हेही महानच चित्रकार होते, त्यांना आपणा भारतीयांनी मात्र 'पिकासोची नक्कल' म्हणून हिणवलं, हे दलालांच्या बऱ्याच चाहत्यांना कळत नाही आणि ज्यांना कळतं त्यांना दलालांचं कौतुक करण्यापुढे सूझा वगैरे विषयांतर वाटतं. चित्रांचं सार्वत्रिकीकरण करणं, हीदेखील दलाल यांची प्रतिभाच आहे आणि ती प्रतिभा फुलवताना दलाल यांनी साहित्यविश्वाची सोबत घेतली होती, हे मान्य करायला कचरणं म्हणजे चित्र-प्रतिभेवर 'पावित्र्या'ची बंधनं लादणं आहे. 'केवळ स्वान्तसुखाय रंगचित्र करायचं तर विषय कोणता?' हे दलालांच्या अनेक समकालीनांपुढलं कोडं होतं. त्या काळातले अनेक नावाजलेले चित्रकार वयाच्या पंचेचाळिशी-पन्नाशीनंतर एकसुरी झालेले दिसतात, ते याचमुळे. याउलट दलाल यांनी अनेक साहित्यिकांचाही विषय शोधून तो दृश्यमान करून दिला. छपाईतंत्रात जमतील तेवढेच का होईना, पण दलाल प्रयोग करत राहिले आणि सवडीसवडीनं नवनवीन रेखनपद्धती, रंगपद्धती आपल्या चित्रांत आणत राहिले. दलालांनी केलेल्या फक्त व्यक्तिचित्रांचंच कौतुक केल्यामुळे कुणाचं अभिजात कलाप्रेम सिद्ध होईल असं कृपया मानू नये, कारण या व्यक्तिचित्रणात वापरली गेलेली तंत्रं दलालांनी अन्यत्रही वापरली आहेत, ती आपण आपल्या डोळ्यांनी शोधणं ही दलाल समजून घेण्याची सुरुवात ठरेल.

'व्यावसायिक' आणि 'बिगरव्यावसायिक' असा फरक आपल्या देशात कलेच्या अर्थकारणामुळेच अधिक वेळा झाला. मात्र या व्यवसायावलंबी अर्थकारणातूनही कलेला सकारात्मक दिशा देणारे फार, फार थोडे चित्रकार होते. नावंच घ्यायची तर रविवर्मा, एम. आर. आचरेकर, एस. एम. पंडित, दीनानाथ दलाल, रघुवीर मुळगावकर (यापैकी पंडितांची जन्मशताब्दी सध्या सुरू असून मुळगावकरांची २०१८ मध्ये येते) ही नक्कीच घेता येतील. या सर्वांमध्ये एक समान सूत्र असं की, 'व्यावसायिक' आणि 'बिगरव्यावसायिक' अशी दुविधा त्यांच्या एकंदर सौंदर्यदृष्टीच्या विकासात नव्हती. मात्र रविवर्मा आणि दलाल या दोघांनी उपलब्ध साधनांतून आपापल्या सौंदर्यदृष्टीचा परीघ अधिक वेगाने वाढवला, असं त्यांची एकंदर कलानिर्मिती पाहिल्यास लक्षात येईल. उद्यमशीलता दाखवून लोकांपर्यंत पोहोचण्याच्या वाटा रविवर्मा आणि दलाल यांनी आखल्या, हेही मोलाचं आहे. दलाल हे निर्विवादपणे रविवर्म्यानंतरचे श्रेष्ठ चित्रोद्यमी ठरतात आणि या दोघांनी चित्रकलेच्या सार्वत्रिकीकरणासाठी केलेले प्रयत्न हे, त्यांच्या एकेकट्या चित्राच्या गुणवत्तेपेक्षा कैकपटीनं महत्त्वाचे ठरतात.

**अभिजित ताम्हाणे**
भ्रमणध्वनी : ९८२११९७८१७, ९८९२३९७३२१
abhicrit@gmail.com


रोहन प्रकाशन

# सुट्टीसाठी खास खजिना


किशोरवयीन मुला-मुलींच्या वाचनासाठी खास पुस्तकं

किशोर वाचन


मुलांचं 'विज्ञान-विश्व' वाढवणारी आणि मनोरंजन करणारी काही पुस्तकं...




किं.रु.२०० (१९६ पानं)




किं.रु.१०० (१३२ पानं)





किं.रु.२४० (२८४ पानं)

सत्यजित रे लिखित

फॅन्टॅस्टिक फेलूदा

पुन्हा आपल्या भेटीला...
नवी पुस्तकं, नव्या कथा,
नवा गोल्डन सेट!




अनुवाद
**अशोक जैन**

या पूर्वीचे सेटस् :
- **१२ पुस्तकांचा** रेड सेट रू. ७८०
- **६ पुस्तकांचा** ग्रीन/ब्लू सेट रू.३९०
- **४ पुस्तकांचा** ब्लॅक सेट रू. ४००
- **सुटी पुस्तकेही उपलब्ध**

विशेष २५% सवलत

१५ जून... अर्थात सुट्टी संपेपर्यंत विशेष ऑफर

रोहन प्रकाशन
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com



# शृंगार नायिका : एक समकालीन उत्सव!

**महेंद्र दामले**

**'शृंगार-नायिका'चा दृश्यपरिणाम वाचकाला विषयप्रवेश करायला मदत करतो. पुस्तकाचा विषय हा मध्यमवर्गीय, पांढरपेशा मानसिकतेत दुर्लक्षित होणारा, नाकारला जाणारा! कारण शृंगार हा रस व्यक्तिगत, खाजगीत अनुभवायची गोष्ट असं मानणारी ही मानसिकता. दलालांच्या चित्रकलेने या मानसिकतेतला अवघडलेपणा कमी केला व तो सुद्धा अगदी अलगद, नकळत!**

चित्रकार दीनानाथ दलाल यांचं मराठी साहित्याला एक चित्रकार व प्रकाशन या दोन्ही रूपांत मोठं योगदान आहे. २०१५ हे दीनानाथ दलालांचे जन्मशताब्दी वर्ष! त्यानिमित्ताने नेहरू सेंटर आर्ट गॅलरी (मुंबई) येथे, त्याच आर्ट गॅलरीच्या वतीने एक अतिशय देखणे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याच प्रदर्शनाच्या प्रसंगी, १९५५ साली, दलाल आर्ट स्टुडिओतर्फे प्रकाशित करण्यात आलेले 'शृंगार नायिका' हे पुस्तक पुन्हा प्रकाशित करण्यात आले.

पुन:प्रकाशित करताना, जुनं पुस्तक त्याच्या आशय-चित्रं आदींसह छापणे अशी अपेक्षा असते. सर. ज.जी. कला महाविद्यालयाच्या ग्रंथालयात हे पुस्तक पूर्वी पाहिलं असल्याने मला या पुनर्प्रकाशनाबाबत उत्सुकता होती. रोहन प्रकाशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकाने आनंदाचा एक धक्का दिला. कारण पुन:प्रकाशन करताना त्यात अनेक गोष्टींची भर घातलेली आहे. लेखक स.आ. जोगळेकर यांनी केलेलं लिखाण इंग्रजी भाषेत भाषांतरित करून (म्हणजे अगदी संस्कृत भाषेतील श्लोक, सुभाषिते सुद्धा) पुस्तक मराठी व इंग्रजी भाषेत, क्रमवार वाचकांसमोर मांडलं आहे. अत्यंत अर्थपूर्ण इंग्रजी भाषांतराकरता गायत्री पगडी यांचं अभिनंदन करायला हवं. द्विभाषिक स्वरूपामुळे ह्या पुस्तकातील देखणा आशय मराठी वाचकांपलीकडे पोहोचण्यास मदत होईल.

पुस्तकाचं स्वरूप हे ज्याला 'कॉफी टेबल बुक' म्हणतात त्या स्वरूपाचं वाटतं त्यामुळे याला कोणी गांभीर्याने पाहणार नाही. पण इथेच वाचक चूक करतील, कारण हे मजेत वेळ घालवण्याकरता, मनोरंजनाकरता प्रकाशित केलेलं पुस्तक नाही. जोगळेकरांचं अभ्यासपूर्ण लिखाण व दलालांनी त्यास चढवलेला साज या दोन्ही अंगांचं एक प्रकारे पुनर्मूल्यांकन करून, त्याची समकालीन स्वरूपात मांडणी केल्यामुळे तसं वाटणं साहजिक आहे. पण पुस्तकाचं पुनर्प्रकाशित रूप हे या दोन्ही निर्मात्यांचं काम 'साजरं' करण्याच्या प्रयत्नातून तयार झालेलं आहे. याकरता रोहन प्रकाशन (प्रदीप चंपानेरकर) तसंच कारण रावत (क्रिएटिव्ह डायरेक्टर-ऑटम विंटर कम्युनिकेशन्स् आणि डिझाईन्स (मुंबई) व नरेश बर्डे (आर्ट डायरेक्टर) यांच्या कामास दाद द्यायला हवी. दलालांची पुस्तकं, त्यांच्या चित्रांमुळे दृश्य पातळीवर आशयाला काही प्रमाणात दडपून टाकतात, पण पुनर्प्रकाशित रूपात दृश्य व भाषिक आशय यांच्यामध्ये अतिशय सुंदर असा समतोल साधला गेला आहे.

पुनर्प्रकाशित करताना दलालांच्या चित्रकलेची अत्यंत आकर्षक अशी मांडणी पुस्तकात केली आहे. मूळ पुस्तकातील पानभर पसरलेली रंगीत चित्रं अत्यंत आकर्षक अशा चित्रचौकटी, फ्रेम्ससह सादर करण्यात आली आहेत आणि संपूर्ण पुस्तकभर दलालांची ड्रॉईंग्ज, स्केचेस, जी मुख्यत्वे कृष्णधवल आहेत, ती त्यांच्या जुन्या, पिवळेपणा मिळालेल्या कागदासह मांडली आहेत. जी वाचकाला भूतकाळात अगदी सहजपणे घेऊन जातात. बऱ्याचशा स्केचेसमध्ये, दलालांनी केलेल्या नोंदी, पेन्सिलीतली रेखाटनं आदी पाहायला मिळतील. आणि या रेखाटनांतून जन्माला आलेली रंगीत चित्रं असा चित्रनिर्मिती प्रवास सहज अनुभवता येईल. याखेरीज शृंगाराची साधने, फुलं, पानं-विडा, मनोहर असे दागिने, आरसे, कुंकवाचे करंडे, दागिन्यांच्या आणि आरशांच्या पेट्या आदींचाही डिझायनर्सनी भरपूर वापर केला आहे. या सर्वांची मांडणी अशा अर्थीचा परिणाम साधते की दलालांच्या रेखाटनांतील, चित्रांतील नायिका-नायक जणू काही जिवंत होऊन या वस्तू वापरून निघून गेले आहेत. ज्या कारणाने त्या वस्तू पुस्तकभर पसरल्या आहेत. परिणामी पुस्तकाची मांडणी, वाचकाच्या मनात शृंगाराशी संबंधित स्थायीभाव निर्माण करण्यात यशस्वी झाला आहे. पुस्तक पाहता क्षणी एक विशिष्ट मनोवस्था निर्माण करण्यात ही मांडणी यशस्वी होते. अर्थातच काही वाचकांना फुलं, दागिने,

चित्रचौकटी आदींचा वापर हा फारच लोकप्रिय अभिव्यक्तीचा भाग वाटून खटकेल. पण ते असो.

पुस्तकाचा दृश्यपरिणाम वाचकाला विषयप्रवेश करायला मदत करतो. पुस्तकाचा विषय हा मध्यमवर्गीय, पांढरपेशा मानसिकतेत दुर्लक्षित होणारा, नाकारला जाणारा! कारण शृंगार हा रस व्यक्तिगत, खाजगीत अनुभवायची गोष्ट असं मानणारी ही मानसिकता. दलालांच्या चित्रकलेने या मानसिकतेतला अवघडलेपणा कमी केला व तो सुद्धा अगदी अलगद, नकळत!

प्रेम ही भावना, शृंगाररस, कामजीवन या गोष्टींकडे केवळ नैतिकतेच्या चष्म्यातून न पाहता, त्यातील तपशील- जे प्राचीन साहित्यामध्ये विस्तृतपणे चर्चिले आहेत- अशा भाषिक तपशीलांमुळे तयार होण्याच्या मानसिक कल्पनांना, चित्रांना, दलालांनी भौतिक रूप दिलं. परिणामी दलालांच्या चित्रांमुळे भावनिक, शारीरिक जीवनाच्या अनेक अंगांचं 'दर्शन' वाचकाला झालं. परिणामी अवघडलेपणा कमी होऊन, त्यांचा आनंद घेणे, त्याबद्दल आत्मभान निर्माण होणे ही गोष्ट मराठी वाचकवर्ग, समाजात झाली. त्याचा पुन:प्रत्यय हे पुस्तक पाहताना येतो.

पुस्तकात नायिकांना केंद्रस्थानी ठेवून, प्रेम व शृंगार यांच्या अनेक छटा, वयोमानानुसार त्यात होणारे फरक, निसर्गातील फेरबदल, जीवनातील प्रसंग, त्यानुसार असणारी मानसिकता, त्यांच्या विशिष्ट भावावस्था, त्यांचे नायक, नायिकांच्या कृती, त्यांची शारीरिक लक्षणं, त्यांना दिलेल्या उपमा आदींची अत्यंत तपशीलवार चर्चा आहे. त्या अर्थी हा शृंगार नायिका कोश वाचकांना उपयुक्त ठरेल. हे सर्व तपशील कामसूत्र, अनंगरंग, नागरसर्वस्व, रतिरहस्य, पंचसायक, नाट्यशास्त्र, दशरूपक, प्रतापरूद्रीय, रसमंजरी, शृंगारतिलक, शृंगार प्रकाश, शृंगार मंजरी, साहित्यदर्पण व गाथा सप्तशती आदी ग्रंथांच्या संदर्भातून तयार झाले आहेत. इतक्या मोठ्या संदर्भातून कामशास्त्रकारांच्या नायिका, नाट्यशास्त्रातील नायिका, साहित्यशास्त्रकारांच्या नायिका, अष्टनायिका, दूत व दूती यांविषयी हे पुस्तक चर्चा करते.

ह्या चर्चेचे दोन भाग आहेत. एकीकडे शरीराची प्रमाणं, विशिष्ट मानसिकता, भावावस्था यांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी



करणे, त्यात विश्लेषण करत राहणे, जास्तीत जास्त स्पष्टता मिळवत जाणे मग याकरता नायिकांच्या अनेक अंगांची तक्त्यासह मांडणी असे भाग वाचकांसमोर मांडले आहेत. ज्यामुळे विषयाकडे पाहण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन समोर येतो. परंतु मुळातच विषय हा भावनांशी, त्यांच्या तरलतेशी व तीव्रतेशी संबंधित असल्याने वाचकाला विषयाची वैश्विकता समजायला चित्रं मदत करतात. चित्रं एकाच वेळेला, विशिष्ट नायिकांची व त्याच वेळेला त्या मानसिक अवस्था असलेल्या सर्वांची होतात.

मुळातच अंतर्मुख असलेल्या या विषयाचे अनेक पदर हे पुस्तक उलगडण्यात मदत करते. अंतर्मुख अनुभवांना प्रदर्शित करून, व्यक्त करून, त्यातील रसावर लक्ष केंद्रित करून पुस्तक वाचकांतील अशा नायक-नायिकांना धीर देते. दलालांनी जरी हे पुस्तक १९५५ साली प्रकाशित केलं. तरीही त्याच्या आशयाच्या स्पष्ट दृष्टीमुळे ते वैश्विक ठरतं. पुस्तकाच्या पुनर्जन्माने ते समकालीन मानसिकतेलाही नक्कीच आकर्षून घेईल. यातच दलाल-जोगळेकर व रोहन प्रकाशनाच्या टीमचं यश आहे.

**महेंद्र दामले**

भ्रमणध्वनी : ९८२०७१५२७४

mahendradamle@gmail.com



## प्रतिसाद

आता आपल्यापैकी कित्येकांना संस्कृत चांगलं कळत नाही. पण संस्कृत शब्दांचा उपयोग तर करायची हौस तर फार. त्यामुळं शब्द चुकीचा असला तरी आपण तो दडपून ठोकून देतो. कारण त्याच्या मागं विचार असता, तर असा घोटाळा झाला नसता.

आता तुम्ही अतिथी संपादक आल्हाद गोडबोले असा निर्देश केला आहे. हा तुमचा उल्लेख श्री गोडबोले ह्यांचा अधिक्षेप करणारा आहे, हेही तुमच्या लक्षात आलं नसावं.

संस्कृतात, अतिथी आणि अभ्यागत असे दोन शब्द पाहुणा ह्याकरता आहेत. त्यातील अतिथि म्हणजे अ-तिथि. 'यस्य नास्ति तिथिः स अतिथिः।' असा हा समास सोडवतात. त्याचा सरळसरळ अर्थ आगंतुक. काळवेळ न पाहता, म्हणजे तिथि न पाहता, वेळी अवेळी घरात आलेला. (त्यालाही देव मानावं हा आपला धर्म. अतिथिदेवो भव। म्हणजे अतिथीलाही देव मानणारा हो.) पण तुम्ही श्री गोडबोले ह्यांना आदरानं बोलावलं आहे. तर ते आगंतुक अतिथी कसे? आणि अभ्यागत म्हणजे आदरानं बोलावलेली व्यक्ती. तेव्हा तुम्ही त्यांना अभ्यागत संपादक असं म्हणायला हवं.

पटलं तर बदल करा. नाही तर सोडून द्या. मात्र माझा अकारण उल्लेख करून प्रसिद्धी देऊ नका. मला त्याची मुळीच आवश्यकता नाही.

**– मनोहर राइलकर**

(एका सजग वाचकाने केलेला हा खुलासा पटण्यासारखा असल्याने तसा बदल या अंकापासून करीत आहोत. – संपादक)

# आलो येथवरी हा असा!

**सतीश नाईक**



***दलालांना चाहते प्रचंड लाभले आहेत. आजही दलालांचं प्रदर्शन कुठं सुरू झालं म्हणजे चित्रकार मंडळी तिकडं जात असतात. पण दलालांचं कर्तृत्व ज्या पायावर उभं राहिलं – बहरलं त्या 'साहित्याच्या वाचना'कडे मात्र हटकून कानाडोळा करतात. महाराष्ट्राच्या चित्रकला परंपरेची हीच खरी शोकांतिका आहे. 'चिन्ह'ची निर्मिती ही याच जाणिवेतून झाली. त्यात मी यशस्वी ठरलो किंवा नाही हे कळावयास अजून काही काळ जावा लागेल. पण पदार्पणातच मुंबई मराठी पत्रकार संघाचा मानाचा दीनानाथ दलाल पुरस्कार 'चिन्ह'ला मिळाला. तो काही अपघात नव्हता. तो 'चिन्ह'ने घेतलेल्या भूमिकेचाच विजय होता.***

लिहा-वाचायचा नाद मला कधी लागला ते आता नक्की आठवत नाही पण बहुदा खूपच लहानपणी असणार. म्हणजे कदाचित चौथी पाचवीतच बहुदा. चेंबूरमधले ते दिवस आजही आठवतात. महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या सुरुवातीच्या काही अतिशय विचारपूर्वक बांधलेल्या वसाहतींपैकीची ती एक वसाहत होती. आसपास भरपूर मोकळ्या जागा ठेवून बांधलेल्या इमारती, छान रस्ते, व्यवस्थित बांधलेली गटारे, खेळण्याच्या प्रशस्त जागा, समाज मंदिर हॉल, खुले नाट्यगृह, एखादी वस्तू लागली तर पटकन घेता यावी यासाठी दुकानांच्या रांगा. सारं काही आटोपशीर आणि नीटनेटकं. मला आजही चांगलं आठवतंय. १७ नंबरच्या इमारतीच्या मागे एका छोट्याशा जागेत साने गुरुजी कथामाला भरत असे. (शेजारी मुजुमदार डॉक्टरांचा दवाखाना होता, तो आजही आठवतो) तिथं मी नेमानं जात असे, म्हणजे दवाखान्यात नाही, कथामालेत. जाता जाता म्हणून सांगतो. आज ज्यांना मेधा पाटकर म्हणून आपण ओळखतो, ती तेव्हाची मेधा खानोलकर ही माझी कथा-मालेतली सहाध्यायी होती. पुलंच्या 'नाचरे मोरात' शोभावी अशी विलक्षण गोड आणि चुणचुणीत मेधा तेव्हा खूप छान गोष्टी सांगायची. तेव्हाही तिचा प्रेझेन्स लक्षात राहील असाच असायचा. ते खरं तर न कळतं वय होतं. पण कसं कुणास ठाऊक आजही सारं कसं कालच घडल्यासारखं अगदी स्पष्ट आठवतं.

दर रविवारी सकाळी ही कथामाला भरत असे. मी बहुदा चौथी-पाचवीत असणार. आकाशवाणीवरचा- तेव्हा खरं तर आकाशवाणी वगैरे नाव ठाऊकच नव्हतं, रेडिओ हेच नाव रूढ होतं- रेडिओवरचा 'बालोद्यान' आणि 'गंमत जंमत'चा कार्यक्रम संपला की कथामालेत जायला मी धावत सुटे. ('बालोद्यान' हा कार्यक्रम तेव्हा आकाशवाणी पुणे केंद्रावरून प्रसारित होत असे, तर 'गंमत जंमत' मुंबई केंद्रावरून. हरबानाना, गोपीनाथ तळवलकर, लीलावती भागवत ही नावं आजदेखील त्यांच्या आवाजासह जशीच्या तशी स्मरणात रुतून बसलेली आहेत.) कारण नाना प्रकारच्या गोष्टी ऐकावयास मी अतिशय उत्सुक असे. मला आठवतंय आम्हा मुलांनादेखील बोलण्याचा सराव व्हावा, सभाधीटपणा यावा म्हणून गोष्टी सांगावयास प्रवृत्त केलं जात असे. ठसक्यात गोष्ट सांगणारी तेव्हाची मेधा आजही स्मरणात आहे. बहुदा कथामालेतच एक छोटंसं वाचनालय होतं. त्यातली पुस्तकं वाचावयास मी अतिशय उत्सुक असे. इथंच कधीतरी पुलंच्या (वयम् मोठम् खोटम्), नंतर सई परांजपे (भटक्याचे भविष्य), विजय तेंडुलकरांच्या (चिमणा बांधतो बंगला) बालनाटिकांची कितीतरी पुस्तकं माझ्या हाती पडली असावीत. त्यावरची वसंत सरवटे यांची चित्रं आजही आठवतात.

घरात त्या काळी 'नवशक्ती' येत असे. नवशक्ती तेव्हा चेंबूरमध्ये खूप जोरात होता. बहुसंख्य कोंकणी माणसांचा तो आवडता पेपर. कारण कोंकणातल्या बातम्या त्यात विशेष करून येत असत. कोंकणातल्या लोकांचं त्या काळात चेंबूरमध्ये खूप प्राबल्य होतं. पाध्ये, पालेकरांचा काळ संपून बेहेरे यांचा काळ सुरू झाला होता. (हे अर्थातच मला नंतर कळलं. म्हणजे पत्रकारितेत वगैरे आल्यावर.) पु. रा. बेहेरे 'नवशक्ती'चे संपादक होते. ते अतिशय वाचनीय लिहीत असत. सात सात-आठ आठ दिवस त्यांच्या अग्रलेखांच्या मालिका चालू राहात. ते अगदी आजही स्पष्ट आठवतं. मुलांच्या पुरवणीचं पान सुभाष समेळ चालवत असत. हे सुभाष समेळ स्वतः चित्रकार होते. साहजिकच

नवशक्तीची लहान मुलांची पुरवणी किंवा पान अगदी चित्रमय स्वरूपात प्रसिद्ध होई. व्यंगचित्रे, शब्दकोडी, अर्कचित्रे, चित्रे यांची त्या पुरवणीत नुसती रेलचेल असे. हे सुभाष समेळ 'मिशाळजी' नावानं 'नवशक्ती'त पॉकिट कार्टुन्सदेखील काढत असत. हे समेळ अधनंमधनं 'नवशक्ती'च्या पहिल्या पानासाठी देखील चित्रं काढत असत. उदाहरणार्थ १ मेच्या महाराष्ट्र दिनी 'नवशक्ती'च्या पहिल्या पानावर तुतारी फुंकणारा मावळा, शिवजयंतीच्या दिवशी अश्वारूढ शिवाजी महाराज अशी चित्रं बऱ्याच प्रसंगी ते काढत असत. ती चित्रं कापून मी वहीत चिकटवून ठेवीत असे. चित्रांविषयीचं आकर्षण माझ्या मनात निर्माण झालं ते बहुदा याच चित्रांनी असावं, असं आज मागे वळून पाहताना वाटतं.

हे सुभाष समेळ प्रचंड धडपडी असामी असावी. ते जे लिहीत ते अतिशय आवडीनं मी वाचत असे. मुलांना एकत्र आणण्यासाठी ते काहीना काही उपक्रम आखत असत. असाच काहीतरी उपक्रम त्यांनी गिरगावात आखला होता. 'नवशक्ती'त त्याविषयी जाहीर आवाहनदेखील केलं होतं. मी ते वाचलं आणि त्यांना एक पोस्ट कार्डदेखील टाकलं. तर त्यांनी माझं नाव रविवारच्या एका 'नवशक्ती'त छापूनच टाकलं. आपलं नाव हे असं छापून आलेलं पाहून मी तर प्रचंड हरखून गेलो. येणाऱ्या जाणाऱ्याला दाखवू लागलो. छापून आलेल्या नावाची नशा काय असते ते मी पहिल्यांदाच अनुभवत होतो आणि हाच बहुदा माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा क्षण असावा. मग समेळांचं पत्र आलं. त्यांनी मला गिरगावातल्या कुठल्यातरी शाळेत बोलावलं. माझं आजोळ गिरगावातच असल्यानं चेंबूरहून गिरगावला जाणं मला काही अवघड नव्हतं. आदल्या दिवशी शनिवारी मी आजोळी गेलो आणि रविवारी सकाळी समेळांना भेटायला त्या शाळेत.

माझ्यासारखी अनेक मुलं तिथं आली होती. हे समेळ मला प्रथमदर्शनीच आवडून गेले. चट्टेरीपट्टेरी शर्ट, लांब मिश्या आणि खांद्यावर झोळी, ज्या गतीनं ते धावपळ करीत होते ती सारी पाहून मी थक्क झालो. बहुदा त्यावेळी त्यांना लहान मुलांना घेऊन नाटक करायची होती. आता तो साराच तपशील फारसा आठवत नाही. पण समेळ मात्र अगदी स्पष्ट आठवतात. त्यांची ती चित्रं आठवतात आणि मुख्य म्हणजे त्यांच्या त्या लांबच लांब मिशादेखील आठवतात, 'नवशक्ती'च्या त्यांनी तयार केलेल्या विविध बालपुरवण्या आठवतात.

परवा घरात काहीतरी शोधत होतो तर त्यांनी तेव्हा काढलेल्या दोन पुरवण्या माझ्या चटकन हाती आल्या आणि ते सारे दिवस आठवले. अजूनही मला त्या टाकाव्याशा वाटत नाहीत. कारण त्यामुळेच मी बहुदा लहानपणीच्या त्या रम्य दिवसांशी जोडला जात असावा. असं खूप काही जमवून ठेवण्याची मला तेव्हा सवय होती. नंतर जितकी घरं मी बदलली त्या त्या घरात मी ते सारं नेत होतो. पण नंतर नंतर या साऱ्याची व्याप्ती एवढी वाढत गेली की ते ठेवणं मला अशक्यच होऊन बसलं. कुठल्या तरी एका टप्प्यावर मला असं जाणवलं की हे योग्य नाही. जुन्या आठवणी, जुन्या वस्तू यात रमणं म्हणजे भूतकाळातच रमणं आणि भूतकाळात रमणं म्हणजे स्वतःला वर्तमानकाळापासून मागं खेचणं. हे सारं जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा कुठं मी तो पसारा आवरायला घेतला. जेवढं आवश्यक किंवा महत्वाचं वाटतं तेवढंच ठेवायचं असं ठरवूनच मी अनेक गोष्टी नष्ट करू लागलो, टाकून देऊ लागलो. हे सारं करत असताना मनाला यातना होत. आपण त्या काळाशी असलेलं आपलं नातंच जणू तोडून टाकतोय असे विचार कुठं तरी मनाला स्पर्शून जात असत. पण असं जरी असलं तरी काही गोष्टी मात्र पूर्णतः टाकून दिल्या गेल्याच नाही. आजही जुन्या पुस्तकात, वहीत, बॅगेत, खोक्यात अशा जपून ठेवलेल्या वस्तू कधीमधी हाताला लागतात. आणि जुन्या दिवसांच्या रम्य आठवणी जाग्या होऊन अस्वस्थतेत भर टाकतात.



जे जे स्कूल ऑफ आर्टच्या या रम्य परिसरात आयुष्यातील महत्त्वाची आठ वर्षं कशी गेली ते कधी कळलंच नाही

नंतर जेजेत शिकताशिकताच शेवटच्या वर्षी मी पूर्ण वेळ पत्रकारितेत आलो. नरीमन पॉईंटला आमच्या ऑफिसच्या जवळच नवशक्तीचं ऑफिस होतं. साहजिकच जाता येता त्या परिसरात किंवा पत्रकार संघात हमखास समेळांची गाठ पडे. पण समेळ आता थकले होते.

प्रकृतीच्या तक्रारींमुळे त्यांनाही काही मागचं फारसं आठवत नसावं. आणि मुलांसाठी आयुष्यभर धडपड करणाऱ्या माणसाच्या पदरी जे काही येतं तेच त्यांच्या बाबतीत घडलं असल्यानं त्यांच्या पत्रकारितेतल्या कारकीर्दीचा किंवा त्यांचा शेवटही फारसा बरा झाला नसावा.

त्यामुळेच की काय कुणास ठाऊक मनात खूप इच्छा असूनही नंतर त्यांना मी कधी भेटलोच नाही. चित्रकला, पत्रकारितेत मी जे काही थोडंबहुत काम केलं त्याची सारीच्या सारी बीजं अत्यंत लहान वयात 'नवशक्ती' वाचण्यात, त्यातली बालपुरवणी वाचण्यात, विशेषतः त्यातली सुभाष समेळ यांची चित्रं पाहण्यात निश्चितपणे आहेत हे कबूल करायला मला कोणताच संकोच वाटत नाही. ज्या नवशक्तीनं मला साहित्याचे, चित्रकलेचे संस्कार दिले त्याच नवशक्तीची नंतर वाताहत होत जाताना मी जवळच्या इमारतीतून पाहिली.

बेहेरे यांच्यानंतर कितीएक संपादक झाले, त्याची गणती बहुदा त्या नवशक्तीच्या संचालकांकडे देखील असेल की नाही याविषयीही माझ्या मनात शंका आहे. पण बालपणी त्या वृत्तपत्राशी जोडलेली नाळ आजही मला तोडता आलेली नाही.

आता मी ते रोज वाचत नाही, (वाचवतही नाही), मात्र दर रविवारी अजूनही माझ्याकडे 'नवशक्ती' येतोच.

चेंबूरचं वातावरण तेव्हा समाजवाद्यांना अनुकूल होतं. विशेषतः सुभाषनगरमध्ये मोठ्या संख्येनं समाजवादी राहत. निवडणुकीत प्रजा समाजवादी पक्षाची 'झोपडी' ही निशाणी होती. आम्ही लहान मुलं तीन चाकी सायकल किंवा दोन चाकी स्कूटरवर झोपडी ही निशाणी आणि मरून रंगाचा झेंडा लावून प्रचाराला जात असू. (त्या वेळच्या निवडणुकीतली स. गो. बर्वे, ताराबाई सप्रे ही नावं अजूनही स्मरणात आहेत.) ज्या शाळेत माझं माध्यमिक शिक्षण झालं ती शाळादेखील समाजवाद्यांचीच. चेंबूरकडून गोवंडीकडे जाणाऱ्या रेल्वे लाईनला लागूनच सुभाषनगरच्या शेवटाला विटांच्या भिंतीवर पत्रे टाकलेली आमची शाळा होती. मुक्तानंद हायस्कूल तिचं नाव. विजया करकरे या शाळेच्या मुख्याध्यापिका. त्या नेहमीच खादी वापरायच्या. आज इतक्या वर्षानंतरदेखील स्टार्च लावलेली खादी वापरणारी त्यांची ठेंगणीशी मूर्ती जशीच्या तशी माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. त्यांच्या हातात मी अनेकदा साधनेचा अंक पाहत असे. दिवाळीत हटकून त्यांच्या हातात जनवाणीचा अंक दिसायचा. कदाचित नावात गफलत झाली असेल पण अशाच स्वरूपाच्या नावाचा तो अंक होता.

समाजवादी मंडळींकडूनच तो अंक प्रसिद्ध होत असे. त्यातली चित्रं, त्याची सजावट यानं मी त्या काळात अतिशय प्रभावित झालो होतो. शाळेत जिथून तो हाती लागे तिथून मी तो आवर्जून चाळत असे. आज त्यातलं काही एक आठवत नाही. पण कधी वेळ मिळालाच तर मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातल्या संदर्भ विभागात जाऊन तेव्हाचे जुने अंक मला कधीतरी जरूर चाळायचेत. कारण नंतरच्या माझ्या जडणघडणी मध्ये त्याही अंकांचा वाटा मोठा होता.

त्या काळातलं माझं आवडीचं मासिक म्हणजे अशोक माहीमकरांचं 'फुलबाग' आणि पुण्याहून प्रसिद्ध होणारं 'कुमार' किंवा 'आनंद'.

नागपूरहूनदेखील 'मुलांचं मासिक' प्रसिद्ध व्हायचं. तेही मला खूप आवडायचं. 'किशोर' किंवा 'बिरबल' मासिकांचे जन्म हे नंतरचे. पुण्यातून प्रसिद्ध होणारं स्वराज्य साप्ताहिक हेदेखील का कुणास ठाऊक मला खूप जवळचं वाटायचं. ते लहान मुलांचं साप्ताहिक नव्हतं. पण तरीदेखील त्यातल्या अनोख्या प्रासादिकतेमुळे (कुणी त्याला बाळबोधपणा देखील म्हणू शकेल.) ते मला खूप जवळचं वाटायचं. ते चेंबूरमधल्या सलूनमध्येदेखील वाचायला मिळायचं. दिवाळीच्या दिवसात तर मोठी चंगळ असायची. 'कुमार'चा जाडजूड दिवाळी अंक हाती पडायचा. 'फुलबाग'चा अंकही जाडजूड असायचा. आणखीन एक आकर्षण असायचं ते म्हणजे किर्लोस्कर प्रेसच्या'बालवाडी'च्या अंकाचं. मला आठवतंय दिवाळीत खाऊचे पैसे हाती पडले रे पडले की मी धावत सुटायचो तो थेट चेंबूर स्टेशनजवळच्या पेपर स्टॉलपाशी, 'बालवाडी'चा अंक आणण्यासाठी. ते अंक इतके सचित्र आणि सुंदर असत की टाकून देण्याचं धाडस माझ्याच्यानं कधी झालंच नाही. आजही माझ्या संग्रहात त्यातले काही अंक आहेत. ते सारे अंक विविध कोरोगेटेड बॉक्समध्ये मी व्यवस्थित ठेवून दिले आहेत. कधी काही कामानिमित्तानं शोधाशोध करताना ते हाती पडले की नंतरचा सारा वेळ जुन्या आठवणींचा धांडोळा घेण्यात कसा निघून जातो ते कळतदेखील नाही.

***

ती आमची शाळा तेव्हा नुकतीच स्थापन झाली होती. साहजिकच शाळेचं वाचनालय काही फारसं सुसज्ज वगैरे नव्हतंच. त्यामुळे अगदी जुजबी पुस्तकं मला तिथं वाचायला मिळत. पण तिथल्या दोन-तीन शिक्षकांकडून मात्र भाषेच्या संदर्भात खूप काही शिकावयास मिळालं.

उदाहरणार्थ (इंदिरा) पंडितबाई, (नलिनी) कर्वेबाई, नाईक सर. साहजिकच माझा मोर्चा वळला तो वाचनालयांकडे. माझे वडिलच मला तिथं घेऊन गेले. चेंबूर स्टेशनमधून सुभाषनगरमध्ये प्रवेश करताना उजव्या बाजूच्या दुकानांच्या रांगांमध्ये अगदी टोकाच्या बाजूला दादर सार्वजनिक वाचनालयाची शाखा होती. वडिलांचं बोट धरून जेव्हा मी तिथं प्रवेश केला तेव्हा एक भलाथोरला खजिना गवसल्याचाच मला भास झाला. जमिनीपासून छतापर्यंत मोठमोठाल्या कपाटांमध्ये गच्च भरून ठेवलेली पुस्तकं पाहून मला अक्षरशः हर्षवायू झाला. वडिलांकडे हट्ट धरून मी सभासदत्व मिळवलं आणि दररोज पुस्तकं बदलण्यासाठी मी वाचनालयात जाऊ लागलो.

महिन्याभरातच तिथल्या ग्रंथपालानं वडिलांकडं माझी तक्रार केली की हा खूप वाचतोय; याला आवरा. त्यांचंही बरोबरच होतं.

सभासद झाल्याबरोबर मी एक मोठ्यांचं पुस्तक, एक लहान मुलांचं पुस्तक आणि एक मासिक (त्या काळात मराठीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये मासिकं प्रसिद्ध होत.) घरी घेऊन येत असे आणि दुसऱ्या दिवशी आणून परत देत असे. पण पहिल्या आठवड्यातच झुंजार, काळा पहाड या अर्नाळकरांच्या कादंबऱ्यांनी आणि आचार्य अत्रेंच्या पुस्तकांनी माझ्या मनात वाचनाविषयी इतकी गोडी निर्माण केली की मी सकाळी नेलेली पुस्तकं भराभर वाचून संध्याकाळी देखील पुन्हा बदलून घ्यायला लागलो. दादर सार्वजनिक वाचनालयाच्या नियमात ते बसत नव्हतं. त्यांचं म्हणणं असं होतं की, तुला एका दिवसानंतरच पुस्तकं बदलता येतील. हा प्रॉब्लेम सोडवण्यासाठी वडिलांनी मला आणखीन एक सभासदत्व मिळवून दिलं. साहजिकच वाचावयास एक अखंड दिवस पुरेल एवढी पुस्तकं मी त्या वाचनालयातून नेऊ लागलो.

***

दर दिवाळीत प्रसिद्ध होणाऱ्या 'आवाज'च्या अंकाची तर मी अक्षरशः चातकाप्रमाणे वाट पाहत असे. त्यातले विनोदी लेख, एकांकिका किंवा नाटकातला भाग, कधी कधी तर चक्क एखाद्या मराठी चित्रपटाची पटकथा हे माझ्या दृष्टीनं मोठं आकर्षण होतं.

# साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

गजा हा शरीरविक्री करणाऱ्या माऊलीचा मुलगा
शाळा शिकू शकला नाही.
शीघ्र बुद्धीचा गोरक्ष पाटील याला
श्रीमंत आई-वडिलांनीच शिक्षणापासून पारखे केले.
प्राप्त परिस्थितीनेच चांडोलीच्या मुलांची
ससेहोलपट केली. शबानासारख्या सुंदर मुलीवर
झालेला अत्याचार गुपचूप सहन करावा लागला.
सुजीतसारख्या गोड मुलाने
पालकांच्या हट्टासाठी आपले जीवन संपवले.
या सगळ्याचे जीवघेणे दुःख माझ्या मनाला
आजही छळते आहे. या लिखाणामधून
त्याला वाट करून देता आली.
मनाची ठसठस थोडीशी थांबविता आली.
मी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांबाबतीत जे अनुभवले,
ते लिहून काढले. त्यात उसनेपणा, दिखाऊपणा,
खोटी ऐट मिसळली नाही. आरडाओरडाही नाही.
मुलांबद्दल जे वाटले, ते लिहून काढले.
आता असंख्य विद्यार्थी माझ्या मनाच्या कोपऱ्यात
थांबून लिहिण्यासाठी साद घालीत आहेत.




## माझे विद्यार्थी
रघुराज मेटकरी

पाने १५२ । किंमत १२५ रुपये

तीन महिन्यांत
पहिली आवृत्ती संपली,
दुसरी आवृत्ती
आली

| | |
|---|---|
| अनुक्रम | जितेंद्र म्हस्के |
| गजा | आकाशी झेप घे रे पाखरा! |
| गोरक्ष पाटील | अजय-संजयची गोष्ट |
| गणू गुजले | चांडोलेची मुले |
| शिल्पा दऱ्याबा चव्हाण | देवरसी |
| शबाना | कलाकार राजेश साळुंखे |
| सुजीत : माझा मित्र | सुनेत्रा कणसे |
| अवधूत भोसले | सचिन-पल्लवी |
| माणिक | हरीश-गिरीश |

संपर्क
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० फोन : ०२०-२४४५९६३५

विशेषत:'आवाज'ची आकाशवाणी मला अतिशय आवडत असे. त्या आकर्षणात भर घालत असे ती 'आवाज' मधली खिडकीचित्रं. त्यातला वात्रटपणा समजण्याचं ते वय नव्हतं. मात्र त्या चित्रांच्या घड्या घातल्यावर जे काही घडायचं ते त्या वयात खूप गंमतीदार वाटायचं.

'घन घन माला नभी दाटल्या' या लोकप्रिय गाण्याचे सूर ऐकले की आजही मला 'आवाज'च्या अंकांची आठवण येते. कारण मला आठवतंय बहुदा ६२ सालच्याच अंकात 'वरदक्षिणा' या गाजलेल्या मराठी चित्रपटाची संपूर्ण पटकथाच प्रसिद्ध झाली होती. बहुदा ती गदिमांनी लिहिलेली असावी. त्यावेळी मी अवघ्या सात वर्षांचा होतो. पण आजही मला तो अंक, त्यातली खिडकी चित्रं आणि ते गाणं जसंच्या तसं आठवतंय.

१९६८ साली चेंबूर सोडेपर्यंत मी त्या वाचनालयातली मला हवी असलेली जवळजवळ सगळीच पुस्तकं वाचून मोकळा झालो होतो. लहान मुलांच्या पुस्तकाखेरीज सर्वच्या सर्व मराठी नाटकं मी वाचून काढली होती. इतकंच नाही तर अख्खा अर्नाळकरदेखील वाचून झाला होता.

अत्रे, खांडेकर, फडके, माडखोलकर (इतकंच काय पण चंद्रकांत काकोडकरसुद्धा वाचून झाला होता. काकोडकरांपाशी मी पोहोचलो तो 'राजाराम राजे'चं बोट धरून.) अर्नाळकरांचं लिखाण इतकं आवडायचं की, आजोळी गिरगावात गेलो म्हणजे झुंजार महल शोधायचादेखील प्रयत्न अधनंमधनं मी करीत असे. 'धनंजय', 'झुंजार', 'काळा पहाड' हे त्या काळातले माझे आवडते नायक होते. दिवाळीत तर मोठी धमाल असे. त्या वाचनालयातच बसून रहावंसं वाटत असे. कारण दिवाळी अंकांचे गठ्ठेच्या गठ्ठे तिथे पडलेले असत. पहिले एक दोन दिवस तर दिवाळी अंकांना नवा कागद, छपाईची शाई, बांधणीचे गोंद किंवा सिरस यांचा जो एक आगळावेगळा गंध येत असे तो मला अतिशय हवाहवासा वाटत असे. पुढं मी जो पत्रकारितेत गेलो, स्वतःचा दिवाळी अंक काढला या साऱ्याची सारी मुळं इथंच रुजली असावीत असा माझा कयास आहे.

दिवाळीच्या दिवसात पुस्तकांकडे काहीसं दुर्लक्ष व्हायचं. वाचनालयात लवकरात लवकर जाऊन जास्तीत जास्त चांगला अंक मिळवण्याकडे सर्व लक्ष केंद्रित झालेलं असायचं. दिवाळीनंतरचे तब्बल अडीचतीन महिने घरात अक्षरशः वाचनयज्ञच चालायचा. माझे वडिल ज्या बूट्स इंडियामध्ये नोकरी करीत होते तिथंही दिवाळीत सहकार तत्वावर दिवाळी अंकाचं एक वाचनालय चालवलं जात असे. त्यामुळे वडिलही ऑफिसवरून येताना एकतरी अंक घेऊन येत असत. एका वर्षी तर ते त्या सहकारी वाचनालयाचे मुख्य होते. आणि त्या वर्षीच्या अंकांची खरेदी त्यांना करायची होती. म्हणून दादर स्टेशनसमोर जिथं दिवाळी अंकाचा मुख्य डेपो होता तिथं ते मला घेऊन गेले होते. बापरे! जवळजवळ दोनशे-तीनशे दिवाळी अंकांचे प्रचंड मोठे गठ्ठेच्या गठ्ठे आणि दिवाळी अंकांच्या प्रतीना येणारा, तिथल्या वातावरणात मिसळलेला छपाईचा तो विशिष्ट गंध यानं मी कोण हरखून गेलो होतो. (तोच गंध त्यानंतर कित्येक वर्षानं माझा पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध झाला तेव्हा मी जसाच्या तसा अनुभवला.) विकत घेतलेल्या त्या दिवाळी अंकांचे गठ्ठे घरी आणताना मी कोण खूश होतो. कधी एकदा घरी जातो आणि त्यांचा फडशा पाडतो असं मला होऊन गेलं होतं; ते आजही लख्ख आठवतं.

त्या काळात माझे काका आमच्याच घरात राहत असत. त्यांनाही वाचनाचा नाद होता. तेही कुठूनकुठून अंक आणत. तेही अंक वाचायला मिळत. माझे मामा तिथून चार इमारती दूर अंतरावर राहत. त्यांनाही वाचनाचा नाद होता. त्यांच्या घरी त्यांचे जवळचे सडे नातलगही राहत. त्यांनाही वाचनाचा छंद होता. तो छंद म्हणजे असा तसा नव्हे; तर उदाहरणार्थ अख्खा अर्नाळकर त्यांच्याकडे होता.

अर्नाळकरांच्या दोनदोन - तीनतीन कादंबऱ्या त्यांनी छान बाईंड करून घेतल्या होत्या. तो खजिना जेव्हा मला सापडला तेव्हा हर्षवायू व्हायचंच शिल्लक राहिलं होतं. १९६८ साली चेंबूर सोडेपर्यंत तो साराच्या सारा संग्रह मी वाचून काढला होता. त्या काळात मी किती वाचलं असेल याविषयी आज मला काहीएक सांगता येणार नाही, कारण माझ्या वाचनाच्या झपाट्यातून वाण्याच्या पिशव्यांचे किंवा चण्याच्या पुडीचे कागददेखील सुटले नव्हते. नंतर या क्षेत्रात जे काही थोडंबहुत काम केलं त्याची बीजं त्यात दडलेली असावीत हे निश्चित.

❋❋❋

आमची शाळा नवी असल्यामुळे शिक्षणविषयक प्रत्येक गोष्टीत ती पुढं राहण्याचा प्रयत्न करीत असे. त्यातच शाळेशी संबंधित सर्व व्यक्ती समाजवादी. त्यामुळे शाळा आणि शाळेच्या आसपास खूप काही घडामोडी घडत असत. शाळेच्या इमारत निधीसाठी त्या काळात नाटकांचे प्रयोग लावण्याची पद्धत होती. चित्रपटांचेदेखील खेळ आयोजित केले जात. तेव्हा नटराज थिएटर नुकतंच सुरू झालं होतं. तिथं पाहिलेला व्ही. शांताराम यांचा 'दो आँखे बारह हाथ' हा चित्रपट मला आजही आठवतो. राष्ट्रसेवा दलाच्या 'महाराष्ट्र दर्शन'चे तर कितीतरी प्रयोग मी षण्मुखानंद सभागृहात पाहिल्याचे आठवतात. गांधी मैदानात होणाऱ्या शाळेच्या इमारतनिधीसाठीच्या नाट्यमहोत्सवाचं तर आम्हा मुलांमध्ये विशेष आकर्षण होतं. कारण रंगभूमीवर येणारी सर्व नवी नाटकं तिथं पाहावयास मिळत.

'कट्यार काळजात घुसली'च्या सुरुवातीच्या काही प्रयोगापैकीचा एक आमच्या शाळेच्या या नाट्यमहोत्सवात झाला होता. फिरणारा रंगमंच, वसंतरावांचं गाणं, अभिषेकी बुवांचं संगीत या साऱ्यांनं त्या काळात अक्षरशः वेड लावलं होतं. काळाच्या ओघात टिकून राहणाऱ्या अभिजात कलाकृती कालांतरानेदेखील आपलं कार्य सदोदित चालूच ठेवतात हे 'कट्यार'वरच्या मराठी चित्रपटानं आज इतक्या वर्षानंदेखील सिद्ध करून दाखवलं आहे. आज तरुण मंडळींमध्ये जी राहुल देशपांडे, महेश काळेंची क्रेझ



'लोकप्रभा'ची आमची यशस्वी टीम. डावीकडून संजीवनी खेर, मी, प्रदीप वर्मा, अभिजित देसाई, संजय राऊत, जयश्री देसाई, कुमुदिनी आणि तांदळेकर




मी संपादित केलेला आणि गाजलेला लोकप्रभेचा एकांकिका विशेषांक

आहे तशीच काहीशी क्रेझ वसंतराव, अभिषेकी बुवा, फय्याज, भार्गवराम आचरेकर आणि बहुदा प्रसाद सावकार यांच्याविषयी आम्हा मुलांमध्ये होती. आज इतक्या वर्षांनंतर तेव्हाच्या प्रयोगाच्या वेळी प्रकाशित झालेली माझ्या संग्रहातली स्मरणिका पाहताना या साऱ्याच आठवणी मनात उचंबळून येतात आणि हे सारं काही आपल्याला आयुष्यात खूप काही देऊन गेलं, शिकवून गेलं याची जाणीव करून देतात.

बाळ कोल्हटकरांची 'सीमेवरून परत जा', 'वाहतो ही दुर्वांची जुडी' यासारखी अनेक नाटकं याच नाटक महोत्सवात पाहिल्याचं आठवतंय. 'जुडी'तली पात्रं घरात शिरल्यावर समोरच्या नळावर पाय धुवूनच आत शिरत. हे दृश्य आम्ही मुलं चकीत होऊन पाहत असू. कारण त्या नळातून पडणारं पाणी हे अगदी खरखुरं असे. तसंच एका अंकात टांगलेला दिवाळीचा आकाश-कंदील मला भयंकर लुभावून गेला होता. ते नाटक त्यावेळी मला जाम रडवून गेलं होतं. मलाच नाही, तर नाट्यमहोत्सवाच्या मंडपात आलेल्या प्रत्येकालाच ते रडवून गेल्याचं आजही आठवतं. (आज या वयात ते पुन्हा पाहिलं तर तितकंच रडवून जाईल, याविषयी माझ्या मनात अजिबात शंका नाही.) वसंत कानेटकर, मधुसुदन कालेलकर, विद्याधर गोखले यांची असंख्य नाटकं याच महोत्सवात पाहिल्याचं स्मरतं. 'पंडितराज जगन्नाथ'चा प्रयोग पाहिल्यावर मी रंगमंचामागं गेलो होतो, पडद्यावर पाणी कसं दाखवलंय ते पाहायला. याच विद्याधर गोखले यांच्याबरोबर मी आणखीन १०-१२ वर्षांनं काम करणार आहे असं जर तेव्हा मला कुणी सांगितलं असतं तर त्याला इतरांनीच काय पण मीदेखील वेड्यात काढलं असतं. पण होय, तसंच घडलं.

***

१९८० साली मी 'लोकसत्ता' वृत्तसमूहाच्या साप्ताहिक लोकप्रभात उपसंपादक म्हणून जॉईन झालो आणि थेट त्यांच्याच हाताखाली काम करू लागलो. तोही किस्सा भन्नाट आहे. एके दिवशी साहित्य संघात गेलो तर कुणीतरी माझ्याकडे धावत आला. म्हणाला, अरे, त्या लोकप्रभाच्या वसुंधरा पेंडसे नाईक तुला शोधातायेत. जा पटकन भेटून ये त्यांना. तिथून भरतशास्त्र मासिकाच्या कार्यालयात गेलो (खरं तर विनायक पडवळच्या घरातूनच ते काम चालत असे.) तर तिथंही तोच निरोप. अरे, पेंडसेबाई तुला शोधातायेत. मला काही कळेचना. आजच्यासारखं फोनवरून काही विचारायची प्रथा त्या काळी नव्हतीच. फोनही खूप दुर्मिळ होता. जेजेत आलो तर तिथंही तेच. रंजन पाथरे मला भेटला. तेव्हा तो लोकप्रभेत लिहित वगैरे असे. तर तो म्हणाला पेंडसेबाईंनी तुला तातडीनं बोलावलंय. जा भेटायला त्यांना आजच्या आज. तेव्हा कुठं माझ्या लक्षात आलं की हे काही वेगळंच प्रकरण दिसतंय. मग मी त्यांना जरासा घाबरत घाबरतच भेटायला गेलो. तर त्या म्हणाल्या, नाईक, लोकप्रभा आता ऑफसेटवर जातंय आणि त्यात उपसंपादकाची एक जागा निघतेय. येणाऱ्या व्यक्तीला चित्रकलेचं चांगलं ज्ञान असावं, ऑफसेट वगैरे नव्या तंत्रज्ञानाची माहिती असावी आणि तो लिहिणारा देखील असावा, अशा व्यक्तीच्या आम्ही शोधात आहोत. आमच्या अपेक्षांमध्ये तुम्ही चपखल बसताय, तेव्हा येताय का? पेंडसे बाईंनी थेट विचारलं. मी तर गारच झालो.

ज्या क्षेत्राकडे माझा ओढा होता तेच सारं काम मला इथं करायला मिळणार होतं. पण मी त्यांना म्हटलं, अहो, माझं अजून शिक्षण चालू आहे. अजून दोनतीन महिन्यानं माझी अॅडव्हान्सची परीक्षा येईल आणि पुढल्यावर्षी तर मी डिप्लोमाला असेन. हे मला कसं जमायचं? तर त्यांनी मला विचारलं, तुमचं कॉलेज कधी असतं? सकाळचं ना? मी म्हटलं हो, तर त्यांनी पुन्हा विचारलं, सुटतं कधी? तर मी म्हटलं, अडीच-पावणेतीनला. तर त्या म्हणाल्या, मग काय अडचण आहे? आपलं कार्यालय तर बाराला सुरू होतं. बारा ते सहा आहे. या तुम्ही दुपारी थोडं उशिरा. अडीच तीनपर्यंत आलात तरी चालेल. आम्ही करू वर्षभर अॅडजेस्ट.

अहो, पण माझी परीक्षा? तर त्या म्हणाल्या, त्याची नका काळजी करू. आम्ही देऊ तुम्हाला त्या काळात रजा. आता नकार देणं करंटेपणाचंच ठरलं असतं. मी होकार दिला आणि त्याच आठवड्यात तिथं जॉईन झालो. पेंडसेबाईंनी पहिली भेट कुणाशी

घालून दिली असेल तर ती चक्क विद्याधर गोखले यांची. गोखल्यांनी मला आपादमस्तक न्याहाळलं. आणि पेंडसेबाईंना ते म्हणाले, अहो, हा आमचा नाटकवाला आहे. अशा तऱ्हेनं इतक्या सोप्या आणि साध्या आणि थेटपणे माझा १९८०च्या मार्च महिन्यात मराठी पत्रकारितेत शिरकाव झाला.

लोकप्रभाच्या संपादिका वसुंधरा पेंडसे नाईक यांनी मात्र एक वेगळंच विश्व माझ्यासाठी उघडून दिलं यात शंकाच नाही. त्यांनी मला पूर्ण मोकळीक दिली होती आणि स्वातंत्र्यदेखील. त्यांनी माझ्याकडून चित्रंही खूपच मोठ्या प्रमाणावर काढून घेतली अन त्याचे वेगळे पैसेही मिळवून दिले. कधीकधी तर मला मिळणाऱ्या पगारापेक्षा चित्रांचे पैसे मला जास्त मिळत. त्यांच्याच काळात काढलेले एकांकिका विशेषांक तर प्रचंड गाजले. त्यांच्यामुळे मला रचनेचे वगैरे खूपच प्रयोग करता आले यात शंकाच नाही. पण फार लवकर त्यांनी पत्रकारिता सोडली. अर्थात एक्सप्रेस टॉवर्समध्ये हे रोजचंच होतं, हेही मग मला हळूहळू अनुभवानं कळू लागलं. नंतर तिथं मात्र जे आलं ते वेणंच होतं. त्याविषयी आता इतक्यात काही लिहून या रम्य आठवणींची गंमत काही मी घालवू इच्छित नाही, पण नंतर कधी तरी मात्र लिहेनच.

यातली सर्वात संस्मरणीय कारकीर्द ठरली ती माधव गडकरी यांची. गडकरी यांनीदेखील मला अफाट स्वातंत्र्य दिलं. त्यांच्याचमुळे केवळ लागोपाठ तीन वर्षं लोकप्रभाचे दिवाळी अंक मी काढू शकलो. जवळजवळ एक ते दीड लाख प्रिंट ऑर्डर असलेले ते अंक खूपच गाजले. आजही जुने वाचक भेटले की त्या अंकातल्या लेखाची हटकून आठवण काढतात. गडकरी यांच्यामुळेच मी 'चिन्ह' प्रकाशित करण्याचं धाडस करावयास प्रवृत्त झालो. त्यांनी अंक काढायला तर प्रोत्साहन दिलंच पण पहिल्या अंकासाठी कला अकादमीवरचा लेखही दिला.

त्यांच्याविषयी देखील मला विस्तारानं लिहायचं आहे, पण ते नंतर कधीतरी.

❊❊❊

सकाळी उठून जेजेत जायचं आणि दुपारी लंचनंतर जरासं काम करून जेजे स्कूल ऑफ आर्टच्याच फुटपाथवर १३७ नंबरची बस पकडून ऑफिसला जायचं असा माझा दिनक्रम सुरू झाला. ती बसदेखील बेस्टनं माझ्यासाठी सुरू केली की काय असं त्या काळात मला कधीकधी वाटून जात असे. कारण ती रिंग सर्व्हिसची बस होती आणि जेजेच्याच फुटपाथवरून ती जी सुटायची ती मेट्रो, बोरीबंदर, हुतात्मा चौक, चर्चगेट, मरीन ड्राईव्ह मार्गे एक्स्प्रेस टॉवरच्या मागच्या दारातल्या फुटपाथवर येऊन थांबायची. मला फुटपाथदेखील क्रॉस करावा लागत नसे. बसमधून उतरल्या उतरल्या एका ढांगेतच मी व्हाया प्रेस लोकप्रभेच्या कार्यालयात पोहचत असे. कल्पना करा, महाराष्ट्राच्याच राजकीय अथवा सामाजिक जीवनात ज्या वृत्तपत्राला महत्वाचं स्थान आहे (किंवा होतं) त्या वृत्तपत्रात माझा प्रवेश हा इतक्या सहजगत्या झाला होता. आज हे सांगितलं तर कुणाचा विश्वास बसणार नाही, पण मी जसं लिहिलंय अगदी तसंच्या तसं घडलंय. आणि नंतरची तब्बल दोन दशकं मी ही नोकरी केली आणि २० वर्षं पूर्ण होताच तिथून बाहेरदेखील पडलो.

एकीकडे नाटक, दुसरीकडे चित्रकला, तिसरीकडे साहित्य, आदी क्षेत्रातील मुशाफिरी आणि या साऱ्यांच्या केंद्रस्थानी लोकप्रभेतली ही नोकरी. कल्पना करा, किती वेगळं आणि चाकोरीबाहेरचं आयुष्य मी जगलो. जे जगलो ते सारं जेव्हाच्या तेव्हा डायरीत टिपून ठेवलं असतं तर काहीच नाही तर गेलाबाजार उदाहरणार्थ मी एक बऱ्यापैकी कादंबरीकार नक्कीच होऊ शकलो असतो. पण तसं घडायचं नव्हतं. एखाद्या गच्च जंगलातून जात असताना अभावितपणे आपला कशाला तरी स्पर्श व्हावा आणि ज्याला स्पर्श व्हावा ते चक्क मधमाश्यांनी लगडलेलं मधाचं पोळेच निघावं तसंच काहीसं हे लिहिताना झालं आहे. असंख्य आठवणींच्या त्या मधमाश्या आता गुंगूं करून माझ्याभोवती फेर धरू लागल्या आहेत. आठवणारं सारंच लिहून काढायचं म्हटलं तर त्याची व्याप्ती किती होईल याची मला– मी एक बऱ्यापैकी संपादक असूनही– कल्पनादेखील करवत नाही. इतकं ते महाप्रचंड असेल, नव्हे आहेच. सदरचा हा लेख म्हणजे त्या आठवणींना फक्त स्पर्श करणं आहे. सारं कधीतरी शब्दांतून मांडायचंच आहे. मला ठाऊक होतं की, यात कुठल्याही मराठी संपादकाला फारसं स्वारस्य असणार नाही. त्यामुळे जे मांडायचं होतं ते सारं 'निवडक चिन्ह'च्या नवव्या आणि शेवटच्या खंडासाठी मी राखून ठेवलं होतं. पण अचानक 'रुची'च्या संपादकांनी माझ्या साऱ्या समजुतींना तडा देऊन माझं सारंच्या सारं वेळापत्रक बिघडवलं आहे.

❊❊❊

शाळेच्या स्नेहसंमेलनात दरवर्षी प्रत्येक वर्गाची नाटकं होत असत. शाळा सुरू झाली रे झाली की, कुठलं नाटक करायचं याचाच बेत मी आखत असे. जणू काही ते करण्यासाठीच मी शाळेत प्रवेश घेतला होता. त्या पाचसहा वर्षांत जी जी नाटकं माझ्या वर्गानं केली त्याच्या तेव्हाच्या हस्तलिखित प्रती मी आजतागायत जपून ठेवल्या आहेत. तेव्हा डॉ. काशिनाथ घाणेकर यांची खूप मोठी क्रेझ होती.

डॉक्टरांची 'रायगडाला जेव्हा जाग येते'पासूनची सारी नाटकं याच महोत्सवात पाहावयास मिळाली होती. साहजिकच डॉ. घाणेकर हे आम्हा मुलांच्या दृष्टीनं हिरोच होते. '...आणि डॉ काशिनाथ घाणेकर' अशी घोषणा झाली म्हणजे नाट्य महोत्सवाच्या मंडपात प्रचंड मोठा गलका आणि टाळ्यांचा कडकडाट होत असे. त्या साऱ्याचं अनुकरण अर्थातच आमच्याकडून त्या त्या वर्षीच्या नाटकात होत असे. नंतर रंगभूमीवर गाजलेला 'वात्रट मेले'वाला रणजीत मसुरेकर आमच्याच शाळेचा. तो मला सिनियर होता. खूप छान नाटकं बसवायचा तेव्हा तो. नाटकाची आवड त्या काळात इतकी भिनली होती की, मी मोठेपणी नाटककार किंवा नाटकवाला होणार असंच मला वाटू लागलं होतं. चेंबूरमधले हे नाट्य महोत्सव, आजोळी गेल्यावर साहित्य संघात पहावयास मिळालेली नाटकं आणि शाळेच्या

# 'पद्मगंधा'ची दर्जेदार प्रकाशने

लष्करी जीवन मराठी ललितसाहित्यात.
लष्करी अधिकाऱ्याच्या पत्नीने लिहिलेले पहिलेच आत्मकथन



## घर सैनिकाचे

नीलिमा निशाणदार

**मूळ किंमत ₹ ३०० । सवलतीत ₹ २४०**

तृतीयपंथीयांचा जीवनसंघर्ष मांडणारी
वास्तववादी कादंबरी.

## तृतीयपुरुषी शून्य वचनी

सूर्यकांत निवडे



**मूळ किंमत ₹ २१० । सवलतीत ₹ १७०**

'फाशी' ही गोष्ट ज्याच्या उपजीविकेचा भाग बनते, तेव्हा...
एका हँगमनच्या आत्मक्लेषाची, मनोवेदनांची आणि
त्याला अपेक्षित असलेल्या मुक्तीच्या शोधाची कादंबरी.



## हँगमन

ज्योती पुजारी

**मूळ किंमत ₹ २२० । सवलतीत ₹ १७५**

मराठीतील मनस्वी आणि ध्येयवादी प्रकाशकाच्या
'सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मचरित्रावरील वाङ्मयीन पत्रव्यवहाराचे
पुस्तक म्हणजे एक सांस्कृतिक दस्तऐवजच.

## 'सर्वमंगल क्षिप्रा' बद्दल

**(ह. वि. मोटे यांच्या संग्रहातील पत्रे)**

संपादक : डॉ. अंजली सोमण



**मूळ किंमत ₹ ३०० । सवलतीत ₹ २४०**

एकोणिसाव्या शतकातील कोकणची लोकसंस्कृती
जाणून घेण्यासाठी उपयुक्त



## कोकणची लोकसंस्कृती

ए. एम. टी. जॅक्सन


अनुवाद : डॉ. आसावरी उदय बापट

**मूळ किंमत ₹ २५० । सवलतीत ₹ २००**

'युवक क्रांती दल' ह्या संघटनेतील एका कार्यकर्त्याचे
चळवळीतील दिवस सांगणारे आत्मकथन.

## युक्रांदचे दिवस

विजय दर्प



**मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०**

जे. कृष्णमूर्ती यांच्या जीवनचिंतनाचा परिचय करून देणारे पुस्तक

## मला उमजलेले जे. कृष्णमूर्ती

हेमकिरण पत्की

**मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०**



**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९९७६

www.padmagandha.com वेबसाईटवर ऑर्डर पाठवा. पद्मगंधाच्या सर्व पुस्तकांवर २०% सूट मिळवा.

स्नेहसंमेलनात बसवलेली नाटकं यांचं माझ्या नंतरच्या जडणघडणीत खूप मोठं स्थान आहे असं मला वाटतं.

नाटकाचं हे वेड जोपासतानाच मी ग्रेडपरीक्षा दिली होती. चांगली चित्रंदेखील काढू लागलो होतो. वाचन तर अधाशासारखं चालूच असायचं. मला आठवतंय एका वर्षी प्रत्येक वर्गानं आपापलं हस्तलिखित तयार करण्याची कल्पना निघाली. अभ्यास सोडून सर्वच बाबतीत माझा पुढाकार असल्यानं आमच्या वर्गाचं हस्तलिखित तयार करण्यात मीच पुढाकार घेतला. मीच त्याचा संपादकदेखील होतो. आणि एक छानसं हस्तलिखित मासिक आम्ही तयार केलं. चित्रांची आवड पहिल्यापासूनच असल्यामुळे त्यात माझी काही चित्रं प्रसिद्ध झाली होती.

वाचनाचा नाद असल्यामुळे मी कवितादेखील करू लागलो होतो. त्यातली एक दिवाळीवरची माझी कवितादेखील त्या अंकात प्रसिद्ध झाली होती. या आमच्या अंकाचं खूप कौतुक झालं होतं. हस्तलिखितांच्या प्रदर्शनात तो साऱ्यांच्या कौतुकाचा विषयदेखील ठरला. पण प्रदर्शन संपल्यावर तो अंक एकदा उघडून पाहिला तेव्हा मला धक्काच बसला. कारण माझ्या कवितेच्या पानावर कवितेच्या खाली असलेल्या माझ्या नावाच्याआधी वर्गातल्या कुणीतरी व्रात्य मुलानं चोर कवी, चोर संपादक असं लिहून ठेवलं होतं. ज्यानं कुणी चेष्टेनं, गंमतीनं किंवा जाणूनबुजून हे कृत्य केलं होतं त्याला आपण काय केलंय याची तेव्हा कल्पनादेखील नसेल पण माझ्यावर मात्र बाल वयातदेखील त्या घटनेचा खूप मोठा परिणाम झाला असावा. कारण इतक्या वर्षानंतर देखील मी ती विसरू शकलेलो नाही.

शाळेतले त्यावेळच्या वर्गातले आम्ही सारे विद्यार्थी पुन्हा जवळजवळ तब्बल चाळीस - बेचाळीस वर्षानं गेल्या वर्षाच्या प्रारंभी जेव्हा एकत्र आलो, त्याप्रसंगी बोलताना मला ती घटना पुन्हा एकदा आठवलीच. ती सारी आठवण सांगितल्यावर मी म्हटलं, ज्यानं हे कृत्य केलं तो आता काय करतो हे मला ठाऊक नाही. मला ठाऊक असण्यासारखं जर त्यानं काही केलं असतं तर मला ते निश्चितपणे समजलं असतं. कारण मी आयुष्यातली तब्बल २० वर्षं पूर्णवेळ पत्रकारितेत काढली. पण त्याच्या त्या वेळच्या त्या कृत्यानं मला मात्र त्याच क्षेत्रात कार्य करण्यास निश्चितपणे प्रवृत्त केलं. आज मराठीतल्याच नाही तर कदाचित संपूर्ण भारतीय भाषांमध्येदेखील सर्वात महागडा ठरू शकेल अशा अंकावर माझं संपादक म्हणून नाव आहे हे आता मी अगदी अभिमानानं सांगू इच्छितो. हे वाक्य मी उच्चारलं आणि जमलेल्या बालमित्रांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आयुष्यात घडलेल्या साऱ्याच घटना आपल्याला आठवतातच असं नाही. पण काही घटना मात्र नुकत्याच घडलेल्या घटनांसारख्या आयुष्यभर सदैव स्मरणात राहतात. इतकंच नाही तर आपल्याकडून बरंवाईट काम करून घेण्यास प्रवृत्तदेखील करत राहतात.

***

माझं आजोळ गिरगावातलं. आजी-आजोबांचा मी लाडका असल्यानं सुट्टीत माझा मुक्काम गिरगावातच असायचा. चेंबूरहून आठ नंबरची बस पकडून सायन म्हणजे शीव आणि सायनहून ६६ नंबरच्या डबल डेकर बसमध्ये पहिल्या सीटवर बसून थेट गिरगावात असा तो छान प्रवास असायचा. आजीच्या शेजारी राहणारे गृहस्थ साहित्य संघ मंदिरात नोकरी करत. त्यांच्यामुळे साहित्य संघ मंदिरात होणारी कुठलीही नाटकं पाहायला मला मुक्तद्वार असे. लहान मुलांची सर्वच आणि मोठ्यांची महत्वाची नाटकं याच संघ मंदिराच्या नाट्यगृहात मी पाहिली.

गिरगाव त्या काळात सांस्कृतिकदृष्ट्या मुंबईच्या केंद्रस्थानी होतं. ठाकूरद्वारपासून प्रार्थना समाजपर्यंतच्या रस्त्यावर फिरत असताना अनेक नामवंत मंडळी जातायेता सहज दिसत असत. कधी कधी राहून माझ्या मनात विचार येतो, चित्रकार गायतोंडे यांच्यावर आपण एवढं काम केलं पण त्यांना आपण साधं कधी पाहिलंदेखील नाही असं आपण म्हणतो खरं. पण कशावरून आपण गायतोंडे यांना पाहिलं नसेल? कारण माझं आजोळ ज्या देनाबाडीत होतं तिथून ते प्रार्थना समाज आणि इकडे रॉक्सी सिनेमापर्यंत माझा फिरण्याचा परिसर होता. या काळात चहा-नाश्त्याचे कार्यक्रम व्हायचे ते वीरकर, कोना किंवा मॉडर्न अथवा तांबे, पणशीकर, कुलकर्णी उपाहारगृह याच ठिकाणी आणि इथंच तर गायतोंडे ७१-७२ साली मुंबई सोडेपर्यंत आपल्या मित्रमंडळींसमवेत गप्पा मारत बसलेले असायचे. याच काळात मी गिरगावात आजीकडे पडलेलो असायचो. कशावरून नसेन मी गायतोंडे यांना या ठिकाणी पाहिलं? आपल्या आयुष्यात अनेक गोष्टी कळत न कळत घडत असतात. आपल्यावर प्रभाव टाकून जात असतात. गायतोंडे आणि भास्कर कुलकर्णी यांच्यासंदर्भात बऱ्यापैकी काम माझ्या हातून घडलं पण त्यांच्याशी प्रत्यक्ष परिचय होण्याचा किंवा पाहण्याचा योग कधी आला नाही. पण आधी गिरगावात आणि नंतर कलावर्तुळात मी त्यांना निश्चितपणे पाहिलेलं असणार. फक्त त्यावेळी ते हेच हे मला ठाऊक नसणार, असं आता यावर सतत विचार करत असताना मला वाटत राहतं. मला वाटतं आपण जे जगत असतो, कळत वा नकळत जे जे म्हणून अनुभव घेत असतो, त्या साऱ्याचा परिणाम आपल्या आयुष्यावर होत असतो. म्हणूनच आपल्या आयुष्यात बऱ्या वा वाईट गोष्टी घडत जात असतात. आणि त्याला आपण मग 'नियती' वगैरे संबोधतो.

आजोळी गिरगावात गेलं म्हणजे पहिलं काम असायचं ते म्हणजे साहित्य संघात कुठल्या कुठल्या नाटकाचे प्रयोग लागणार आहेत हे आधी पाहणं, फोर्टमधल्या चित्रपटगृहात कुठले कुठले सिनेमे आहेत ते पाहणं, सकाळी मरीन ड्राईव्हवर फिरायला जाणं, (मरीन ड्राईव्हच्या रस्त्यावर तेव्हा रोज पाण्याचा टँकर येऊन रोज तो रस्ता धुवून काढायचा. हे दृश्य मला आजही आठवतं. मुंबईत असं काही होत असे असं जेव्हा मी आता सांगतोय ते हल्लीच्या पिढीतल्या अनेकांना खरं देखील वाटणार नाही.) संध्याकाळी चौपाटीवर फिरायला जाणं हे रोजचंच होतं. सूर्याचा केशरी गोळा क्षितिजावर बुडेपर्यंत पाहायचा आणि मग परतायचं असा रिवाज होता. त्या काळात मरीन लाईन्सला स्ट्रीट लाईट म्हणून गॅसच्या

बत्त्या होत्या. खाकी कपड्यातली माणसं त्यातली एकेक बत्ती पेटवत जाताना दिसत. गिरगाव पुलावर चढलं की, नरिमन पॉईन्टपासून वाळकेश्वरपर्यंतचा गॅस बत्त्यांनी प्रज्वलित झालेला परिसर पाहणं मोठं रमणीय दृश्य असे.

तेव्हा 'महाराष्ट्र टाईम्स' नुकताच सुरू झाला होता. आजोबांकडे तोच येत होता. त्या घरात पाऊल टाकल्याबरोबर उपलब्ध असलेले महाराष्ट्र टाईम्सचे सर्व अंक तारीखवार लावून घेणं आणि नंतर शांतपणं एकएक वाचून बाजूला टाकणं असा माझा एकूण कार्यक्रम असे. चेंबूरला आमच्या घरी नवशक्ती येत असे. आजूबाजूच्या घरात देखील नवशक्तीच वाचला जायचा. त्यामुळे आजोबांच्या घरी आल्याबरोबर 'महाराष्ट्र टाईम्स' अधाशासारखा वाचून काढणं हा माझा एक कलमी कार्यक्रम असे. नवशक्तीच्या तुलनेत महाराष्ट्र टाईम्समध्ये पानंही भरपूर असत. आणि मुख्य म्हणजे बातम्या सविस्तर असत. अगदी सगळ्याच प्रकारच्या बातम्या. शिवाय नाटक, संगीत, चित्रपट, साहित्य, चित्रकला या विषयांवर अनेकजण जे लिहीत असत ते लिखाण मला समकालीनतेची नवी दृष्टी देत असे.

वेगवेगळ्या क्षेत्रात काय चाललंय त्याचं भानही महाराष्ट्र टाईम्समुळे मला निश्चितपणे येत असे. शंकर सारडा यांचं नाव किंवा त्यांचं लिखाण मला आजही स्मरतं. त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांमुळे खूप नव्या नव्या गोष्टींचं भान मला येत गेलं असावं असं आज मला मागं वळून पाहताना सतत वाटत राहतं.

हे जे काही मी सांगतो आहे ते सारं चौथी किंवा पाचवी ते अकरावीपर्यंतच्या कालखंडातलं आहे. आज इतक्या वर्षानं त्या साऱ्याकडे मी अत्यंत अलिप्तपणाने पाहतो आहे. तेव्हा ते मला अगदी मनापासून जाणवतं आहे. कधी कधी या साऱ्याचं मलादेखील आश्चर्य वाटतं.

पण जे लिहिलं आहे ते सत्यच आहे. वर एक उदाहरण दिलंच आहे नवशक्तीच्या कात्रणाचं. १९६६ सालातली ती लहान मुलांची पुरवणी आजही माझ्या संग्रहात आहे. आणखीन एक उदाहरण देतो, छोटंसंच. थोड्याशा वेगळ्या संदर्भातलं. संगीताचं वेड मला लहानपणापासूनच होतं. याला मुख्य कारण रेडिओ होता. आणि दुसरे कारण होते माझे मामा. पुरुषोत्तम आंबेरकर त्यांचं नाव. ते तबला वाजवत. त्यांचा चेंबूरमध्ये एक ग्रुप होता. मोहन काशीकर हे या ग्रुपचे अर्ध्वयू. ते सुरेख गात. त्यांचं लेटरहेड मला आजही आठवतं. रेडिओस्टार मोहन काशीकर असा त्यावर उल्लेख असे. त्या काळात आकाशवाणीवर काम करणारे सारेच आपला उल्लेख रेडिओस्टार असा करत. शनिवारी रात्री किंवा रविवारी त्यांच्या छोट्या मोठ्या मैफिली चालत. चेंबूर नाक्यावरच्या विजय सिनेमासमोर राहणारे ए. पी. नारायणगावकर स्वतःचा क्लास चालवीत आणि असंख्य छोट्या मोठ्या मैफिलींचं आयोजन करीत. शास्त्रीय संगीताचा चेंबूरमधला कुठलाही कार्यक्रम असो, तो या मंडळीच्या उपस्थितीशिवाय पार पडत नसे. एकदा तर मामांनी मला गिरगावात बालगंधर्वांच्या कार्यक्रमाला देखील नेल्याचं आठवतं.



'अशी पाखरे येती'मध्ये कल्पना देवळणकर आणि डॉ. जब्बार पटेल हा प्रयोग माझ्या एकूणच जाणीवा विस्तारणारा ठरला.

बालगंधर्व जिथं उतरले होते, तिथं त्यांनी आधी मला नेलं. त्यांचे ते बहुदा अखेरचे दिवस असावेत. खूप थकलेले वाटले मला ते. खाकी अर्ध्या विजारीतले बालगंधर्व आणि त्यांचं ते 'जोहार मायबाप जोहार' आजही अगदी मला जसंच्या तसं आठवतं.

❁❁❁

चेंबूरच्या बालविकास मंदिरात त्या काळी खूप मोठ्या मैफिली होत. मला वाटतं, अल्लादिया खाँ महोत्सव असावा. या मैफिली रात्ररात्र चालत. अनेकदा पहाटेपर्यंत-देखील. या मैफिलींना मामा मला नेत असत. त्यामुळे आपोआपच माझा शास्त्रीय संगीताचा कान तयार झाला होता. खूप थोरामोठ्या गायकांच्या मैफिली मला तिथं जवळून ऐकता आल्या. आता त्यातली भीमसेन जोशी, राम मराठे, सुरेश हळदणकर, माणिक वर्मा, नीलाक्षी जुवेकर अशी मोजकीच नावं मला आज आठवतात. पण अशा खूपच मोठ्या गायकांचं गाणं ऐकायची संधी तेव्हा त्या वयात मला मिळाली होती हे निश्चित. तेव्हा केलेली रात्रीची जागरणं मात्र लख्ख आठवतात. क्वचित कधीमधी डुलक्या लागायच्या. पण त्यानंतर घेतलेला गरमागरम चहा मात्र झोप उडवून टाकायचा. अशाच मैफिली नारायणगावकरांच्या सुंदर कौलारू घरात अनेकदा ऐकल्या. काशीकरांच्या घरातल्या मैफिलीतही मी अनेकदा सामील झालो. त्या काळात आकाशवाणीवर सतत सुगम किंवा शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम होत. ते बहुतांशी सारेच्या सारे मी ऐकत असे. किंबहुना त्या काळातलं सारं भावजीवन हे आज जसं मोबाईलशी बांधलं गेलं आहे तसं त्या काळात रेडिओशी बांधलं गेलं होतं. मुंबई अ, मुंबई ब (बाळ कुडतरकर, नीलम प्रभू, प्रभाकर जोशी, लीलावती भागवत), पुणे केंद्र (सादरकर्ते पुरुषोत्तम जोशी), पणजी केंद्र (कोकणीतल्यान खुबरो देता), दिल्ली केंद्र (विश्वास मेहेंदळे आपणास बातम्या देत आहेत), विविध भारती (फौजी भाईयो, जयमाला), रेडिओ सिलोन (बिनाका गीत माला, अमीन सयानी) आणि न जाणो, लागणारी भारतातली असंख्य आकाशवाणी केंद्रे

ही त्या वेळच्या जगण्याचा जणू भागच बनली होती. अहोरात्र मी रेडिओ ऐकत असे. शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, नाट्य, चित्रसंगीत यांचे सर्वच्या सर्व कार्यक्रम मी आवर्जून ऐकत असे. आज जसा टीव्ही आपल्याला (आता टीव्ही जाऊन त्याची जागा देखील आधी इंटरनेट आणि मग मोबाईल घेऊ लागलं आहे. किंबहुना ती जागा त्यानं पटकावली देखील आहे.) जगाचं दर्शन घडवतो तसं त्या काळात रेडिओ साऱ्या जगाचं दर्शन घडवीत होता. विविध भारतीवर तेव्हा चालणारे 'कोहिनूर : गीत गुंजार'सारखे कार्यक्रम आजही आठवतात. सोनीच्या कॅसेट्सवर त्यातले कित्येक कार्यक्रम मी टेपही करून ठेवले होते. कधीतरी काढून ते आता ऐकायला हवेत. त्या कॅसेट एकवेळ चालतील पण ज्यात घालून ती चालवायची ती यंत्रं आता कुठून आणायची असा माझ्यासमोर मोठा प्रश्न आहे. कारण त्या ७०च्या दशकातली खूप महत्त्वाचे आकाशवाणी संगीत संमेलनाचे राष्ट्रीय कार्यक्रम, कोहिनूर गीत गुंजारसारखे रेडिओ कार्यक्रम, नभोनाट्याचे कार्यक्रम आणि मोहनतारा अजिंक्यपासून गजानन वाटवे यांच्यापर्यंतच्या असंख्य गायकांची गाणी त्यात मी टेप करून ठेवली होती. आता इतक्या वर्षांनं त्या काळाशी मला कुठंतरी स्वतःला जोडून घ्यायचे आहे. यातलं काय हाती लागणार आहे कुणास ठाऊक?

पण मला हे एकदा करून पाहायचंय. मला आठवतंय, माझ्या घरातदेखील पूजा वगैरे निमित्तानं एक दोन मैफिली झाल्या होत्या. लहानपणी त्या मैफिलींचे पाहिलेले फोटोदेखील आठवतात. पण आता ते सारे कुठं असतील कुणास ठाऊक?

या निमित्तानं एक आठवण सांगावीशी वाटते. काल परवा जुनी कात्रणं चाळत असताना एक महाराष्ट्र टाईम्सचं कात्रण मला सापडलं- १४ फेब्रुवारी १९७४ तारखेचं. उस्ताद अमीर खाँ यांचं अपघातात अकाली निधन झालं त्याची ती बातमी आहे. अमीर खाँ साहेबांचं गाणं तेव्हाही मला प्रचंड आवडायचं. आणि ज्यांची कला आपल्याला आवडते त्यांची माहिती जमवणं हा माझा पहिल्यापासूनचाच छंद होता.

अमीर खाँ साहेबांचा मारवा मला आजही अस्वस्थ करतो. त्यांचा चांदनी केदार ऐकला म्हणजे आजही मला सभोवताली चांदणी रात्र असल्याचा भास होतो. त्यामुळे आजही त्यांच्या मृत्यूच्या बातमीचं कात्रण मला कचऱ्यात टाकवत नाही. त्यांच्याविषयीच्या भावना व्यक्त करण्याचं ते माध्यम आहे असं मी समजतो. आणखीन एक उदाहरण सांगतो. त्यावरून माझा मुद्दा आणखी स्पष्ट होईल. गुरुदत्त यांचं निधन झालं १० ऑगस्ट १९६४ रोजी. ११ ऑगस्टचं त्यांच्या मृत्यूची बातमी देणारं कात्रण आजदेखील माझ्या संग्रहात आहे. तेव्हा मी फक्त नऊ वर्षांचा होतो. गुरुदत्त तेव्हाही आवडता कलावंत होता. त्याचा 'प्यासा' पाहून आनंद झाला होता. आणि 'कागज के फूल' पाहून प्रचंड अस्वस्थपणा मनात निर्माण झाला होता. का हा चित्रपट पडला? असा बालसुलभ प्रश्न मला त्या काळात पडला असावा. त्या प्रश्नाचं उत्तर कधीच मिळालं नाही. आणि रेडिओवर त्याच्या निधनाची बातमी ऐकली आणि भयंकर दुःख झालं, अक्षरशः कोसळल्यासारखं वाटलं.

मृत्यू हा प्रकार तेव्हा खूप भयंकर वाटायचा, भीषण वाटायचा. रस्त्यावरून एखादी प्रेतयात्रा जाताना दिसली तरी मनात भय दाटून यायचं. अपघात पाहायला मन धजावायचं नाही. आज अगदी उलटं झालंय. एखादा मरत असेल तर आपल्यातले बहुसंख्यजण मोबाईल घेऊन फोटो काढायला धावतात. अष्टोप्रहर टीव्हीच्या पडद्यावर चाललेल्या मालिका, बातम्या आणि चित्रपटांमधली मृत्यूची, अंत्ययात्रेची तसेच अंत्यदर्शनाची दृश्यं आपण अत्यंत शांतपणे चहा घेत, नाश्ता संपवत किंवा जेवतानादेखील बघू शकतो. तेव्हा मात्र तसं नव्हतं.

ठाऊक असलेलं कुणी गेलं म्हणजे स्मशानवैराग्य दाटून यायचं. गुरुदत्त गेल्यावरही तेच झालं. त्यामुळे आजही त्याची बातमी टाकावीशी वाटत नाही. आजही त्याच्यासोबत आपली असोसिएशन्स तशीच त्याच्या चित्रपटासारखीच टवटवीत राहायला हवी असं मनापासून वाटतं. इतकंच नाही तर नंतर त्याची पत्नी गीता दत्त गेली, त्याच्या दोन्ही मुलांचाही अत्यंत दुर्दैवी पद्धतीनं शेवट झाला.

त्याही बातम्या आजही माझ्या संग्रहात आहेत. कोण होता तो माझा? पण त्यानं त्याच्या कलेद्वारा माझ्याशी जोडलेला संबंध मला आजही खूप मोठा वाटतो, मरेपर्यंत जपावासा वाटतो. मला वाटतं, कलावंताच्या कलेचं श्रेष्ठत्व यातच मोजलं जातं आणि यातच मोजलं जायला हवं. आजही 'वक्तने किया क्या हसी सितम'चे सूर अलगद वाऱ्यासोबत येऊन कानावर पडले की, बालपणीचा तो सारा रम्य काळ आठवतो आणि हातून बरंच काही करायचं राहून गेलं, या भावनेनं एक प्रकारची विलक्षण अस्वस्थ हुरहूर मनात दाटून येते.

***

१९६८ साली आम्ही चेंबूर सोडलं. वडिलांनी कुर्ला आणि शीवच्या मधे असलेल्या चुनाभट्टी नावाच्या गावात ब्लॉक घेतला. आज आता चुनाभट्टी बऱ्यापैकी सुधारली आहे पण तेव्हा मात्र ते गावच होतं. साहजिकच तिथं जम बसायला थोडासा वेळ लागला. आता शाळेत ट्रेननं चेंबूरला जाणं होऊ लागलं. शाळा दुपारी सुटायची, त्यामुळे वाचनालयात जाणं देखील अवघड होऊ लागलं. एके दिवशी शोध लागला की, कुर्ल्यातही चांगलं वाचनालय आहे. कुर्ल्याच्या पश्चिमेला आकाश थिएटरच्या बाजूला मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाची शाखा होती. तिथून मी पुस्तकं आणि अंक वाचायला घेऊन येऊ लागलो. खूप पुस्तकं वाचली तिथं. तिथले ग्रंथपालही खूप चांगले होते. पटकन पुस्तकं काढून देत. चेंबूरसारखं इथंही दिवसातून दोनदा पुस्तकं बदलायला आलो तर तेही दटावत. तिथली माझी एक छान आठवण आहे. १९८१ साली माझा जेजे स्कूलचा अभ्यासक्रम मी संपवला. त्याच वर्षी माझ्या चित्रांचं जहांगिरमध्ये प्रदर्शन भरलं होतं आणि त्याच वर्षी माझ्या चित्राला अडीच हजाराचा राज्यपुरस्कार देखील मिळाला. अडीच हजार ही



'उन्मेष'तर्फे घेतल्या जाणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभानंतर मध्यरात्री कधीतरी स्पर्धेच्या कार्यकर्त्यांचं घेतलेलं एक प्रकाशचित्र. खुर्चीवर बसलेले डावीकडे वंजारी, शेजारी मी, विसू कामेरकर, गिरीधर मोरे, सुबोध गाडगीळ, विश्वास जोशी, मागे उभा सुरेश वैद्य, त्याच्या शेजारी वीस्कर (नंतरची दोन नावं आठवत नाहीत.) मिसेस आपटे, पुष्पा वैद्य, मागे उभा बाळ मोघे आणि अन शेजारी जुईली देऊसकर. खाली बसलेले मेहेंदळे, विनय आपटे, सुहास पळशीकर, जयंत ओक, अच्युत वझे, विवेक लागू, जयंत कसगुटकर आणि नरेश नातू.

रक्कम त्या काळात खूपच मोठी होती. जहांगीर आर्ट गॅलरीमधल्या पारितोषिक वितरण समारंभातून बक्षीस घेऊन खाली उतरलो तर समोरच कुर्ल्याच्या ग्रंथ संग्रहालयाचे ग्रंथपाल हसतहसत अभिनंदन करायला समोर उभे. म्हणाले, आता आम्हाला कळलं, तू एवढं का वाचायचास. आमच्याकडून पुस्तक देताना कधी काही चूक झाली असेल तर माफ कर. सामंत त्यांचं नाव. आजही आठवतं.

शालेय शिक्षण संपवल्यावर मी जेजेत प्रवेश घ्यायचा निर्णय घेतला. माझ्या शेजारच्या ब्लॉकमध्ये पण दुसऱ्या विंगमध्ये जोशी कुटुंब राहायला आलं होतं. हे जोशी मूळचे गोव्याचे. त्यांचा मुलगा प्रदीप हा जेजे अप्लाईडमध्ये शिकत होता. दिवसा तो कुठंतरी नोकरी करायचा पण सकाळ-संध्याकाळ मात्र जेजेचा कोर्स करायचा. हा प्रदीप दिसायला भलताच देखणा होता. मस्त हाईट, गोरापान, बुल्गानीन दाढी वगैरे राखायचा. त्याच्यासोबत दिलिप ढेरे नावाचा त्याचा मित्रदेखील राहायचा. हा दिलीपदेखील त्याच्यासोबत जेजेत शिकायचा. मला आठवतंय या प्रदीपकडे त्याचा गोव्यातला नातेवाईक कधीमधी येऊन राहायचा. बहुदा महेश नमशीकर हे त्यांचं नाव असावं. हे नमशीकर गोवा हिंदू असोसिएशनच्या 'मत्स्यगंधा ' वगैरे नाटकात काम करीत. तर या प्रदीपनं एके दिवशी माझं बौद्धिक घेतलं. त्यानंच मला पहिल्यांदा जेजेविषयी सांगितलं. म्हणाला तुझं वाचन चांगलं आहे, चित्रंही चांगली काढतोस. आता तुझं तूच ठरव जेजेत जायचं की रुईयाला. आणि मला विचारशील तर मी सांगेन जेजेलाच ये. मग मी वडिलांशी विस्तारानं बोललो. तुझं तूच ठरव, पण जे काही निवडशील ते अगदी मनापासून निवड आणि मनापासून पूर्ण कर. अशा तऱ्हेनं मी जेजेच्या परिसरात प्रवेश केला. प्रवेश अर्ज घ्यायला कार्यालयात गेलो तर तिथं मला पहिलं दर्शन घडलं ते मीना सुखटणकरचं म्हणजे आताची मीना नाईक.

तीदेखील जेजेचीच. मीना तेव्हा भलतीच फॉर्मात होती. तिचं बहुदा 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रं' तेव्हा खूप गाजत होतं. मीनाला पाहिलं आणि माझ्या लक्षात आलं की, आपण योग्य ठिकाणीच पोहोचलोय. पण पहिल्यावर्षी खूप उशीर झाल्यानं मला जेजेमध्ये काही प्रवेश मिळाला नाही. मग मी करियर नावाची एक इन्स्टिटयूट होती तिथं प्रवेश घेतला. फाउंडेशनचा अभ्यासक्रम मी तिथूनच पूर्ण केला. करियरच्या दोन शाखा होत्या. एक होती दादरला, खोदादाद सर्कलमध्ये तर दुसरी होती बोरीबंदरला, एम्पायर सिनेमासमोरच्या भरडा हायस्कूलमध्ये. आणि मी शिकत होतो भरडा हायस्कूलमधल्या शाखेत. तिथून जहांगीर आर्ट गॅलरी जवळ होती, सगळी चित्रपटगृहं जवळ होती, माझं आजोळदेखील जवळ होतं. तेव्हा विविध लेक्चर्समुळं आम्हाला अनेकदा दादरच्या शाखेत जावं लागत असायचं. साहजिकच दादरमध्येदेखील माझा मनसोक्त फेरफटका होऊ लागला होता. असंच फिरतफिरत एकदा मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातल्या संदर्भ विभागाकडे जाणं झालं. तिथं एक बोर्ड लिहिलेला होता, विजय तेंडुलकरांच्या भाषणाचा. काय मनात आलं कुणास ठाऊक, मी सरळ जाऊन त्या भाषणाला बसलो.

मघा आणखीन एक सांगायचं राहून गेलं. ते म्हणजे, माझी एक मावशी गावदेवीला राहायची. साहजिकच आजोळी गेलो म्हणजे तिच्याकडे एक फेरफटका असायचाच. मावसभाऊ माझ्या वयाचेच. त्यामुळे त्यांच्याशी माझं छान जमायचं. त्यांच्याकडे जाण्यात एक आकर्षण मला असं असायचं की, त्यांच्याकडे दररोज 'मराठा ' येत असे. आचार्य अत्र्यांचा तो पेपर मला त्याकाळी खूप आवडायचा. त्यातले अग्रलेख वाचण्यात दिवस कसा निघून जायचा कळायचंदेखील नाही. 'नवयुग'देखील मी आवर्जून वाचायचो. मराठातले अत्र्यांच्या भाषणाचे वृत्तांत तर मला प्रचंडच आवडायचे. त्यांचा गाजलेला चित्रपट 'श्यामची आई' मी आधीच पाहिला

होता. अत्र्यांची नाटकं तर त्या काळात मला अतिशय प्रिय होती. 'मोरूची मावशी', 'उद्याचा संसार', 'बुवा तेथे बाबा', 'तो मी नव्हेच', 'डॉ. लागू' किती म्हणून नावं सांगावीत. ती सारीच्या सारी मी पाहिली होती. कऱ्हेच्या पाण्याचे खंडच्या खंड मी वाचले होते. (अत्रे गेले तेव्हा असेन मी १३ – १४ वर्षांचा. पण त्यांच्या जाण्यानं मला प्रचंड दुःख झालं होतं. आम्ही चेंबूर सोडून नुकतेच चुनाभट्टीत राहावयास आलो होतो. त्यादिवशी प्रचंड पाऊस कोसळत होता. सर्वत्र पाणी साठलं होतं. चुनाभट्टीतलं एकूण वातावरणच असांस्कृतिक असल्यानं अत्र्यांच्या मृत्यूविषयी कुणाशी बोलावं हेच मला कळत नव्हतं. आज अजूनही इतक्या दिवसानंतर देखील तो दिवस मला जसाच्या तसा आठवतो.) याच मराठा किंवा नवयुगमध्ये कधीतरी तेंडुलकरांची ओळख झाली. आणि मग तेंडुलकरांच्या मिळतील तेवढ्या एकांकिका, नाटकं मी वाचनालयातून मिळवून वाचली. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात त्यांचा बोर्ड पाहिल्यावर मी जो त्यांच्या भाषणाला बसलो त्याला ही पार्श्वभूमी होती. तेंडुलकरांच्या त्या भाषणानं एक नवं दालन माझ्यासाठी उघडलं गेलं होतं. आणि मग मी सातत्यानं मुंबईत होणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहू लागलो- ज्यात भाषणं, चर्चा आणि परिसंवादांचा समावेश होता.

***

वर मी लिहिलंय की, चुनाभट्टीतलं वातावरण असांस्कृतिक होतं. होय, ते खरंच होतं, पण चुनाभट्टीत मराठी साहित्य विश्वात ज्यांच्या कर्तृत्वाचा दबदबा होता ते 'सत्यकथे'चे संपादक राम पटवर्धन राहात. प्रख्यात रेखाचित्रकार बाळ ठाकूरही याच चुनाभट्टीतले आणि एका सोसायटीतले, म्हणजे समर्थनगरमधले. त्याच समर्थनगरमध्ये आमचा एक नाटकवाला मित्र राहत असे. तो म्हणजे जयंत कोपरकर, जो उन्मेषच्या 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक'मध्ये होता. जयंत आणि मी बहुतेकदा बोरीबंदरपर्यंतचा प्रवास एकत्र करत असू. बाळ ठाकूरांचा आणि माझा परिचय मी चुनाभट्टी सोडल्यावरच अधिक झाला. पण राम पटवर्धन यांच्याशी मात्र कसं कुणास ठाऊक, त्यांच्याविषयीच्या आदरयुक्त भीतीमुळे फारसं जमलं मात्र नाही हेच खरं. जेजेमध्ये असताना मी 'वेध' नावाचं एक टंकलिखित मासिक चालवत असे. श्रीराम खाडिलकर आणि मी असे दोघं मिळून तो सारा उपद्व्याप करीत असू. या अंकांमुळे माझा आणि चित्रकार बरवेंचा परिचय झाला. याच अंकामुळे वानखेडे, आडिवरेकरांशी परिचय झाला. या साऱ्यांनी एकेक रुपया देऊन 'वेध'चे अंक विकत घेतले होते. नंतर त्या संदर्भात माझ्याशी चर्चादेखील केली होती. पण त्यातनं निर्माण होणारे आर्थिक व्यवहार मनस्ताप फारच वाढवू लागले. तेव्हा मग कुठे आम्ही ते प्रकाशन थांबवलं, पण आज आघाडीवर असलेले सारे चित्रकार त्या काळी त्यात लिहित असत. एकदा कधीतरी मी राम पटवर्धन यांच्याविषयी त्यात तिरकस कमेंट्स केल्या होत्या. त्यामुळे त्यांना भेटायचं म्हणजे मला जराशी धाकधूकच वाटायची. आठवड्यातून एकदोनदा तरी मी रामभाऊंना चुनाभट्टी स्टेशनवर पाहत असे. गाडी येईपर्यंत रामभाऊ शांतपणे आपलं संपादनाचं काम करीत असत. ते नसलं तर त्यांचं वाचन चालत असे किंवा लेखकांना टाकायची पत्रंदेखील ते स्टेशनवरच लिहित असत. खांद्यावरच्या झोळीमधून एकएक लेख काढून वाचणारी रामभाऊंची मूर्ती आजही जशीच्या तशी आठवते. माझ्यावर ज्या संपादकांच्या कर्तृत्वाचा प्रभाव आहे त्यातले रामभाऊ एक निश्चित होत. पण असं असलं तरी आपल्याजवळ ते रहात आहेत तर त्यांना आपण वेळीअवेळी जाऊन त्रास द्यावा असं मात्र मला कधी वाटलं नाही.

हा कदाचित माझ्यातल्या एका विचित्र न्यूनगंडाचा भाग असावा असं मला आज विचार करताना वाटतं. कारण तसं नसतं तर चित्रकार प्रभाकर बरवे जे माझ्या घरापासून अक्षरशः पंधरा मिनिटांवर राहत किंवा त्याच्या आणखीन दहा मिनिटं पुढच्या अंतरावर अशोक जैन राहत किंवा झालंच तर दिनकर गांगल राहत किंवा जगन फडणीस राहत. हे सारे तेव्हाचे अगदी स्टॉलवर्झ्स. पण नाही मी त्यांच्याशी कधी जवळीक साधू शकलो. गांगल यांच्याशी माझा छान परिचय झाला होता. 'ग्रंथाली'साठी त्यांनी मला एक-दोन लेखही लिहायला सांगितले होते. 'ग्रंथाली'च्या कार्यक्रमांना वगैरे ते मला सतत बोलवत, पण नाहीच जमलं मला कधी ते. हा माझ्यातल्या एकांड्या विचित्र स्वभावाचा भाग असावा असं मला नंतर विचार करताना वाटत असे. पण इतकी जाणीव होऊन त्यात सुधारणा कधी ती झालीच नाही. मला आठवतंय जेजेत प्रवेश घेतल्यापासून एखादा तरी रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी मी पायावर पाय टाकून निवांतपणे बसलो आहे असं फारच क्वचित घडलं असावं. किंबहुना नाहीच. त्या काळात रविवारी तर माझ्याकडे १५-१५ – २०-२० पेपर्स येत. ते चाळणं, त्यातलं महत्वाचं वाचणं, लेखाच्या अनुषंगाने किंवा संदर्भासाठी कात्रणं काढणं यातच तो सारा रविवार जात असे. नंतरच्या काळातदेखील नाटक, साहित्य, चित्रपट, संगीत, समाजकारण, पत्रकारिता, राजकारण इत्यादी सगळ्याच क्षेत्रातील दिग्गजांचा मला अगदी खूपच जवळचा सहवास लाभला. पण नाही जाता आलं त्यांच्या फारसं जवळ. किंबहुना व्यक्तिशः तोटा निश्चितच झाला. पण त्याविषयी खंत करावी असं काही मला आता वाटत नाही. जाताजाता एक किस्सा सांगावासा वाटतो. 'चिन्ह'चा अंक वाचून एकदा अशोक जैन यांचा फोन आला. जवळ जवळ अर्धा-एक तास ते अंकाविषयी बोलत होते. तोपर्यंत ते महाराष्ट्र टाईम्समधून निवृत्त झाले होते. 'चिन्ह'मुळे एकूणच ते भारल्यासारखे झाले होते. नंतर तर वरचेवर ते फोन करू लागले. अर्धाअर्धा तास ते गप्पा मारू लागले. त्यांनी एके दिवशी मला विचारलं देखील की, तुम्ही असे साऱ्यापासून अलिप्त कसे राहू शकता? अधनंमधनं भेटत देखील का नाही? तेव्हा मग मी त्यांना हा माझा एकूण दृष्टीकोन सांगितला. तर त्यावर ते म्हणाले, हे सगळं बरोबर आहे, पण त्यानं नुकसान तुमचंच होतंय. आता असं करा, उद्या आणि माझ्याकडे चहाला या.


असं दोनचार वेळा तरी त्यांनी मला निमंत्रण दिलं. पण मला

नाहीच जमलं ते. आणि नंतर तर ते गेलेच. तेंडुलकरांचं देखील असंच झालं. माझ्या पत्नीला कधीतरी ते जहांगीरला भेटले. विचारू लागले, काय म्हणताहेत 'चिन्ह'चे संपादक? त्यांना सांगा की आम्ही फॅन आहोत त्यांचे. एकदा तुम्ही दोघं माझ्याकडे चहाला याच, खूप गप्पा मारू. असं त्यांनी निमंत्रणही दिलं. तेही कधी नाहीच जमलं मला. आणि नंतर तेही गेलेच. या साऱ्या प्रकारांकडे मी जेव्हा अलिप्तपणाने पाहतो तेव्हा माझ्या असं लक्षात येतं की, मी हाती घेतलेलं काम हे माझा दिवस न् दिवस पिच्छा करतं. दिवसाच्या चोवीस तासात ते कधीच माझी पाठ सोडत नाही. जागेपणी किंवा झोपल्यावर देखील माझ्या डोक्यात तेच विचार चालू असतात. त्यामुळेच मी सतत कशानं ना कशानं तरी ऑक्युपाय असतो, विचित्रपणे भारलेला असतो. त्यामुळेच सर्वसामान्य पातळीवरचं आयुष्यच मी कधी जगू शकत नाही. जगू शकलो नाही.

***

नवशक्तीत तेव्हा शशिकांत नार्वेकर नाट्यसमीक्षा करायचे. मला त्यांचं लेखन खूप आवडायचं. त्यांच्या लिखाणामुळेच मला मराठी रंगभूमीवरच्या साऱ्या खाचाखोचा कळू लागल्या होत्या. एके दिवशी त्यांनी लिहिलेलं तेंडुलकरांच्या 'अशी पाखरे येती' नाटकाचं परीक्षण मी वाचलं, ते नाटक पाहायचा मी निश्चय केला आणि ती संधी मला आलीदेखील. शिवाजी मंदिराच्या बाल्कनीतल्या शेवटच्या रांगेत बसून (एक रुपया तिकिट होतं तेव्हा. असेल कुठंतरी ते तिकिट अजूनही माझ्या संग्रहात.) मी ते नाटक पाहिलं आणि मी अक्षरशः थक्क झालो. तेंडुलकरांचं लेखन, जब्बार पटेल यांचं दिग्दर्शन आणि पीडीएच्या मोहन आगाशेंपासून कल्पना देवळणकरपर्यंतच्या साऱ्याच्या साऱ्या कलावंतांचा अभिनय पाहून मी अक्षरशः अवाक झालो. जब्बार पटेलांनी साकार केलेला अरुण सरनाईक पाहून तर मी अगदी चक्रावूनच गेलो होतो. अतिशय भारावून टाकणारा तो प्रयोग होता. अन तितकाच विचार करायला प्रवृत्त करणाराही. या नाटकाच्या प्रयोगानं माझ्या नाटकाकडेच नाहीतर जीवनाकडेही पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल झालेला मला जाणवत होता. माझ्यात घडलेला हा बदल खूप मोठा होता.

याच काळात गिरगावात नाट्यविषयक नवे प्रयोग होऊ लागले होते. साहित्य संघाची अमृत नाट्य भारती सुरू झाली होती. आणि उन्मेष युवक प्रायोगिक नाट्यमंच या संस्थेचा उदय झाला होता. त्यांनी आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा भरवण्यास सुरुवात केली होती. साहित्य संघातल्या एका शनिवारी 'धडपड' नावाचा नाट्यविषयक कार्यक्रम होत असे. त्यालाही मी जाऊ लागलो. आणि एके दिवशी 'षडज' या अच्युत वझे यांच्या नाटकाची उन्मेषनं घोषणा केली. दिग्दर्शक दिलीप कोल्हटकर आणि भूमिका करणार होते अनुया पालेकर, सुबोध गाडगीळ, डॉ. सुहास घोळकर आणि जयराम हर्डीकर. या नाटकाच्या तेजपाल सभागृहातल्या पहिल्या प्रयोगाला मी उपस्थित राहिलो. आणि नंतर आपसूकच माझा 'उन्मेष'मध्ये प्रवेश झाला. हा माझा



पेंटिंगसाठी पत्रकारिता सोडली आणि गायतोंडे यांच्या मृत्यूनंतर 'चिन्ह'चं पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेतला. त्यातली माझी काही चित्रे.

आणखीन एक टर्निंग पॉईन्ट होता. प्रकाश बुद्धिसागर आणि मी दोघांनी एकाच वेळी उन्मेषमध्ये प्रवेश केला. त्याला दिग्दर्शक व्हायचं होतं. त्याप्रमाणे एकांकिकेच्या दिग्दर्शनातून तो एकएक पायऱ्या चढत गेला. उन्मेष, आय एन टीच्या आंतरमहाविद्यालय नाट्यस्पर्धेतून दिग्दर्शक म्हणून स्वतःला सिद्ध करीत गेला. 'गेला उडत' हे नाटक उन्मेषसाठी त्यानं दिग्दर्शित देखील केलं. मी मात्र माझं शिक्षण चालू असल्यानं सारं आतआत पचवत गेलो, रिचवत गेलो. नाटक, चित्रकला का लेखन असे प्रश्न मला वारंवार सतावू लागले. पण नाटकाचं ते वातावरण मला सोडवत नव्हतं. त्या काळातल्या उन्मेषच्या जवळजवळ सर्वच नाटकांना मी बॅकस्टेजला होतो. त्याशिवाय अमोलच्या अनिकेततर्फे सादर झालेल्या 'वासनाकांड', रेखा सबनीसनं सादर केलेलं 'आकाश', सुरेश वैद्यच्या अंमल थिएटर्सतर्फे सादर होणाऱ्या नाटकांना देखील मी बॅकस्टेजला होतो. एकदा आठवतं, उन्मेषच्या समपुतुलीकाचा राज्यनाट्य स्पर्धेतला प्रयोग होता. आणि प्रयोग चालू असताना मागच्या मागे एक विंग धाडकन कोसळू लागली. मी इतका अलर्ट होतो की, ती भलीथोरली विंग तो अंक संपेपर्यंत हातानं जशीच्या तशी धरून राहिलो. कुणाला कळलं देखील नाही की, असा काहीतरी अनवस्था प्रसंग गुदरला होता ते.

पण तोपर्यंत उन्मेषमधले वातावरण विचित्र पद्धतीने बदलू लागलेलं हळूहळू लक्षात येऊ लागलं होतं. कुठल्यातरी एका मिटींगमध्ये याचा स्फोट झाला आणि मग बरेचसे लोक उन्मेषबाहेर पडले. प्रकाशही त्यात होता अन मीही. प्रकाश नंतर व्यावसायिक रंगभूमीकडं झुकला. 'ब्रह्मचारी' हे नाटक हा त्याच्या कर्तृत्वाचा कळसाध्याय होता. मी मात्र स्वतःला नाटकापासून विलग करून घेतलं. तोपर्यंत मी चित्रं काढू लागलो होतो. अभिव्यक्ती प्रगटीकरणासाठी हे माध्यम खूपच चांगलं आहे असंही माझ्या लक्षात आलं होतं. आणि मुख्य म्हणजे आपण आपली एकांतात चित्रं काढायची, वाटलं तर ती प्रदर्शित करायची. नो मिटींग, नो चर्चा, नो वादविवाद, तो असं का म्हणाला, तसंच का वागला, काही नाही. आपले आपण एकदम स्वतंत्र. तोपर्यंत मी पत्रकारितेत शिरलो होतो. जहांगीरमध्ये माझं प्रदर्शनदेखील भरवलं होतं. इतकंच

नाही तर त्या वर्षी माझ्या चित्राला राज्यपुरस्कार देखील मिळाला होता. आता मला एक वेगळं विश्व खुणावू लागलं होतं. तिथली स्वप्न पडू लागली होती. त्याच वर्षी माझ्या पहिल्या एकांकिकेला लेखनाचा नाट्यदर्पण पुरस्कार मिळाला. त्याचाही एक अफलातून किस्सा आहे.

मी काही नाट्यदर्पणच्या स्पर्धेसाठी स्क्रिप्ट पाठवलं नव्हतं. पण एके दिवशी लोकसत्तेत नाट्यदर्पणचे संपादक सुधीर दामले यांचा फोन आला की, असं असं तुम्हाला सर्वोत्कृष्ट लेखक म्हणून १९८१ चा नाट्यदर्पण पुरस्कार मिळाला आहे. कार्यक्रमाचं निमंत्रण पाठवतोच. अवश्य या ! कार्यक्रमाचा दिवस उजाडला तरी त्यांच्याकडून निमंत्रण आलंच नाही. कार्यक्रमाच्या दोन दिवस आधी स्वतः दामले लोकसत्तेच्या कार्यालयात आले होते. संपादक, नाट्यसमीक्षक कुणा कुणाला त्यांनी निमंत्रणं दिलीसुद्धा, पण माझ्या टेबलापर्यंत ते काही आलेच नाही. मला ते अतिशय विचित्र वाटले आणि अपमानास्पद देखील. मी काही त्या कार्यक्रमाला गेलोच नाही. मला वाटतं 'महासागर' त्या वर्षीचं सर्वोत्कृष्ट नाटक ठरलं असावं. जयवंत दळवी, विक्रम गोखले, वसंतराव देशपांडे अशा बऱ्याच दिग्गजांना त्या वर्षीचा नाट्यदर्पण पुरस्कार मिळाला होता. तिथं माझं नाव पुकारलं आणि मी नाही हे पाहून कमलाकर नाडकर्णी, आत्माराम सावंत यांचे मला फोन आले. का नाही तू आलास? म्हणून विचारणारे. तेव्हा त्यांना घडला प्रकार मी सांगितला. तेव्हा त्यांनाही तो खटकला. दामलेंवर संतापलेच ते. पण मला म्हणाले, मोठी चूक केलीस. त्या दिवशी तू यायलाच हवं होतंस. तो दिवस तुझाच होता. दामलेंचे कान काय नंतर उपटता आले असते. पण मला मात्र ते मान्य नव्हतं. दामले जे वागले ते मला अतिशय लागलं होतं.

नंतर ते मला म्हणाले, लोकसत्तेतलं कुणीतरी पासेस मागत होतं, त्याला टाळायचं म्हणून तुला न भेटता चुकून बाहेर पडलो वगैरे वगैरे. पण मला ते समजून घेण्यात फारसं स्वारस्य उरलं नव्हतं. आज इतक्या वर्षानंतर त्या घटनेकडे जेव्हा मी पाहतो, त्या वर्षीच्या निघालेल्या नाट्यदर्पणच्या विशेषांकाकडे पाहतो किंवा त्या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांकडे पाहतो तेव्हा माझ्या मनात अनेक विचार येतात. उदाहरणार्थ त्या कार्यक्रमाला मी उपस्थित राहिलो असतो तर निश्चितच मी नाटकातच माझं करियर केलं असतं हे नक्की. कारण तो साराच सोहळा दामले अतिशय दिमाखात साजरा करीत असत. आज अनेक वाहिन्यांवर जे पुरस्कार वितरणाचे अचकट विचकट प्रकार चालतात त्याचं ते मूळ रूप होतं. पण सारेच नाटकाशी संबंधित असल्यानं ते अतिशय प्रभावी होत असे. असो. गतं न शोचम. आणि तोपर्यंत पत्रकारितेतली नवी आव्हानंदेखील मला खुणावू लागली होती. साहजिकच नाटकाकडचा माझा कल हळूहळू कमी होऊ लागला.

***

मला एक विचित्र सवय आहे की, एकदा का आपण एखाद्या ठिकाणाकडे पाठ वळवली की, मग परत पुन्हा पाठी वळून पाहायचं नाही.

साहजिकच मी नाटक पाहणंदेखील सोडून दिलं. कारण तिसऱ्या घंटेचा आवाज, नाटक सुरू होण्यापूर्वीचं पार्श्वसंगीत, धुपाचा दरवळ, पात्रपरिचय सुरू झाला की नाटकाच्या साऱ्या आठवणी दाटून येत आणि आपण चूक तर केली नाही ना असं काहीबाही वाटायला लावीत. काही वर्षापूर्वी आय एन टीच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेला जायचा योग आला. कारण माझा मुलगा त्या एकांकिकेत काम करीत होता. कॉलेज होतं रामनारायण रुईया आणि एकांकिका होती 'शाळा' कादंबरीवरील आधारीत 'गमभन'. अक्षरशः वेड लावील असं सादरीकरण होतं ते. नवी मंडळी काय जोमानं काम करतात याचा तो रम्य अविष्कार होता. त्याचा विषय सर्वपरिचित 'शाळा'.

पहिली घंटा वाजली आणि ते सारे जुने दिवस आठवले आणि डोळे भरून आले. अस्वस्थ झालो. त्यानंतर मात्र पुन्हा अगदी ठरवूनच नाटकाच्या प्रयोगाला कधी गेलो नाही.

साहित्य संघात जाऊ लागल्यावर ज्यांच्याशी माझी प्रथम मैत्री झाली ती म्हणजे नाटककार चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याशी. ते मराठीतले एक ज्येष्ठ कवी, श्रेष्ठ नाटककार आणि मी जेजे स्कूल ऑफ आर्टमधला कसलाच आगापीछा नसलेला एक विद्यार्थी. पण खानोलकर मात्र माझ्याशी मनमोकळेपणानं गप्पा मारत. आपल्या कविता वाचून दाखवत, नाटकांच्या आठवणी सांगत. धुवट सदरा लेंगा वापरणारे, तोंडात सदैव पान असणारे खानोलकर आज इतक्या वर्षानंतर देखील हे लिहित असताना जसेच्या तसे समोर उभे राहतात. मीही मूळचा कोकणातला. साहजिकच खानोलकरांच्या गप्पांची सुरुवात 'नायकानु तुमका सांगतंय' अशीच व्हायची. खानोलकरांच्या अनेक नव्या नाटकांचे प्रयोग त्या काळात राज्य नाट्यस्पर्धेत होत असत. संघातूनच मग आम्ही त्या प्रयोगांना जात असू. 'अजब न्याय वर्तुळा'च्या तालमी विजयाबाईंनी सुरू केल्या आणि मग मात्र खानोलकरांचं भाग्यच पालटलं. खानोलकर आता विलक्षण प्रसन्न दिसू लागले. असंच एकदा आठदहा दिवस संघात जाणं झालं नाही आणि जेव्हा गेलो तेव्हा खानोलकर यांचं आकस्मिक निधन असा बोर्ड संघात लावलेला पाहिला आणि मी अक्षरशः हादरलोच. आपल्या भावना कशा व्यक्त कराव्यात हेच मला कळेना.

अशीच एक हादरून टाकणारी घटना नंतर लगेचच घडली. मी लोकप्रभेत लागल्याला महिनाच झाला होता. पहिल्या पगाराचा दिवस होता. आणि मुख्य म्हणजे त्याच दिवशी माझा वाढदिवसदेखील होता.शनिवारचा दिवस असावा. लोकसत्तेत पाऊल टाकलं मात्र, मला जाणवलं काही विशेष घडलंय, कारण ऑफिसचं सगळं वातावरण स्तब्ध होतं. चाहूल घ्यावी म्हणून बॅग तशीच टेबलावर टाकून लोकसत्तेच्या न्यूजडेस्कपाशी गेलो तर त्या पाळीच्या मुख्य उपसंपादकांनी नुकताच प्रेसमधून आलेला लोकसत्तेचा गावोगावी जाणारा डाकचा अंक माझ्या हाती दिला. ज्यावर हेडलाईन होती गोवा हिंदू असोसिएशनच्या बसला भीषण

अपघात– त्यात शांताबाई जोग, अभिनेता जयराम हर्डीकर आणि अन्य जागीच ठार. माय गॉड! अक्षरशः हादरून गेलो. काय करावं काहीही सुचेना. त्या काळात फोन वगैरे आजच्यासारखे इतके बोकाळलेले नव्हते. हे सारं कुणाशी शेअर करावं काहीच कळेना. पण मग तसाच उठलो, दोन जिने धडाधड उतरून धावत सुटलो तो दोन बिल्डींग पलीकडच्या युनियन बँकेच्या इमारतीत. सुहास पळशीकर, विवेक लागू, नंदू गाडगीळ, जुईली देऊसकर यांना जाऊन जेव्हा मी सांगू लागलो तेव्हा त्यांचा तर विश्वासच बसेना. मग ते सारेच माझ्या ऑफिसमध्ये आले. लोकसत्तेचा डाकचा अंक पाहिला आणि मग त्यांचा विश्वास बसला. जयराम आमच्या उन्मेषमधलाच. तास न् तास काय दिवस न दिवस आम्ही एकत्र काढलेले. साहजिकच आम्ही सारेच अक्षरशः कोलमडून गेलो होतो. पेंडसेबाईंना हे कळलं तेव्हा त्यांनी मला लिहायलाच बसवलं.

लिखाणाच्या बाबतीत मी मूळचा आळशी, पण कसं कुणास ठाऊक, त्या दिवशी मी तास दोन तासातच तो लेख लिहून काढला, जो नंतर खूपच गाजला. अशा दुःखद घटना घडल्या म्हणजे दुःखात बुडून जायचं नसतं. आपलं पहिलं काम असतं त्यावर बातमी द्यायचं किंवा लेख लिहायचं हा खूप मोठा धडा मी त्या प्रसंगातून शिकलो. जयरामचा अकल्पित अपघाती मृत्यू हे मी नाटकाच्या वेडातून बाहेर यायला खूप मोठं कारण ठरलं असावं, असं मला आज मागे वळून पाहताना वाटतं.

***

इकडे मी जिथे शिकत होतो त्या करियर इन्स्टिट्यूटच्या संचालकानं काही घोटाळा केल्यामुळे करियरची मान्यता कला संचालनालयानं काढून घेतली. (त्या काळात घोटाळा करणाऱ्यांची मान्यता काढून घेण्याची कला संचालनालयाची प्रथा होती. कालांतरानं ती प्रथा मोडीत निघाली आणि कला संचालनालय घोटाळे करणाऱ्यांनाच मान्यता देऊ लागलं. आज तर त्या खात्याची 'सभ्य' शब्दात उच्चारदेखील करता येणार नाही इतकी वाताहत झाली आहे.) साहजिकच करियरमधल्या आम्हा सर्वांनाच दुसऱ्या वर्षाला जेजेत थेट प्रवेश मिळाला.

सगळे गेले कमर्शिअलला म्हणून मीदेखील गेलो. पण ती माझी मोठी चूक होती. जी मला वर्षभरानं कळली. पण या काळात घडलंदेखील खूपच होतं. दामू केंकरे हे आमचे विभागप्रमुख होते. पुलंचे भाऊ रमाकांत देशपांडे आम्हाला शिकवायला होते. झालंच तर नंतर अभिनेते म्हणून नावारूपाला आलेले इर्शाद हाश्मीदेखील आम्हाला शिकवायला होते. शिवाय शांताराम पवार, कामत, जतकर, आचरेकर, गोखले यांच्यासारखे शिक्षक तिथं शिकवायला होते. जेजेतलं वातावरण विलक्षण प्रसन्न होतं. त्या वातावरणात माझी मूळची नाटकाची आवड वर उफाळून आली नसती तर नवलच ठरलं असतं. उन्मेषची आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा तेव्हा नुकतीच सुरू झाली होती. मी रमाकांत देशपांडे आणि इर्शाद हाश्मी यांच्या मागे लागून उन्मेषच्या स्पर्धेत जेजेची प्रवेशिका उतरवली.



'चिन्ह'च्या अंकाला प्रथम पदार्पणातच पत्रकार संघाचं दीनानाथ दलाल स्मृतिचिन्ह मिळालं.

तिकडे स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रिया तेंडुलकर शिकत होती. तिलाही मी भेटलो आणि उन्मेषच्या स्पर्धेत स्कूल ऑफ आर्टची एकांकिका उतरावयास प्रवृत्त केलं. अशा तऱ्हेनं जेजेमधून त्यावर्षी भवन्सच्या स्पर्धानंतर प्रथमच दोन एकांकिका उन्मेषच्या स्पर्धेत उतरवल्या गेल्या. आम्ही केली होती ती चंद्रकांत देशपांडेंची 'बस' ही एकांकिका. ती एकांकिका चांगलीच आपटली. तिचा प्रयोग चालू असताना रंगमंचावरचे आम्ही आणि सभागृहात बसलेले प्रेक्षक सारेच एकावेळी बोलत होतो. यावरून ती एकांकिका कशी झाली असेल याची सहज कल्पना यावी. पुरुषोत्तम बेर्डे, नलेश पाटील, रघुवीर कुलकर्णी या एकांकिकांमधूनच पहिल्यांदा रंगभूमीवर प्रवेश करते झाले असावेत.

'या मंडळी सादर करूया'चा इतिहास हा त्यानंतरच घडला. त्यावर्षी भवन्स तर्फे विहंग नायक यांनी 'कॅम्प' ही एकांकिका सादर केली होती. पन्नासएक पात्रांच्या त्या एकांकिकेत लक्ष्मीकांत बेर्डेला फक्त दोन वाक्य होती. पण त्या दोन वाक्यांवर तो सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचं बक्षीस घेऊन गेला होता. नाटकातल्या त्याला मिळालेल्या फक्त दोन वाक्यांची कसर मात्र त्यानं आमची एकांकिका चालू असताना प्रचंड बडबड करून चांगलीच भरून काढली होती. हे मला आजही आठवतं.

आता मी उन्मेषवाला झालो होतो. कॉलेज संपलं की रोज सायंकाळी मी गिरगावात जाऊ लागलो. साहित्य संघ मंदिरात आम्ही एकत्र येऊ लागलो. प्रार्थना समाजच्या सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटीच्या इमारतीत अच्युत वझे राहायचा. तिथंच उन्मेषचं कार्यालय होतं. तिथल्या छोट्या गच्चीत आमच्या मिटींगा चालायच्या. अच्युतसोबत सुबोध, जयराम, गिरीधर मोरे, दिलीप कोल्हटकर, प्रकाश बुद्धिसागर, राघू बंगेरा, जयंत करगुटकर, नरेश नातू, जयंत ओक, गिरीश वाझकर, सुरेश साने. नंतर नंतर तर मंगेश कुलकर्णी, विनय आपटे, दिलीप कुलकर्णी, सुरेश भागवत, प्रभाकर पाटणकर, सुरेश वैद्य, विवेक लागू, जुईली देऊसकर, नयन भडभडे (नंतरची रीमा लागू) सुहास पळशीकर असे अनेक तरुण

रंगकर्मी उन्मेषच्या या सभांना हजर राहत असत. मला आठवतं एकदा 'बूट पॉलीश ' नाटकाच्या वेळी भक्ती बर्वेदेखील एका सभेला उपस्थित राहीली होती. मिटींग जेव्हा नसायची तेव्हा आमचा अड्डा जिथं नाटकांच्या तालमी चालायच्या अशा ठिकाणी असायचा. खूप रात्र झाली म्हणजे मग तरंगत आपापल्या घरी. मंतरलेले दिवस होते ते.

***

आमचा आणखीन एक अड्डा होता तेव्हा. हर्निमन सर्कलला जिथं स्टेट बँक आहे तिच्यासमोरच बँक ऑफ बरोडाचीही बिल्डींग आहे. त्या बँक ऑफ बरोडाच्या समोर एक कॉफी हाऊस होतं. तिथं साधारण १२ नंतर मुंबईतले झाडून सारेच्या सारे प्रायोगिक नाटकवाले यायचे.

वर उल्लेखलेले सारेच कलावंत तिथं यायचे. कारण ते जिथं काम करायचे त्या बँका वा अन्य कार्यालय आजूबाजूच्याच परिसरात होत्या.

याशिवाय सत्यदेव दुबे, अनुया आणि अमोल पालेकर, रेखा सबनीस, विक्रम गोखले, सदानंद रेगे, जयदेव हट्टंगडी, कधी कधी रोहिणी हट्टंगडी, अच्युत देशिंगकर, दिलीप खांडेकर, वृंदावन दंडवते, विसू कामेरकर, विनय आपटे, विजय बोंद्रे, अशोक साठे, मोहन भंडारी, गोविंद निहलानी, सुनील शानभाग, मोहन वैद्य, श्रीकांत हळदुले, इम्तियाज हुसेन, सुरेश भागवत अशी किती म्हणून नावं सांगू. सारेच तिकडे यायचे. दुर्गाबाई भागवत, अशोक शहाणे, पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, रघु दंडवते, हिंदीतले नंदकिशोर मित्तल ही एशियाटिक मंडळी तर तिथंच चहापानाला बसलेली असायची. अनेकदा त्यांच्यात अरुण कोलटकर दिसायचा. मन्या ओक कधीमधी यायचा. नितीन दादरावाला, सतीश काळसेकर वरचेवर तिथं यायचे. पुष्पाबाई भावे, अनंतराव भावे, महेश एलकुंचवार, डॉ. श्रीराम लागू, दीपा लागू, कुमुदबेन मेहता अनेकदा तिथं यायचे. पुण्याहून डेक्कननं बाळ मोघे यायचा. अनेकदा त्याच्यासोबत सुभाष गोडबोले यायचे. सुभाष गोडबोले पुण्यातल्या नाट्यक्षेत्रातली वल्ली होती. त्या काळात नुकतंच त्यांचं 'कालाय तस्मै नमः' नाटक गाजलं होतं. आणि त्यातली त्यांची होराभूषणची भूमिकादेखील. गोडबोले आले म्हणजे कलोपासक आणि पुण्यातील अन्य संस्थांच्या बातम्या कळायच्या. नाटककार शंकर शेष यांची तेव्हा मुंबईत बदली झाली होती. तर त्यांना न्यायला मुंबई विमानतळावर जो माणूस आला, त्याला ते म्हणाले की, मला अशा अशा फोर्टमधल्या कॉफी हाऊसमध्ये आधी नेऊन सोड. मग बाकीचं. तर असा तो कॉफी हाऊसचा अड्डा होता. तिथं मी जाऊ लागलो होतो. पुष्पाबाई भावे यांनी १९७४ साली 'माणूस'च्या दिवाळी अंकात याच कॉफी हाऊसवर एक सुंदर लेख लिहिल्याचंदेखील स्मरतंय. या कॉफी हाऊसमध्ये बसणारी मंगेश कुलकर्णी ही एक वल्लीच होती. तो मूळचा कमर्शियल आर्टिस्ट, एखाद्या ॲड एजन्सीत नाही पटलं की तो नोकरी सरळ सोडून द्यायचा आणि मग कॉफी हाऊसमध्ये येऊन कितवी नोकरी सोडली ते जाहीर करायचा. उदाहरणार्थ, आज दीडशेवी नोकरी सोडली वगैरे. हा मंगेश बसल्या बसल्या कागदावर छान गणपती रेखाटायचा– नाचणारा, गाणारा, चालणारा गणपती वगैरे वगैरे. मग ज्यांची लग्नं असत असे सारेच्या सारे कॉफी हाऊसवाले त्याच्याकडून असा एखादा गणपती रेखाटून किंवा ती संपूर्ण पत्रिकाच त्याच्याकडून डिझाईन करून घेत. त्या काळातल्या दिलीप कोल्हटकर, सुरेश वैद्य, विनय आपटे, विवेक लागू, जयराम हर्डीकर वगैरे अनेक कलावंतांच्या मंगेशनं केलेल्या पत्रिका आजही माझ्या संग्रहात आहेत. या लेखासाठी म्हणून परवा फोटो शोधायला बसलो तेव्हा त्या हाती लागल्या आणि तो साराच कालखंड पुन्हा एकदा डोळ्यासमोर जिवंत झाला. त्यातले जयराम हर्डीकर, सुरेश वैद्य, विनय आपटे आज आपल्यात नाहीत. जे आहेत त्यांच्या आयुष्यात देखील नंतर कितीतरी स्थित्यंतरं झाली. हे सारं जाणवलं की, आजही उगाचच अस्वस्थपणा येतो.

काय प्रचंड चर्चा चालत तिथं! बापरे! अगदी हमरीतुमरीवर देखील प्रसंग येत. हसणं, खिदळणं, विनोद याला तर सीमाच नसे. कुठलाही विषय वर्ज्य नव्हता तिथं. नाटक, चित्रपट, संगीत, साहित्यापासून ते थेट राजकारणापर्यंत कुठल्याही विषयावर तिथं चर्चा चालत. एकेका मुद्द्याचा अगदी कीस काढला जात असे. मी तर खूपच लहान होतो त्यांच्यात. अगदी लिंबूटिंबू. कसलाच अनुभव नव्हता मला, पण त्यांनी मला तसं कधी जाणवू दिलं नाही. त्या साऱ्यांनीच मला त्यांच्यात सामावून घेतलं होतं. माझ्यापेक्षा वयानं खूप मोठी होती ती सारी, पण साऱ्यांशीच मी अरेतुरेत वागत असे. खूप शिकायला मिळत असे मला त्यातनं. काय वाचावं, काय पाहावं याविषयी खूप मोठं ज्ञान मला त्यातनं मिळत असे. शिक्षण शिक्षण म्हणजे तरी वेगळं काय असतं? गंमतीदार प्रसंग तर खूपच घडत असत. ते सारेच लिहायचे म्हटले तर एक जाडजूड पुस्तक सहज लिहून होईल. पण एक गंमत म्हणून माझ्याच बाबतीत घडलेला प्रसंग सांगतो. एके दिवशी अमोल पेंटिंग्जविषयी काहीतरी सांगत होता. तेव्हा तो चित्रकलेकडून थिएटरकडे वळला होता.

ताजमध्ये वगैरे त्यांचे शो झाले होते. त्याचं 'गोची ' किंवा 'चल रे भोपळ्या' ही नाटकं नुकतीच येऊ घातली होती तेव्हाची ती गोष्ट. तर तो बोलत असताना त्याला मी मधेच टोकलं की जहांगीरमध्ये प्रदर्शन करायला काय करावं लागतं? तर त्यानं एक क्षण थंडपणे माझ्याकडे बघितलं आणि शांतपणे उत्तर दिलं, आधी पेंटिंग करावं लागतं. त्यावर आजूबाजूचे सारे हसले. कुठून झक मारली आणि याला विचारलं असं काहीसं मला वाटून गेलं. पण अमोलच्या त्या तिरकस उत्तरानं मला नंतर केवळ अतिशय अस्वस्थ केलं नाही; काहीतरी करावयास प्रवृत्त केलं निश्चित. तोपर्यंत जेजे अप्लाईडमध्ये एक वर्ष काढल्यावर माझ्या लक्षात आलं की हे काही खरं नाही; आपल्याला पेंटिंग करायचं होतं. कमर्शिअल आर्ट नव्हे. स्वतःसाठी चित्रं काढायची होती; ऑर्डरनुसार दुसऱ्यांसाठी नव्हे. इथं काही हे आपल्याला शिकावयास मिळणार नाही हे जेव्हा लक्षात आलं तेव्हा मी जेजे अप्लाईड आर्ट पहिल्यावर्षी

चांगल्या मार्कांनं पास होऊनदेखील सोडूनसुद्धा दिलं.

आता पुढं काय ? रूढार्थानं पाहिलं तर एक वर्ष तर फुकट घालवून बसलो होतो, पण वेगळ्या अंगानं त्या संपूर्ण वर्षाचा विचार केला तर त्या वर्षानं मी खूप काहीतरी मुलखावेगळं शिकलो होतो हेही मला जाणवत होतं. मी ठरवलं आता फक्त वाचायचं, दुसरं काहीदेखील करायचं नाही. अतिशय कठीण निर्णय होता तो. पण मी तो घेतला. कारण आता मला रुईया कॉलेजमध्ये निश्चितपणे प्रवेश मिळणार नव्हता. आणि मला तो घ्यायचाही नव्हता. जेजे हेच माझं अंतिम ध्येय होतं. तोपर्यंत मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातल्या संदर्भ विभागाचा मला पत्ता लागला होता. मी ठरवलं की चक्क एक वर्षाची गॅप घ्यायची आणि फक्त वाचायचं. आईवडिलांना मी काही सांगितलंदेखील नाही. मी रोज सकाळी उठायचो आणि कॉलेजला जातो असं सांगून मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातल्या संदर्भ विभागात जाऊन बसायचो. अन जे मग सकाळी वाचन सुरू व्हायचं ते थेट संदर्भ विभाग बंद होईस्तोवर. संदर्भ विभागातल्या माझ्यासमोरच्या बेंचवर मी अनेकदा भालचंद्र मुणगेकर, शशिकांत लोखंडे, गुरुनाथ धुरी आणि चंद्रकांत खोत यांना पाहत असे. पण बोलायचं धाडस काही माझ्याच्यानं होत नसे. अनेकदा मन्या ओकदेखील तिथं येऊन बसायचा आणि मग हा गोंधळ उडायचा. चंद्रकांत खोतांच्या अबकडईचा तर मी कट्टर चाहता होतो पण त्यांच्याशी बोलायची संधी मी कधी घेतली नाही हेच खरं.

वर्षभरात खूप वाचलं मी तिथं. मौज, सत्यकथा, अभिरुची आणि मराठीतल्या महत्वाच्या सर्वच अंकांची तर अक्षरशः मी पारायणच केली. नाट्यविषयक किंवा साहित्यविषयक एकही नियतकालिक मी वाचायचं शिल्लक ठेवलं नाही. गेल्या पाच - पंचवीस वर्षांतील सारेच्या सारे महत्वाचे दिवाळी अंक मी त्या काळात वाचून काढले. 'साधना', 'सोबत', 'माणूस' यांसारख्या अनेक महत्त्वाच्या नियतकालिकांच्या अंकांच्या जुन्या फाइलीच्या फाइली मी वाचून काढल्या. हे माझं वाचन सुरू झालं ते चित्रशाळा प्रेसच्या अंकांपासून. तिथपासून ते १९७५ पर्यंत मराठीत प्रसिद्ध झालेले कला साहित्यविषयक सारेच्या सारे अंक मी एखाद्या अधाशासारखे वाचून काढले होते. मला आठवतं, एके दिवशी कॉफी हाऊसच्या गप्पांमध्ये अमोलनं 'कोसला'विषयी काही विधानं केली. ती ग्रेट कादंबरी आहे असे तो म्हणाला. त्याला म्हटलं, मला वाचायला दे. तर तो म्हणाला नाही! माझ्यापाशी एकच प्रत आहे. त्या कादंबरीच्या प्रती आता काही मिळत नाहीत. तुला वाचायचं असेल तर माझ्या घरी ये आणि वाच. मग मी ती कादंबरी संदर्भ विभागात वाचली. ती मला अतिशय आवडून गेली. तिथून मग माझं सारं वाचनच बदललं. नेमाडेंचा शोध घेतघेत मी लिटिल मॅगेझिनच्या चळवळीकडे वळलो. संदर्भ विभागाच्या दोनचार खोक्यांमधेच मराठीतल्या सर्वच्या सर्व लिटिल मॅगेझिनचे अंक व्यवस्थित ठेऊन दिलेले होते. त्यावर मी अक्षरशः तुटून पडलो. आठवड्याभरातच ते सारे वाचून काढले. तो माझ्या दृष्टीने आणखी




**'चिन्ह'च्या बहुचर्चित 'नग्नता चित्रातली आणि मनातली' अंकासाठी दत्तात्रय पाडेकर यांनी साकारलेलं अक्षरशः Bold & Beautiful मुखपृष्ठ.**

एक मोठा टर्निंग पॉईन्ट होता.

हे सारं जेव्हा मी अशोक शहाणेंना सांगितलं तर ते उडालेच. हा एवढासा पोरगा इतकं सारं वाचून आलाय म्हंजे भलतंच. ते जाम खूश झाले. मी त्यांना अहोजाहो करत होतो तर ते म्हणाले, अहोजाहो म्हंजे डेंजर. धोका आहे. हे भलतंच काहीतरी, त त तू तू आपला अ अ अरे त त त तुरेच म्हण. ते ब ब बरंग. आणि तिथून मग अशोक आणि माझं जमूनच गेलं. याच अशोकनं नंतर काही वर्षांनं मला भयंकर अडचणीत आणलं. पण तो किस्सा पुढे नंतर कधीतरी. कॉफी हाऊसमधून नंतर मी एशियाटिकमध्ये बसू लागलो. दुर्गाबाई, अशोक यांच्यासारख्या विद्वानांच्या गप्पांचा लाभ घेऊ लागलो. एशियाटिकचा सभासददेखील झालो. ते संपूर्ण शैक्षणिक वर्ष माझं असंच गेलं. काय वाचलं न काय नाही याची गणती काही मी केली नाही. कारण जे वाचलं ते अफाट होतं.

त्याच काळात एशियाटीकमध्ये असलेल्या वृत्तपत्र वाचनालयांचा देखील मला शोध लागला. तिथं जाऊन देशभरातील वृत्तपत्रं मी तासन्‌तास वाचू लागलो. ते वर्ष संपलं आणि मी रीतसर जेजे स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेतला. मला खरतर पेंटिंगच करायचं होतं. पण मी प्रवेश घेतला तो मात्र इंटेरिअरच्या कोर्सला. दोन वर्ष इथं काढू, शिकताशिकता पैसे कमवू. आणि नंतर रीतसर पेंटिंग शिकू असा या मागचा काहीसा व्यावहारिक विचार होता.

❃❃❃

बोरीबंदर स्थानकावरील व्हिलरच्या स्टॉलपाशी माझं खूप जवळचं नातं बांधलं गेलं होतं. त्या स्टॉलवर अख्ख्या भारतीय वृत्तपत्रसृष्टीचं दर्शन व्हायचं. माझी सारी खरेदी मी तिथनं करीत असे. १९७४-७५ पासून ते थेट १९९७ सालापर्यंत मासिकं, साप्ताहिक, पाक्षिकांची खरेदी तिथूनच करीत असे. आलेलं भारतातलं प्रत्येक नियतकालिक मला तिथं अत्यंत निवांतपणे चाळता येत असे. ७०च्या दशकात दिल्लीहून प्रसिद्ध होणारं साप्ताहिक 'दिनमान', कलकत्त्याचं 'रविवार', कमलेश्वरांचं 'सारिका' आणि दिल्लीहून प्रसिद्ध होणारं 'द इंडिया मॅगेझिन' अशी किती म्हणून नावं सांगू? सारे काही मी तिथंच विकत घेत असे. मराठी,

इंग्रजी किंवा हिंदी भाषेतलं कुठलंही वृत्तपत्र, साप्ताहिक, पाक्षिक वा मासिक सुरू झालं की, त्याची पहिली प्रत मला आवर्जून दाखवली जाई. अशा कितीतरी पहिल्या अंकांच्या प्रती काल-परवापर्यंत माझ्या संग्रहात होत्या. तिथला सर्वच स्टाफ मला ओळखायचा. माझी बरीचशी निरोपानिरोपीही तिथूनच चालायची, आणि मित्रमैत्रिणींना भेटायचं हमखास ठिकाणही तेच होतं. आधी हा स्टॉल लोकलच्या तिकीट विंडोपाशी होता. नंतर कधीतरी तो लोकल आणि मेलच्या मधल्या जागेत हलवला गेला. कसाब आणि कंपनीनं बोरीबंदर स्थानकात जो अंदाधुंद गोळीबार केला त्यात त्यातला एक विक्रेता मारला गेला. तोपर्यंत माझं मुंबईला जाणं खूपच कमी झालं होतं. त्यामुळे मला खूप उशीरा कळलं की, ज्या विक्रेत्यासोबत माझे खूप छान स्नेहबंध निर्माण झाले होते तोच विक्रेता नेमका त्यात मारला गेला होता. मला आठवतंय 'चिन्ह'च्या अंकासंबंधीच्या टिप्स त्यानंच एकदा मला दिल्या होत्या. आजही मुंबईला गेलो की, त्या स्टॉलचं दर्शन झालं म्हणजे हटकून त्याची आठवण येते आणि अस्वस्थ व्हायला होतं.

***

नाटकाच्या काळात वयानं खूपच ज्येष्ठ मंडळी माझी मित्र झाली होती. मल्हार ढगे हे त्यातले एक. हिंद विद्यालयात ते शिकवत. पण आमच्या जेजेत लेक्चरसाठी येत. खेतवाडीत ते रहात. त्यांनाही नाटक आणि साहित्याची प्रचंड आवड. गिरगावात आम्ही साहित्य संघातून निघालो की प्रार्थना समाजपर्यंत चालायला सहज तास दोन तास लागत. कारण या काळात चालताना विविध विषयांवर आमच्या गप्पा चालत. त्यांचं वाचन विलक्षण होतं. एके दिवशी त्यांनी मला घरी बोलवलं आणि 'ललित' मासिकाचे पहिल्या अंकापासूनचे अंक मला देऊन टाकले. त्यात सत्यकथेचेही कितीतरी अंक होते आणि मुख्य म्हणजे पु.शि. रेगे यांनी संपादित केलेले 'छंद'चे सर्वच्या सर्व अंक होते. त्यांनी ते अंक दिल्यानंतरचा संपूर्ण महिना मी ते वाचण्यातच घालवले.माझ्यासाठी तर तो खजिनाच होता. तोपर्यंत 'ठणठणपाळ' तर मी अगदी कोळून प्यालो होतो. नंतर 'ललित'च्या त्या अंकांची पारायणच्या पारायणं मी केली.

नंतरच्या माझ्या संपूर्ण जडणघडणीवर 'ललित'चा मोठा ठसा आहे असं मला वाटतं. 'ललित'मधल्या विविध लेखनानं मला 'चिन्ह'चं संपादन करताना खूप विषय पुरवले, हे कबूल करावयास मला कुठलाही संकोच वाटणार नाही. यावर मला कधीतरी विस्तारानं लिहायचं आहे. पण ते बहुदा 'निवडक'च्या शेवटच्या खंडात लिहेन.

मी ज्यावर्षी जेजेत प्रवेश केला त्याचवर्षी ग्रंथालीची स्थापना झाली. माझी आणि ग्रंथालीची वाटचाल अगदी बरोबरीनंच झाली. ग्रंथालीचा पहिला अंक तर माझ्यासाठी आय ओपनरच ठरला. दुसऱ्या अंकापासून रुची हे त्याचं नाव झालं. तो अंक माझ्या संग्रहात अजूनही आहे. कारण त्या अंकात जेजेमधल्या प्रख्यात 'मंदिराकडे' शिल्पाचे शिल्पकार रावबहादूर म्हात्रे यांच्यावरचा विशेष लेख होता. त्या विलक्षण शिल्पाविषयी मला जेजेत शिरल्यापासूनच आकर्षण होतं. आणि यांच्यावर कधीतरी खूप मोठं काम करायचंय यासाठी अंक अजूनही माझ्या संग्रहात ठेवला आहे. आता खरं तर 'चिन्ह'चं प्रकाशन मी थांबवलं आहे. ते पुन्हा सुरू करेन असं काही आता मला वाटत नाही. पण तो अंकही मला आता मला टाकवत नाही. (पण पहिल्या अंकात चित्रकला विभागाचे संपादक बाबूराव सडवेलकर होते. संगीत विभागाचे संपादक बहुदा अशोक रानडे असावेत.) अगदी कालपरवापर्यंत तो अंक मी माझ्या संग्रहात ठेवला होता. त्याच अंकात बाबूरावांनी पिकासोविषयी थोडंसं लिहिलं होतं. आणि चित्रकार प्रभाकर कोलते यांनी चित्रकार प्रभाकर बरवे यांच्याविषयी लिहिलं होतं. त्याला निमित्त होतं ते बरवेंच्या 'निळा ढग'ला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार. हा लेख मी वाचला आणि थरारून गेलो.

आपल्याला जे काही करायचंय त्याची सारी बीजं या इथंच आहेत हे त्याच क्षणी मला जाणवून गेलं. कोलतेंचा तो लेख आजही माझ्या संग्रहात आहे. 'गायतोंडे', 'बरवे', 'कोलते' या ट्रायोतल्या 'गायतोंडे' संदर्भातलं काम माझ्याकडून पूर्ण झालं आहे. विचित्र अडचणी न उभ्या राहत्या तर 'बरवे'चं काम देखील माझ्याकडून वेळीच पूर्ण झालं असतं. आता आधी 'जे जे जगी जगले' नंतर 'व्यक्तिचित्र : शब्दातली' त्यानंतर 'भास्कर कुलकर्णी' नंतर 'चिन्ह'मधली आत्मकथनं नंतर 'राजा रवि वर्मा' आणि सरतेशेवटी 'प्रभाकर बरवे' आणि सर्वात अखेरीस 'प्रभाकर कोलते' यांच्याविषयीचे निवडकचे खंड प्रकाशित करून त्याचं दुसरं टोक ग्रंथालीच्या पहिल्या अंकातल्या बरवेंविषयीच्या कोलतेंच्या लेखाच्या पहिल्या टोकाला जोडून एक भलं मोठं वर्तुळ मला पूर्ण करायचं आहे.

इंटेरिअर शिकतानाच्या या काळात मी कॉफी हाऊसला जातच होतो. संध्याकाळ जायची ती साहित्य संघात किंवा गिरगावात कुठंतरी तालमीच्या ठिकाणी. छबिलदासचा उदय झाला आणि मग मात्र हे केंद्र हळूहळू दादरकडे सरकलं. छबिलदासमधला पहिला प्रयोग आमच्या उन्मेषच्याच 'चल रे भोपळ्या'चा झाला. आविष्कारच्या 'प्रतिमा' नाटकाच्या प्रयोगानंतर त्या चळवळीला रितसर सुरूवात झाली. त्या दोन्ही प्रयोगांना मी हजर होतो. तिथं किती नाटकं पाहिली याची गणतीच नाही. हा काळ प्रायोगिक रंगभूमीच्या बहराचा होता. आमच्या उन्मेषविषयी तेव्हा प्रख्यात नाट्यसमीक्षक माधव मनोहर यांनी लिहिलं होतं की, इथून पुढली दोन दशकं ही उन्मेषचीच असतील वगैरे. माधवरावसारख्या जहाल समीक्षकांनी असं लिहिणं हे खरोखरच त्या चळवळीला गौरवाचंच होतं. पण तसं घडलं मात्र नाही. ते दशक पूर्ण व्हायच्या आतच उन्मेष मतभेदांनी दुभंगली ती दुभंगलीच. 'षडज', 'सूर्यपुत्र के साये में', 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक', 'सप्तपुत्तलिका', 'सोफा कम बेड'सारख्या अनेक नाटकांच्या निर्मितीत मी बॅकस्टेजमध्ये सहभागी होतो. 'चल रे भोपळ्या'चे गावोगावी केलेले प्रयोग तर प्रचंड गाजले होते. राज्य नाट्यस्पर्धेच्या प्रयोगांना तर प्रचंड गर्दी होत असे. त्या


गर्दीतच मला कधीतरी जाणवलं की हे माध्यम आपल्याला सूट नाही. प्रयोगानंतर रसिक आत येतात, भेटतात, हास्यविनोद करतात. पण आपण मात्र यात कुठं बसत नाही. आपण नेहमीच एकटे पडतो. तेव्हा हे काही खरं नाही, हे काही आपलं माध्यम नाही. शिवाय अधनंमधनं मतभेद होतात ते वेगळंच. तात्पर्य, आपण एकत्र येऊन काही करण्याच्या पात्रतेचे नाही असा काहीतरी साक्षात्कार मला रवींद्र नाट्य मंदिराच्या एका प्रयोगाच्या वेळी विंगेतल्या अंधारात झाला. आणि मी नाटकापासून दूरदूर जाऊ लागलो.

तोपर्यंत मी लिहू लागलो होतो. जेजेची लायब्ररी हे माझं लिहिण्याचं आवडतं ठिकाण होतं. तिथं बसून मी अनेक एकांकिका लिहिल्या ज्यांना नाट्यदर्पण पुरस्कार, 'कला सरगम'सारख्या संस्थांची अनेक बक्षिसं मिळाली. आता लिखाण हेच माझं माध्यम म्हणून मी त्याकडे पाहू लागलो होतो. पण त्यातलंही माझं स्वारस्य काही काळातच संपलं. माझी एक अत्यंत विचित्र सवय होती. लिहिताना त्या कागदावर जरा जरी चूक झाली तर ती खोडायची नाही, तर तो कागदच पुन्हा नव्यानं लिहून काढायचा. म्हणजे उदाहरणार्थ, एका फुलस्केपवर मी छानपैकी लिखाण केलंय आणि तो फुलस्केप संपायला आला असताना जर त्यावर खाडाखोड अथवा चूक झाली तर तो फुलस्केप नव्यानं पुन्हा लिहून काढायचा. ह्या प्रकारामुळे हळूहळू लेखनाचा देखील मला कंटाळा येऊ लागला, त्याचा अनावश्यक ताण येऊ लागला. या घाणेरड्या सवयींमुळेच माझ्यातल्या लेखकाच्या अनेक शक्यता मी गमावल्या असं आज मला मागे वळून पाहताना वाटतं. पण कसं असतं बघा. आज जमाना बदलला आहे. आता मी गुगलमध्ये जाऊन छानपैकी फटाफट मराठीत टाईप करतो, फटाफट लिहितो. जर काही चुकलं तर लागलीच दुरुस्त करतो. वेळप्रसंगी पानच्या पानं रद्द करतो, नव्यानं लिहितो. आता लेखन ही माझी गरज झाली आहे. आता ते कुणीतरी प्रसिद्ध करावं याचीदेखील मला आवश्यकता भासत नाही. मीच ते फेसबुकवर टाकतो. माझ्या 'चिन्ह'च्या चार अकाउन्टवर मिळून २० हजार फ्रेंड्स आहेत. खेरीज पाचशेच्या वर ग्रुप्स. ज्यांची सभासदसंख्या सहज लाखाच्या वर जाईल. ती सर्व मंडळी ते वाचतात, त्यावर प्रतिसाद देतात. नाही आवडलं तर स्पष्ट कळवतात. एकूण लिखाण हा प्रकार मी अक्षरशः दररोज एन्जॉय करतोय. कधी कधी एक विचार मनात येतो, तेव्हा ही व्यवस्था असती तर?

मग मात्र मी पूर्ण वेळ चित्रकलेकडेच पूर्णतः वळलो. पण हे असं ट्रॅक वगैरे बदलणं आता लिहितोय तितक्या सहजपणे काही झालं नाही. टप्प्याटप्प्यानंच होत गेलं. साहजिकच त्याची पूर्ण किंमतही मला नंतर चुकवावीच लागली.

❖❖❖

त्याविषयी विश्लेषण करत बसलो तर हा लेख एखाद्या कादंबरीसारखा विशाल होईल की काय असं भय मला वाटतं. म्हणूनच मी वर उल्लेखलेल्या दिवाळी अंकांच्या विशेषतः



'चिन्ह'च्या प्रवासातला भास्कर कुलकर्णी यांचा शोध हा कलाटणी देणारा क्षण ठरला. कुलकर्णी यांनी डायरीत रेखाटलेलं सेल्फ पोर्ट्रेट.

दलालांच्या दीपावलीकडे वळू इच्छितो. दिवाळी अंकामधला सर्वात आवडता अंक होता तो म्हणजे 'दीपावली'. दुसरा आवडता अंक होता तो म्हणजे 'रत्नदीप '. तिसरा होता 'आवाज'. आणखीनही बरेच होते. उदाहरणार्थ, 'मौज', 'सत्यकथा', 'ललित', 'अभिरुची', 'दीपलक्ष्मी', 'हंस', 'मनोरा', 'मोहिनी', 'राजस', 'युगवाणी' असे बरेच काही. यातल्या पहिल्या अंकाचे संपादक होते चित्रकार दीनानाथ दलाल, तर दुसऱ्या अंकाचे संपादक होते चित्रकार रघुवीर मुळगावकर आणि तिसऱ्याचे संपादक होते मधुकर पाटकर. दीनानाथ दलाल आणि रघुवीर मुळगावकर ही त्या काळातली खूप मोठी नावं होती चित्रकलेच्या तसेच प्रकाशनांच्या क्षेत्रातलीही. साहजिकच दिवाळी अंकांमध्ये या दोन्ही अंकात काय येणार याबद्दल प्रचंड उत्सुकता असे. आणि या दोन्ही चित्रकार, संपादक द्वयांनी त्या उत्सुकतेला कधीही तडा जाऊ दिला नाही. मुखपृष्ठ, आतली रंगीत चित्रं, व्यंगचित्र, पानपूरके आणि अंकातील मजकूर सर्वच बाबतीत विलक्षण समाधान देणारा असे. त्यावेळी चित्रकलेतलं इतकं काही कळत नव्हतं. पण पाहायला मात्र आवडायचं आणि हे 'पाहणं' म्हणजेच 'समजणं' आहे हे समजून घ्यायला मात्र बराच काळ जावा लागला. मुळगावकर फारसे प्रयोग करत नसत. एक प्रकारे राजा रवी वर्मा स्कूलला पुसतपुसत त्यांची वाटचाल चालू होती. पण विचाराने मात्र ते आधुनिक होते. तसं नसतं तर त्यांनी १९६१च्या अंकात गायतोंडे यांचा नवकलेबद्दलचा

लेख छापला असता का? आज तोच लेख गायतोंडे यांच्या संदर्भातल्या शोधातला मूळ भाग बनू पाहतोय.

दलालांचं मात्र वेगळंच स्कूल होतं. त्यांनीही आधुनिक विचार अंगीकारले होते. पण आपण चित्रकलेचा व्यवसाय करतो आहोत, आपल्यात अभिजात चित्रकाराच्या सर्व शक्यता असून आपण त्या क्षेत्रात मात्र काही करू शकत नाही ही जाणीव त्यांना सतत अस्वस्थ करत असावी. हा अस्वस्थपणा त्यांनी आपल्या उत्तम संपादनदृष्टीच्या जोरावर कमी करायचा प्रयत्न केला होता. द. ग. गोडसे यांच्यासारख्या विचारवंत लेखकाचे 'पोत', 'सौष्ठव'सारखे लेख पहिल्यांदा प्रसिद्ध झाले ते 'दीपावली'मधेच. त्यांच्या या संपादकीय दूरदृष्टीमुळेच 'दीपावली'चे नाव त्यांच्या पश्चातदेखील 'दीपावली'शी कायमचेच जोडलेले राहिले. पुढं अशोक कोठावळे यांनी 'दीपावली'चं पुनरुज्जीवन केल्यावर न आवडूनही आजतागायत माझ्याकडे 'दीपावली'चा अंक दर दिवाळीत आवर्जून घरी येतो ते दलालांच्या त्या अनोख्या कर्तृत्वामुळेच.

***

त्यावेळचं मराठी साहित्य क्षेत्र खूप वेगळं होतं, रसरशीत होतं. एका बाजूला फडके, खांडेकर, माडखोलकर, अत्रे, बा सी मर्ढेकर, वामन चोरघडे यांच्यासारखे बिनीचे लेखक, तर दुसऱ्या बाजूला विंदा करंदीकर, श्री. ना. पेंडसे, पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, रवींद्र पिंगे, य दि फडके, मंगेश पाडगावकर, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, दि बा मोकाशी, कुसुमाग्रज, गो. नी. दांडेकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, श्री. दा. पानवलकर, श्री. ज. जोशी, विद्याधर पुंडलिक, बा. भ बोरकर, दुर्गा भागवत, पु. शि. रेगे, तर तिसऱ्या बाजूला विजय तेंडुलकर, सदानंद रेगे, चिं. त्र्यं. खानोलकर, दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, भालचंद्र नेमाडे (चूकभूल द्यावी - घ्यावी. काही नावं राहिली गेली असण्याची शक्यता आहे. पण यातली बहुसंख्य नावं ही कदाचित 'रत्नदीप'शी निगडीत नसतील पण 'दीपावली'शी मात्र बहुसंख्येनं बांधली गेली होती. आणि हेच संपादक म्हणून दलालांचं मोठेपण होतं.

लेटरप्रेसच्या जमान्यात देखील दलाल आपल्या कर्तृत्वानं 'दीपावली'चं पान न् पान अक्षरशः उजळून टाकायचे. त्यांनी केलेल्या अंकांची अथवा पुस्तकांची मुखपृष्ठ किंवा 'दीपावली'साठी केलेल्या मालिका, विविध रेखाटनं आणि त्यांची स्वतःची अभिजात चित्रं आजही ताजी टवटवीत वाटतात याचं कारण दलालांचं कर्तृत्व ज्या पायावर उभं होतं तो पाया अभिजात साहित्याचा होता आणि म्हणूनच तो भक्कम होता. हा लेख लिहित असतानाच एका चित्रकाराशी फोनवरुन बोलणं झालं. तो चित्रकार आहे मूळचा कोल्हापूरचा. काम उत्तम पण वैचारिक पाया शून्य. म्हणाला कोल्हापूरहून पुण्याला आलोय खास दलालांचं प्रदर्शन पाहायला. दलालांना असे हे चाहते प्रचंड लाभले आहेत. आजही दलालांचं प्रदर्शन कुठं सुरू झालं म्हणजे चित्रकार मंडळी शेकडो मैलाचा प्रवास करून इकडून तिकडं जात असतात.

पण दलालांचं कर्तृत्व ज्या पायावर उभं राहिलं - बहरलं त्या 'साहित्याच्या वाचना'कडे मात्र हटकून कानाडोळा करतात. महाराष्ट्राच्या चित्रकला परंपरेची हीच खरी शोकांतिका आहे.

***

'चिन्ह'ची निर्मिती ही याच जाणिवेतून झाली. त्यात मी यशस्वी ठरलो किंवा नाही हे कळायला मात्र अजून काही काळ जावा लागेल. (कदाचित मलाही जावं लागेल.) १९८७ साली पहिल्या पदार्पणातच मुंबई मराठी पत्रकार संघाचा मानाचा दीनानाथ दलाल पुरस्कार 'चिन्ह'ला मिळाला. तो काही अपघात नव्हता. तो 'चिन्ह'ने घेतलेल्या भूमिकेचाच विजय होता. आज तब्बल २९-३० वर्ष उलटलीयेत पण १९८७, ८८, ८९ सालातील अंकांना अजूनही तशीच मागणी आहे. अन 'निवडक चिन्ह'चा पहिला खंड वाचल्यावर मिळणाऱ्या प्रतिसादाचं स्वरूपही तेच आणि तसंच आहे. त्या अंकांचे विषय ठरलेले विजय तेंडुलकर, द. ग. गोडसे, दामू केंकरे, मोहन वाघ, एम. एफ. हुसेन, प्रभाकर बरवे, चित्रकार बेंद्रे, चित्रकार ओके, रणजीत देसाई, अंबिका धुरंधर, बाबूराव सडवेलकर, नारायण सोनवडेकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, एस. एम. पंडित, चंद्रशेखर पत्की, वसंत बापट आणि प्रिया तेंडुलकर आज आपल्यात नाहीत. पण त्यांच्या अनोख्या कर्तृत्वाची, अनुभवांची नोंद मात्र 'चिन्ह'च्या पानापानांवर झाली असल्यानं वाचकांना 'चिन्ह'चे जुने अंक आणि आता 'निवडक चिन्ह'चे खंड देखील ताजे टवटवीत वाटत असावेत.

पाचसहा वर्षांपूर्वीची गोष्ट. एके दिवशी अचानक डॉ. जब्बार पटेल यांचा फोन आला. म्हणाले अरे, तुझ्या 'नग्नता' अंकाविषयी वाचलं. मला हवीय त्याची एक प्रत. खूप शोध घेतला मी त्याचा. अनेकांना मी म्हणालो देखील अरे, तो आमचा नाटकवाला आहे, पण तुझा नंबर मला सापडत नव्हता. 'ललित'मधली तुझी जाहिरात पाहिली आणि ठरवलं तुझ्याशी बोलायचं. तर मी म्हटलं, पाठवतो मी तो. तर म्हणाले पैसे कसे पाठवायचे. मी म्हणालो नंतर बघू. मग मी तो अंक पाठवला. तो पाहिला अन लागलीच त्यांचा पुन्हा फोन. अरे, काय अप्रतिम अंक काढलायस तू. छान छान, सतीश आता मला 'चिन्ह'चे सारेच्या सारे अंक पाठव, तुझ्यापाशी शिल्लक असतील ते. मला वाचायचेत. म्हटलं पाठवतो. मग म्हणाले अरे, त्याचे तरी तू पैसे घ्यायलाच हवेत. तर मी म्हटलं, ते नंतर पाहू. आधी अंक तर वाचा! मग मी ते अंक त्यांना पाठवले. मग त्यावर पुन्हा त्यांचा फोन, अर्धा एक तास फोनवर बोलत होते. अगदी काय बोलू न् काय, असं त्यांना झालं होतं.

बरोब्बर ४५ वर्षांपूर्वी 'अशी पाखरे' आणि 'घाशीराम कोतवाल'चे प्रयोग पाहिल्यावर माझी जी अवस्था झाली होती तशीच काहीशी ती मला वाटली. मग म्हणाले अरे, तू याचे पैसे घ्यायलाच हवे. हे सारं काय फुकट येतं का? मी म्हटलं नाही, डॉक्टर तुमच्या नाटकांनी कोणे एके काळी मला एवढं काही दिलं आहे की मी तुमच्याकडून अंकाचे पैसे घेणं मला आवडणार नाही. तर म्हणाले, असं नको करूस. मग मी यावर तोडगा काढला. मी

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने



ज्येष्ठ कथाकार विजया राजाध्यक्ष यांच्या नव्या वळणावर या कथासंग्रहातील कथा आजच्या काळातील माणसांच्या गुंतागुंतीच्या अनेक प्रश्नांचे, विविध पदरी दु:ख-वेगांचे प्रतिनिधित्व करतात. नवीन जीवनाच्या नव्या कक्षांना, जाणिवांना समजून घेण्याची तीव्र संवेदनशीलता विजयाबाईंच्या या कथांत जाणवत राहते. नवीन पिढीतील तरुण मने, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, त्यांच्या प्रश्नांना समजून घेण्याची त्यांची मानसिकता आणि जुनी पिढी यांचे परस्पर-नातेबंध या कथा चितारतात.

## नव्या वळणावर

विजया राजाध्यक्ष

किंमत २०० रुपये




....थालियाची थाळी हा स्त्रियांच्या मौखिक आणि मुद्रित विनोदीसाहित्याचा, शंभराहून अधिक वर्षांचा कालक्रमानुसार संकलित लेखाजोखा आहे. या पुस्तकाच्या उद्दिष्टांपैकी प्रमुख उद्दिष्ट 'बायकांना विनोदबुद्धी नसते' या सतत आळवल्या जाणाऱ्या आक्षेपाला, मुँहतोंड जवाब नाही, तरी हसरं उत्तर देणं. दुसरं, भूमिकन्या, ग्रामकन्या, सुशिक्षित नागरकन्या, आणि आजच्या उच्चशिक्षित परदेशस्थ विनोदिनीपर्यंतचा हास्येतिहास पुरवणं. तिसरं; विनोदिनींच्या या वाटचालीच्या ओघाने विनोदी वाङ्मयनिर्मितीचा धांडोळा घेणं ज्यात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक पेडापदरांचा समावेश अभिप्रेत आहे...

## थालियाची थाळी

पद्मजा फाटक (मजेत), दीपा गोवारीकर

किंमत ४०० रुपये



आपापल्या आशयात्म आणि प्रयोगात्म वेगळेपणाने आणि सौंदर्याने रसिकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या सात विख्यात मराठी नाट्यकृतींची ही आहे मर्मवेधी समीक्षा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर ते जयंत पवार असा एक पिढीजात नाट्यप्रवास इथे व्यक्त होतो. यातून त्या त्या नाट्यकृतींनी त्यांच्या काळातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाला कल्पकतेने कसा प्रतिसाद दिला त्याचा पट येथे साकार झाला आहे. ही समीक्षा नाटकांची सर्वांगिण आणि संवेदनशील चिकित्सा तर करतेच, पण वाचकाला एक सौंदर्यात्म आनंद देते.

## रङ्गदर्शन

पुष्पलता राजापुरे-तापस

किंमत २२५ रुपये

मौज प्रकाशन गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

त्यांना म्हटलं अशी पाखरे येती माझं सर्वांत आवडतं नाटक आहे. त्या नाटकाचं सादरीकरण ७०-७१ साली आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर झालं होतं. त्याची टेप तुमच्याकडे असणार किंवा ती कुणाकडे असणार हे तुम्हाला ठाऊक असणार. त्याची एक कॉपी मला द्याना. या अंकांच्या बदल्यात बाकी काही नको. तर माझी ही मागणी ऐकून ते थक्क झाले. म्हणाले अरे, हो रे. तेव्हा आकाशवाणी पुणे केंद्रानं ते सादर केलं होतं. मी मधेच म्हटलं हो, सादरकर्ते होते पुरुषोत्तम जोशी. तर डॉ. म्हणाले अगदी बरोबर. तुझ्या सारं लक्षात आहे. तर मी त्यांना म्हटलं आता तरी ते रेकॉर्डींग मला द्याल. म्हणाले हो, कुणाकडून ते मिळवायचं ते मला ठाऊक आहे. मलाही ते पुन्हा ऐकायला आवडेल. मी मिळवतो ते कसंही अन देतो नक्की तुला त्याची एक प्रत. पण अजून काही ती प्रत मला मिळालेली नाहीय. आता गायतोंडे ग्रंथासंदर्भात त्यांचा फोन येईलच किंवा हे सारं वाचल्यावर त्यांचा नक्की फोन येईलच. अन मला खात्री आहे. 'अशी पाखरे'चं रेकॉर्डींग मला ४५ वर्षानंतर पुन्हा नक्की ऐकावयास मिळेल. डॉक्टरांनी उभा केलेला तेंडुलकरांचा हा अरुण सरनाईक कुठंच गुंतत नव्हता, गुंतायची वेळ आली की तिथून तो बाजूला व्हायचा. अन आपण मात्र हे इतक्या वर्षानं देखील त्यात असे मनानं गुंतून पडलेलो. या साऱ्याचा अन्वयार्थ लावणं कधीकधी खूप अवघड असतं हेच खरं.

❋❋❋

हा लेख लिहित असतानाच ज्यांच्याकडे जमिनीपासून छतापर्यंत फक्त पुस्तकं आणि पुस्तकंच आहे अशा एका ग्रंथप्रेमी बाईंचा फोन आला.

त्यांनी 'गायतोंडे' ग्रंथ बुक केला होता त्या संदर्भात चौकशी करत असताना सहज मी त्यांना 'निवडक चिन्ह'च्या पहिल्या खंडाची कल्पना दिली. त्यांनी लागलीच तो ग्रंथ मागवला देखील. सुदैवानं माझ्यापाशी दोन प्रती शिल्लक होत्या. त्यातली एक मी त्यांना पाठवली. ती त्यांच्या हाती पडताच त्यांनी मला फोन केला. तब्बल पंधरा मिनिटं बाई बोलत होत्या. त्या ग्रंथाविषयी काय बोलू आणि किती बोलू असं त्यांना झालं होतं. मीही त्यांच्या फोननं अक्षरशः गुदमरल्यासारखा झालो. (कारण अशा प्रत्यक्ष स्तुतीची आपल्याला सहसा सवय नसते.) त्यामुळे साहजिकच त्या काय म्हणाल्या हे मी इथं सहज मांडू शकणार नाही. पण तो फोन ठेवला मात्र आणि नंतर त्यांचा एक एसेमेस आला. त्यांनी लिहिलं होतं 'बहुमोल, अलौकिक खजिन्याचं दार उघडून दिलं. सगळा खजिना (८७-८९) एक दालन फक्त वाचत जाताना जो विलक्षण सुंदर अनुभव मिळणार आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास शब्द अपुरे. अशी कृपा सतत ठेवा एवढीच विनंती स्मरणात ठेवा. धन्यवाद!' मग नंतर पुन्हा त्यांचा फोन आला. म्हणाल्या तुमच्याकडे दुसरी कॉपी आहे ती पुण्यातल्या माझ्या बहिणीला पाठवा. असं म्हणून त्यांनी 'चिन्ह'चे सर्वच शिल्लक अंक बुक केले आणि मागवून घेतले.

आणखी एक कालपरवाचाच अनुभव. एका वाहिनीवरची माझी मुलाखत पाहून जळगावच्या एका 'चिन्ह'च्या कट्टर चाहत्या वाचकानं मला एसेमेस पाठवला. तो असा Respects... watch mi marathi. u n sir.fantastic is t only word i can use. बाकी आसू भर आये. Let me show this to my sons they may become artists or not but they surely will be good humans.thanks.eager to have my copy. - Pradeep,Jalgaon हे असे अनुभव माझ्यापाशी इतके झालेत की त्यावर एक पुस्तक सहज लिहिता येईल. 'निवडक चिन्ह'च्या शेवटच्या खंडात हे सारं लिहावयाचा माझा विचार आहेच. पाहूया कितपत जमतं.

❋❋❋

'चिन्ह'चं संपादन करताना चित्रकला हा विषय मी अनेक अंगानं असंख्य विविध विषयांना जो जोडत होतो, तो अनेकांना अपघात वाटतो. तर ते तसं नाहीये. हे जे काही मी आडवंतिडवं जगलो त्याचंच प्रतिबिंब 'चिन्ह'चं संपादन करताना प्रत्येक अंकात उमटत गेलं असावं असं मला अगदी मनापासून सांगावसं वाटतं. 'चिन्ह'च्या प्रत्येक विषयनिवडीमागे माझ्या व्यक्तिगत आवडी-निवडीचा निश्चितपणे मोठा भाग आहे. जो नंतर वाचणाऱ्या प्रत्येक वाचकांचा देखील होत असावा. 'चिन्ह'ला कदाचित (कदाचित कसलं? किंबहुना नाहीच) व्यावहारिक यश हे लाभलं नसेल, पण संपादनाला दाद मिळाली ती केवळ तिच्या याच आगळ्यावेगळ्या गुणवैशिष्ट्यांमुळे असावी. 'निवडक चिन्ह'च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या विषयांच्या यादीवर जरी नुसती नजर टाकली तरी या विधानाची सत्यता पटू शकेल. फक्त या लेखापुरतंच उदाहरण द्यायचं झालं तर वर उल्लेख केलेला गुरुदत्तचा विषय आठवा. त्याची सख्खी बहिण ललिता लाजमी ही आमच्या जेजेचीच. तीही चांगली चित्रकार. साहजिकच मी तिला बोलतं केलं आणि गुरुदत्तचा विषय 'चिन्ह'मध्ये आला. दलालांची कन्या प्रतिमा आमच्या जेजेचीच. तिला मी बोलतं केलं आणि दलालांच्या आठवणी 'चिन्ह'त समाविष्ट झाल्या. प्रिया तेंडुलकर आमच्या जेजेचीच तिला मी बोलतं केलं आणि मॉडेलिंगचे दिवस 'चिन्ह'मध्ये साकारले गेले. जे नंतर खूपच गाजले, अगदी बालभारतीच्या पुस्तकात देखील त्यांचा समावेश झाला. 'आवाज'च्या मधुकर पाटकरांचं दृश्य कर्तृत्व अफाट. साहजिकच त्यांचे आवडते चित्रकार चंद्रशेखर पत्की यांना बोलतं केलं आणि मधुकर पाटकर यांच्या 'आवाज'च्या आठवणी 'चिन्ह'त समाविष्ट झाल्या. भरत दाभोळकर काही आमच्या जेजेचे नव्हते पण जाहिरात क्षेत्रात होते. त्यांच्या त्या 'अमूल'च्या जाहिरातींविषयी माझ्या मनात प्रचंड औत्सुक्य होतं. त्यांना मी बोलतं केलं आणि एक वेगळ्या विश्वाचं दर्शन 'चिन्ह'च्या वाचकांना घडलं. अमृता शेरगिलविषयी मला प्रचंड कुतूहल. साहजिकच तिच्यावर चित्रपट करू पाहणाऱ्या दीप्ती नवलला मी बोलतं केलं आणि अमृताच्या साऱ्याच्या साऱ्या आठवणी 'चिन्ह'मध्ये समाविष्ट झाल्या. दीप्तीनं अमृताचे मूळ फोटो पाठवले होते. त्यांना स्पर्श करताना मी अक्षरशः थरारलो होतो हे मला आजही आठवतं. अशी किती म्हणून

उदाहरण सांगू. कदाचित तिला आत्मस्तुतीचा वास येईल म्हणून इथंच थांबतो. या संदर्भात 'निवडक चिन्ह'च्या पहिल्या पर्वातील खंडाच्या प्रदीर्घ प्रास्ताविकात मी अधिक विस्ताराने लिहिलंय ते जिज्ञासूंनी अवश्य वाचावं.

'चिन्ह'च्या पहिल्या पर्वानंतर भल्याभल्यांनी 'चिन्ह'चं अनुकरण करावयाचा प्रयत्न केला. पण ते सारेच अयशस्वी ठरले. कारण मी जे उभं केलं होतं ते अगदी माझ्या व्यक्तिगत आवडी-निवडीमधून उभं केलं होतं. त्यात नाही म्हटलं तरी केवळ आपुलकीचाच नव्हे तर आत्मकथनाचाही एक चिवट धागा होता. अशी कामं विषयांच्या नुसत्या याद्या उभ्या करून होत नाहीत. त्यातलं सारंच आतून कुठूनतरी यावं लागतं. त्यात प्रेम, माया, ओलावा, श्रद्धा, निष्ठा असाव्या लागतात. आणि मुख्य म्हणजे आपण जे मांडतो आहोत त्याविषयी अगदी ठाम असावं लागतं. आणि हे सारंच्या सारं प्रत्येकच वेळी 'चिन्ह'साठी निवडलेल्या साऱ्याच्या साऱ्या विषयांच्या बाबतीत अगदी मोठ्या प्रमाणावर एकत्रित येत गेलं. आणि केवळ म्हणूनच ते वाचकांच्या पिढ्याच्या पिढ्यांना आकृष्ट करीत गेलं असावं असं मी या साऱ्याविषयी अत्यंत अलिप्तपणानं मागे वळून जेव्हा पाहतो तेव्हा मला वाटत राहतं. 'वाचकाला आवडतं म्हणून आम्ही हे देतो' असली पलायनवादी भाषा इथं चालत नाही. संपादकाचं काम आपल्या अवतीभवती काय बरं काम चाललंय याची माहिती वाचकाला करून देणं हे आहे, खपतंय ते देणं नव्हे अन लोकानुनय करणं नव्हेच नव्हे.

**दलालांचं वेगळंच स्कूल होतं. त्यांनीही आधुनिक विचार अंगीकारले होते. पण आपण चित्रकलेचा व्यवसाय करतो आहोत, आपल्यात अभिजात चित्रकाराच्या सर्व शक्यता असून आपण त्या क्षेत्रात काही करू शकत नाही ही जाणीव त्यांना अस्वस्थ करत असावी. हा अस्वस्थपणा त्यांनी आपल्या उत्तम संपादनदृष्टीच्या जोरावर कमी करायचा प्रयत्न केला होता. द. ग. गोडसे यांच्यासारख्या विचारवंत लेखकाचे 'पोत', 'सौष्ठव'सारखे लेख पहिल्यांदा प्रसिद्ध झाले ते 'दीपावली'मधेच. त्यांच्या या संपादकीय दूरदृष्टीमुळेच 'दीपावली'चे नाव त्यांच्या पश्चातदेखील 'दीपावली'शी कायमचेच जोडलेले राहिले.**

❋❋❋

मी जे विषय हाताळले ते जवळजवळ सारेच कुणाला फारसे ठाऊक नसलेले आणि म्हणूनच काहीसे धोकादायकही होते. कल्पना करा, त्याआधी कुणाला फारशा माहित नसलेल्या भास्कर कुलकर्णी यांच्यासारख्या जिनियस कलावंतावर एक दोनशेपेक्षा जास्त पानांचा अंक काढणे हे त्या काळात भयंकर मोठं धाडस मानलं गेलं. जी गोष्ट भास्कर कुलकर्णी यांची होती तीच गायतोंडे यांचीदेखील होती. आणि तीच निवडलेल्या अन्य कलावंतांच्या बाबतीत होती, पण मी मात्र माझ्या मतांवर ठाम होतो, आश्वस्त होतो. ती प्रत्यक्षात उतरवताना यशापयशाची मी कधीच पर्वा केली नाही. आणि मला वाटतं हेच 'चिन्ह'च्या संपादनाचे प्लस पॉईंट ठरावे.

चित्रकलेसारख्या एखाद्या तसं पाहिलं तर दुर्लक्षित विषयावरच्या अंकाला हा असा आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर वाचक लाभणं, वर्षानुवर्ष, पिढ्यानपिढ्या त्या अंकांची हस्ते-परहस्ते देवाणघेवाण होणं, साऱ्या जगभरातूनच ते अंक असलेली वेबसाईट वाचली जाणं, सर्वच क्षेत्रातील कलावंतांकडून त्याला भरघोस प्रतिसाद लाभणं, त्यावर प्रतिक्रिया देताना काय बोलू आणि काय नाही असं होणं, भावनाप्रधान होणं, अनेकदा बोलताबोलता हमसून रडणं या साध्यासुध्या घटना नाहीत, दुर्मिळ घटना आहेत. आणि या 'चिन्ह'च्या बाबतीत सतत घडतात याचा 'चिन्ह'चा निर्माता म्हणून त्याचा मला रास्त अभिमान आहे.

हे सारं घडलं ते लहानपणापासून केलेल्या प्रचंड वाचनामुळं. आणि त्यातून घेतलेल्या विविध अनुभवांमुळंच. अन्यथा माझ्या मागे कसली पदवी होती? कधी कधी मनात विचार येतो. 'चिन्ह'साठी १९८४ सालापासून आपण जी प्रचंड उरस्फोड केली ती जर आपण आपल्या पेंटिंगसाठी केली असती तर आपण आज भारतातले श्रेष्ठ चित्रकार नक्कीच होऊ शकलो असतो. जेजेमधून कलाक्षेत्रात पाऊल टाकल्यावर माझ्या चित्रांना लागोपाठ दोन वर्ष राज्य पुरस्कार मिळाले होते. परीक्षण मंडळावर कोण होतं ठाऊक आहे? चित्रकार बेंद्रे, जहांगीरचे राम चटर्जी, चित्रकार बद्रीनारायण आणि चित्रकार प्रभाकर बरवे. असे विचार मनात आले की, मी ते शक्य तितक्या लवकर मनातून झटकून टाकायचा प्रयत्न करतो आणि कामाला लागतो. आयुष्यात अशी काही वळणं येत असतात की, ती पाहत राहण्याखेरीज आपल्यापाशी अनेकदा गत्यंतरच नसतं. तिलाच आपण नंतर नाव देऊन टाकतो नियती, डेस्टिनी वगैरे वगैरे. चित्र रंगवायचं स्वप्न तर मी अजूनही पाहतो आहे. आणि लवकरच ते प्रत्यक्षात येईल याची मला खात्रीदेखील आहे. गायतोंडे किंवा अन्य कलावंतांचा शोध घेताघेता मी जी इतकी वर्षं घालवली असतील आणि आता जर मी माझं पेंटिंग करणार नसेन तर केलेल्या साऱ्याचीच किंमत शून्य आहे याची जाणीव मला चांगलीच आहे.

काही मिळवावं किंवा मिळवण्याविषयी फारशी ओढ अशी कधी नव्हतीच. चित्रकला हे क्षेत्र जेव्हा मी निवडलं तेव्हाच मला ठाऊक होतं की आपल्याला यश, प्रसिद्धी, पैसा वगैरे मिळालीच तर ती अगदी उशिराच मिळणार आहे, इतक्यात नाहीच. साहजिकच माझी त्याविषयी कधी काही तक्रार अशी नव्हतीच. मी आपला प्रच्छन्नपणे जगत गेलो. मला वाटतं हे सारं माझ्या आयुष्यात घडलं ते केवळ वाचनामुळंच. वाचनापायी मी काय काय सोसलं यातला सर्वात धमाल किस्सा सांगितल्यावाचून राहवत नाही. १०-१०, १२-१२ पेपर मी जवळजवळ रोजच घेत असे. लोकप्रभा सोडल्यानंतर मात्र हे प्रमाण कमी झालं. पण आतादेखील दर रविवारी माझ्याकडे १०-१५ पेपर येतातच. सकाळी रोज मला

हे पेपर लवकर लागत असत. कारण मी सकाळी लवकर उठत असे, आजही उठतो. मग मी काय करत असे तर ते पेपर स्टॉलवरून स्वतःच घेऊन घरी येत असे. रस्त्यातून येताना अनेकदा ए, शुकशुक टाईम्स आहे का ? वगैरे हमखास ऐकू येत असे. अगदी इमारतीतून देखील लोक विचारीत असत. ए, टाईम्स आहे का ? पण मी आपला माझ्याच तंद्रीत चालत असे.

पण एके दिवशी मात्र एक माणूस दाणदिशी माझ्या समोर येऊन उभा राहिला. म्हणाला, इतके दिवस हाक मारतोय. ऐकू येत नाही का? चल एक लोकसत्ता दे. तेव्हा कुठे माझ्या डोक्यात प्रकाश पडला की हे सारे मला पेपर विक्रेताच समजत होते. खरं तर रोज सकाळी मी ट्रॅक सूट वापरत असे. आधुनिक स्पोर्ट्स शूज देखील वापरत असे. म्हणजे मी दिसायला स्मार्ट वगैरे नक्कीच नव्हतो, पण टापटीप मात्र निश्चित रहात होतो आणि तरीदेखील ते मला पेपरवाला समजले याचं मला वाईट वाटलं. शेवटी त्या माणसाला मी म्हणालो, मी पेपरवालाच आहे, मी लोकसत्तावालाच आहे. पण मी संपादक विभागात काम करतो. पेपर विकत नाही. हे जे काही पेपर माझ्या हातात दिसतायेत ते वाचण्यासाठी घेतले आहेत विकण्यासाठी नाही. यावर तो माणूस खूप खजील झाला. मी जिथं जिथं राहिलो त्या मालाड, अंधेरी आणि सरतेशेवटी मुलुंडमध्ये देखील मला हाच अनुभव आला. मुलुंडमध्ये तर एका सुंदर महिलेने माझ्या हातात दोन रुपये टेकवले होते. आणि वर म्हणाली, म टा द्या. तिला जेव्हा मी सारं समजावून सांगितलं तेव्हा सॉरी वगैरे न बोलताच ती मला उलटून म्हणाली, मग आम्ही कसं समजायचं तुम्ही पेपर विकत नाहीत ते. यावर मी फक्त कपाळावर हात मारू शकलो. एकदा तर आमच्या नीलमनगरमधल्या माझ्या इमारतीसमोरच एकानं माझ्याकडे एक्सप्रेस मागितला. मी वर बोट दाखवून मी इथंच राहतो म्हटल्यावर तो म्हणाला तो क्या हुआ. आता बोला. मुलूंडमध्ये तर वैतागून एकदोघांना मी अक्षरशः मारायलाच उठलो होतो. नंतर मुलुंड देखील सोडलं. आणि इथं गावात येऊन राहिलो. आता मात्र ती गंमत गेलीय.

❋❋❋

माझ्या आयुष्याला अनेक कलाटण्या मिळाल्या, इतक्या थोरामोठ्यांचा सहवास लाभला, प्रेम लाभलं, थोडंफार वेगळं जगता आलं, अगदी वेगळं काम करता आलं तेदेखील केवळ वाचनामुळंच, असं माझं अतिशय प्रांजळ मत आहे. कल्पना करा की तुम्ही वयानं अन अनुभवानं खूप लहान असता आणि कर्तृत्वानं अतिशय मोठं असलेल्या, होत जाणाऱ्या लोकांमध्ये तुम्ही उठता बसता. तेदेखील कधीमधी नाही, रोज - तीन तीन चार चार तास, इतकंच नाही तर कधीकधी दिवसभर देखील. आणि तेही तब्बल चार पाच वर्ष. याला जर वाचनाचा पाया भक्कम नसता तर ते शक्य होतं का? 'शब्द रुची'च्या गेल्या दिवाळी अंकात दिनकर गांगल यांच्या लेखात पहिल्या पानावर ग्रंथालीच्या अगदी सुरूवातीच्या कार्यक्रमाचं तब्बल ३५ वर्षापूर्वीचं जे प्रकाशचित्र प्रसिद्ध झालं आहे त्यात पुष्पाबाई भावे, उषा मेहता, मृदुला जोशी आणि अनंतराव



'गायतोंडे' ग्रंथाचं आणि जनआवृत्तीचं मुखपृष्ठ

भावे यांच्या मागे मधोमध जो दिसतोय तो मीच. हे प्रकाशचित्र मी पाहिलं आणि तेव्हापासूनच्या अगदी साऱ्याच्या साऱ्या आठवणी नंतरच्या काळात मनात रुंजी घालू लागल्या. ते सारेच्या सारे दिवस उभ्या करू लागल्या. त्याला आणखीन एक कारण घडलं ते म्हणजे 'गायतोंडे' ग्रंथाची निर्मिती. गायतोंडे यांच्या या शोधामध्ये १९८८ सालच्या रुचीमध्ये प्रसिद्ध झालेल्या नरेंद्र डेंगळे यांच्या अप्रतिम लेखाचा खूप मोठा वाटा होता. मराठीत आजवर चित्रकार किंवा चित्रकलेविषयी जे लिखाण प्रसिद्ध झालं आहे त्यातला तो सर्वोत्कृष्ट लेख आहे असं माझं मत आहे. (गायतोंडे यांचा शोध आणि ग्रंथनिर्मितीच्या संदर्भात जे विस्तृत लेखन मी केलं ते सारं 'गायतोंडे : न संपणाऱ्या शोधाची कहाणी' या ग्रंथासोबत दिल्या जाणाऱ्या पुस्तिकेत मी लिहिलंय. हाही मराठीतला एक अभिनव प्रयोग आहे. त्या संदर्भात आपण जर अधिक जाणून घेऊ इच्छित असाल तर पुढील लिंकवर हे सर्व साहित्य उपलब्ध आहे.

अवश्य वाचा. http://chinha.co.in/promo/Gaitonde%20Sampadakiya%20Book.pdf

हे सारंच्या सारं जे काही आहे ते अंतस्थ धाग्यांनी अगदी आतनं आतनं जोडलं गेलेलं असावं याची जाणीव होत असतानाच काही दिवसापूर्वी अचानक 'ग्रंथाली रुची'मधून आल्हाद गोडबोले यांची मेल आली की दीनानाथ दलाल यांच्या शताब्दीनिमित्तानं कलेच्या प्रांतातील काही उल्लेखनीय उपक्रमांची दखल घ्यावी, अशा विचारानं पुढील महिन्याचा 'शब्द रुची'चा अंक प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. तर आपण लिहावं वगैरे. शब्दमर्यादा नाही (हे मला अधिक आवडलं.) आणि मी ठरवलं की हे सारं लिहूनच काढायचं. वास्तविक पाहता लिहिण्या-बिहिण्यात मी मुलखाचा आळशी, मी लेखक नाहीच, असलोच तर मी संपादक आहे. पण नेटानं बसलो आणि लिहूनदेखील झालं. कसं वाटलं ते जरूर कळवा.

**सतीश नाईक**
भ्रमणध्वनी : ९००४०३४९०३
www.chinha.co.in
chinhamag@gmail.com

पुस्तक प्रकाशन वृत्तांत

# मुक्त समाज निर्माण व्हायला हवा - डॉ. अनिल अवचट

पुणे : 'ग्रंथाली'तर्फे डॉ. माधवी मेहेंदळे यांच्या 'चेकपॉईन्ट चार्ली' या ललित कादंबरीचे प्रकाशन डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले, ज्येष्ठ दिग्दर्शिका सुमित्रा भावे आणि 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप यावेळी उपस्थित होत्या.

महात्मा फुले, महर्षी कर्वे, आगरकर अशा सुधारकांच्या कार्यामुळे स्त्रिया अनेक बंधनांतून मुक्त झाल्या, शिकल्या. लेखनाच्या बाबतीतही सर्व कवाडे खुली झाली आहेत. या स्वातंत्र्याचा योग्य उपयोग स्त्रियांनी करून घेतला पाहिजे. माणूस केवळ वरवरच्या गोष्टींमध्ये, बाह्यरूपामध्ये अडकला आहे. त्याने माणसासारखे वागले पाहिजे. समाजातील अदृश्य भिंती ओळखून त्या नाहीशा केल्या पाहिजेत. 'मन केवढं केवढं, त्यात आभाळ मावंना' असा दृष्टिकोन ठेवून मुक्त समाज निर्माण व्हायला हवा, असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केले.


मंगला गोडबोले म्हणाल्या, की मराठी कादंबरीविश्वात स्वयंपूर्ण, निर्णयक्षम स्त्रिया कमी प्रमाणात पाहायला मिळतात. कोणत्याही व्यक्तीचे कोणतेच रूप आदर्श नसते. सर्व रूपांचा मेळ घालणे हीच कला आहे. सध्या साहित्यामध्ये प्रवासवर्णनांचा भडिमार होतो. मात्र, या पुस्तकातील भावनांचा प्रवास विचार करायला लावणारा आहे. देशांची, संस्कृतींची, जीवनाची, नातेसंबंधांची तुलना प्रवास रंजक करते. लेखक जितका समृद्ध तितका वाचकालाही आनंद मिळतो. केवळ पुस्तकाची पाने उलटली की ते वाचले असे होत नाही. ते पुस्तक विचार करायला लावते का, हे महत्त्वाचे.

सुमित्रा भावे म्हणाल्या, की पुरुषप्रधानता मोठ्या सांस्कृतिक राजकारणाचा भाग असून व्यावहारिकदृष्ट्या मुक्त स्त्रियाही या जोखडात अडकल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रीला सर्वार्थाने मुक्त करण्यासाठी पुरुषांनी वाटचाल करायला हवी.

माधवी मेहेंदळे म्हणाल्या, की काल्पनिक लिखाणाच्या प्रांगणात पहिलेच पाऊल टाकताना मी अधिकाधिक अनुभवसमृद्ध झाले. दोन मैत्रिणींच्या मानसिक, वैचारिक प्रवासाची साक्षीदार होताना परकाया प्रवेशाचा आनंद मिळाला. प्रत्येक लिखाण हे आपले भाग्य घेऊन जन्माला येते. त्यामुळे प्रत्येक लिखाणाला त्याच्या वाटेवर सोडून दिले पाहिजे.

गौरी लागू यांनी पुस्तकातील काही लेखांचे अभिवाचन केले आणि दोन मैत्रिणींचा काल्पनिक युरोप प्रवास डोळ्यांसमोर उभा राहिला. संजय डोळे यांनी सूत्रसंचालन केले. धनश्री धारप यांनी आभार मानले.

ग्रंथाली




चेकपॉईंट चार्ली

डॉ. माधवी मेहेंदळे

मूल्य २५० रु.


सवलतीत १५० रु.

डॉ. माधवी मेहेंदळे यांनी लिहिलेली 'चेकपॉईंट चार्ली' ही ललित अंगानं जाणारी कादंबरी मला खूपच आवडली. लेखिकेला जे सांगायचं आहे ते वाचण्याची वाचकाची उत्सुकता शेवटपर्यंत अबाधित राहते. त्या दृष्टीनं केलेला कादंबरीचा फॉर्मेट खूप वेगळा आणि खिळवून ठेवणारा आहे. या कादंबरीचं वैशिष्ट्य म्हणजे यात मध्यमवयीन दोन स्त्रियांचा काल्पनिक युरोपप्रवास असला, तरी कादंबरीतली स्थळं, ठिकाणं, वर्णन आणि इतिहास हे सगळं काल्पनिक नाही. त्यामुळे एकाच वेळी काल्पनिक तर त्याच वेळी वास्तव यांचा अतिशय सुरेख मेळ या कादंबरीत बघायला मिळतो. या कादंबरीत दोन स्त्रिया जरी वाचकांच्या सोयीसाठी आणि कादंबरीच्या प्रवाहीपणासाठी दाखवलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात एकूणच कुठल्याही स्त्रीच्या मनातली स्त्री म्हणून सातत्यानं होत असलेली आंदोलनं खूप चांगल्या रीतीनं टीपलेली आहेत. स्त्री म्हणून तिचं असणारं अस्तित्व, जोडीदारावरचं तिचं मानसिक आणि शारीरिक पातळीवरचं अवलंबित्व, रुढी, परंपरा, संस्कार झुगारू पाहणारी तिची आजची मनोवस्था, संस्कारांचे चिकटलेले अवशेष, ढासळणारी मूल्यव्यवस्था आणि त्याच वेळी नव्यानं येऊ पाहणारे पर्याय अशा अनेक गोष्टींचं विश्लेषण अतिशय सोप्या, रंजक आणि तरीही अर्थपूर्ण रीतीनं या कादंबरीत वाचायला मिळतं. त्या दृष्टीनं या कादंबरीचं 'चेकपॉइंट चार्ली' शीर्षक खूपच बोलकं आहे.

– अच्युत गोडबोले

# एक सहवास आठवणीतला

**राम देशपांडे**



'स्वामीकार रणजित देसाई'

'बाळ'


'कोवाडकर सर'

'दादा'

'सरकार'

**व्य**क्ती एकच. पण आयुष्यभर अनेक नात्यांनी साऱ्याशी बांधली गेलेली. त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ चा आणि ते गेले तो दिवस होता ६ मार्च १९९२.

त्यांची अखेरची भेट झाली ती कोल्हापुरातल्या राजारामपुरीतल्या आशा नर्सिंग होममध्ये. कोवाडला असताना प्रकृती बिघडली म्हणून त्यांच्या दोन्ही मुलींनी- मधुमती आणि पारू यांनी - त्यांना कोल्हापूरला आणले. आशा नर्सिंग होममध्ये त्यांच्यावर उपचार चालू असताना आणखी काही तपासण्या करण्यासाठी त्यांना मुंबईला नेण्याचं ठरलं. या काळात कोल्हापूरच्या या वास्तव्यात त्यांची नि माझी रोजची भेट ठरलेली! अर्थात किती वेळ बोलली यापेक्षा कितीदा भेटलो-बोललो याला माझ्या दृष्टीने महत्त्व होतं.




एकदा प्रा. राम शेवाळकर व्याख्यानांच्या निमित्ताने, कोल्हापूरला आले असताना बोलता बोलता 'स्वामी'कारांचा विषय निघाला आणि सुदैवाने दादा (रणजित देसाई) इथे कोल्हापूरला होते म्हणून शेवाळकरांबरोबर मी आशा नर्सिंग होममध्ये गेलो. दादांची प्रकृती जरी क्षीण झाली असली तरी त्यांचा आवाज चांगला होता. आठवणीची उजळणी करावी एवढी स्मरणशक्ती चांगली होती आणि शेवाळकर आणि दादा यांच्या संभाषणातून ते सतत जाणवत होते. या अर्धा-पाऊण तासाच्या भेटीत किती क्षेत्रातून दादांनी आम्हाला फिरवून आणावं. भाऊसाहेब खांडेकर, प्रकाशक रा.ज. देशमुख, कॉन्टिनेंटलचे अनंतराव, अरुण शेवते, प्रा. नरहर कुरुंदकर, इरावती कर्वे, दत्तो वामन पोतदार, ग.ह. खरे अशा कितीतरी व्यक्तींच्या सहवासातल्या आठवणी सांगताना त्यांची मुद्रा प्रसन्न होती, नाही म्हणायला कुरुंदकर गुरुजींच्या आठवणी सांगायला लागले की भावनांचा बांध सहज फुटायचा. शेवाळकर यातून त्यांना एखाद्या नाटकाचा किंवा असाच एखादा त्यांच्या आवडीचा विषय काढून बाहेर काढायचे. पण कुरुंदकरांच्या आठवणी सांगताना त्यांना खरोखरीच गहिवर आवरता यायचा नाही. त्या दिवशी खोलीत आम्ही तिघेच- शेवाळकर, मी आणि दादा - होतो. दादा फुलून आले होते. भरभरून बोलत होते आणि आपण आजारी आहोत याचा क्षणभर का होईना त्यांना विसर पडत होता.

गप्पांनाही अखेर होतीच. शेवाळकरांनी दादांना म्हटलं, 'प्रकृतीस जपा. तुमचं नवं लेखन वाचायला मीही उत्सुक आहे. मनात जे जे लिहायचे संकल्प आहेत ना ते तुमचे सिद्धीस जातील. बरे व्हा. भेटू या पुन्हा आपण.'

'शेवाळकर सर, आमचे गुरुजी फार लवकर गेले हो. आज ते हवे होते' असं म्हटलं आणि दादांना आवरणे कठीण झाले. डोळ्यांतून घळाघळा पाणी येत होते. दादांच्या इतकेच शेवाळकरही हळवे. त्यांनाही आवरणे कठीण व्हायला लागले. दोघांनाही कुरुंदकर गुरुजींचा सहवास भरपूर मिळालेला. गप्पांचे फड रंगवत असलेले कुरुंदकर आज या दोघांना आठवत होते. एवढ्यात डॉक्टर राऊंडला आले आणि शेवाळकर-देसाई यांच्या गप्पांची मैफल पाहून दाराच्या फटीतून वाकून एवढंच म्हणाले,

'सरकार, नंतर येतो मी. चालू दे तुमचं. पण काही खाल्लंय की नाही. काही तरी खाल्लं पाहिजे. त्याशिवाय औषधे कशी लागू पडतील?'

डॉक्टर निघून गेले. शेवाळकरांना आणखी एक-दोन ठिकाणी जायचे होते म्हणून शेवाळकरांनी दादांचा हात हातात घेतला. घट्ट दाबून धरला आणि पुन्हा त्याच घटनेची पुनरुक्ती. दोघांनाही बोलता येईना. शेवटी एकमेकांनी कसंबसं सावरलं आणि दादा शेवाळकर सरांना म्हणाले, 'आम्ही आता कुरुंदकरांच्या जागी तुम्हाला पाहतो आहोत. प्रकृतीला जपा. दौरे कमी करा. विश्रांती घ्या आणि मे महिन्यात कोवाडला या. खूप छान वाटेल तुम्हाला.'

शेवाळकरांनी त्यांचा निरोप घेतला. पुढे दादांना भेटायला

म्हणून आशा नर्सिंग होममध्ये गेलो. मला पाहून मधू घरी जाऊन येते म्हणाली. ती घरी गेली. आता खोलीत आम्ही दोघेच होतो. गप्पांचे अनेक विषय होते. ते बोलत होते, मी ऐकत होतो. कधी ते राजाराम महाराजांच्या आठवणी सांगायचे तर बडे गुलाम अली खाँ, बालगंधर्व यांच्या संगीताच्या दुनियेत मला घेऊन जायचे. मधेच त्यांना काहीतरी गुणगुणायची लहर यायची. मग श्रीनिवास खळे, सी. रामचंद्र, राजा ठाकूर, शरद तळवलकर, अरुण सरनाईक, चित्रकार रवींद्र मेस्त्री यांच्या आठवणी सांगायचे. असेच ते आठवणी सांगण्यात रंगून गेले होते आणि त्यांचं लक्ष हातातल्या घड्याळाकडे गेलं. म्हणाले, 'अरे, तुझी बायको तुझी वाट पहात असेल ना.' खरं सांगू, त्यांनी हात हातात घेतला. म्हणाले, 'तुझी वाट पहाणारं कुणीतरी आहे, तुझ्यावर रागावणारं कुणीतरी आहे. पण मला असं कुणी नाही रे. मधु-पारू या मुली माझी खूप काळजी घेतात. पण अरे, किती झालं तरी त्या आता परक्याचं धन. त्यांनाही खूप मर्यादा आहेत. पण आता वाटतं, की कुणीतरी वाट पहाणारं, रागावणारं, जिवाभावाचं जवळ असायला हवं होतं.'

'दादा आम्ही आहोत की, कशाला काळजी करता? आणि सारा महाराष्ट्र तुमची काळजी करत आहे. हे भाग्य काही कमी नाही.'

दादा काही क्षण सुखावले. मधू यायची वेळ झाली होती नि आली की मी निरोप घेणार होतो. तेवढ्यात दादा म्हणाले, 'मुंबईला जाऊन येतो, मग भेटू आपण. तुझं घर बघायचं राहिलंय. तुम्ही दोघेही आता प्रकृतीला जपून राहा. आनंदात राहा.'

मधू आली आणि मी दादांचा निरोप घेण्यासाठी वाकलो. पायाला हात लावून नमस्कार केला तर दादा ओक्साबोक्शी रडत होते. त्यांना आवरणे कठीण होते. पण शेवटी तेच सावरले आणि म्हणाले, 'मुंबईहून आलो ना तर घरी नक्की येणार तुझ्या.'

आधी दादा मुंबईहून 'आलो की' असं म्हणाले आणि आता 'आलो तर' असं म्हणाले. डॉक्टरही आपला राऊंड संपवून दादांना भेटायला आले. दादांनी डॉक्टरांची ओळख करून दिली आणि मी निरोप घेऊन खोलीतून बाहेर पडणार एवढ्यात दादांना काहीतरी बोलायचे असावं म्हणून हाक मारली आणि म्हणाले, 'मागे मी तुला पारूच्या घरी सांगितलेलं कायम लक्षात ठेव. कुणालाही कधीही विचारल्याशिवाय सल्ला देऊ नकोस. जो देशील त्यात तुझा स्वार्थ नको. बदसल्ला देऊ नकोस. कायम हे लक्षात ठेव.'

दादांची हीच माझी अखेरची भेट. आशा नर्सिंग होममधली अखेरची भेट.

❀❀❀

दादा गेले त्यालाही आता २५ वर्षे झाली. कधीकधी मनावर उदासीनता जाणवते. थकतो, दमतो. एकटाच बसलेला असतो त्यावेळी दादांच्या त्या सहवासातल्या आठवणी आठवतात, लेखनाच्या बैठका जशा आठवतात, तशाच कोवाडच्या वाड्यातल्या गप्पा आठवतात. बेळगावच्या नवसाहित्य बुक डेपोच्या रामभाऊ मोरे यांच्या दुकानातल्या गप्पा आठवतात. मल्हारराव देशपांडे कालकुंद्रीकर सरकारांनी त्यांच्याबरोबर गाजवलेले गप्पांचे फड आठवतात, शंकर कुलकर्णींच्या नकला आठवतात आणि मला माझ्या मनात कायमचं घर केलेल्या त्या किसा मावशीही आठवतात. दादा जिच्या अंगाखांद्यावर खेळले त्या दादांनी सांगितलेल्या आठवणी आठवतात आणि किसा मावशीला भेटायला गेलो तो प्रसंगही आठवतो.

एकदा दादांना काय मनात आलं कुणास ठाऊक. मला म्हणाले, 'चल आपण किसा मावशीला भेटून येऊ या. खूप थकली आहे ती. अरे, तिने माझ्यावर खूप प्रेम केलं. माझ्या आजीनं आणि किसा मावशीनं मला कधी आईची आठवण होऊ दिली नाही रे!'

मग पत्ता शोधत शोधत किसा मावशीकडं गेलो. खूप थकल्या होत्या. दादांनी दारातूनच मोठ्यानं हाक मारली, 'किसा मावशी, मी तुझा बाळ आलोय गं.' दादांचा आवाज ऐकला. किसा मावशीचा आवाज खुलला. 'बाळ, बरा आहेस. किती खराब झालास रे. मला ठाऊक आहे पोरी तुझी काळजी घेतात. पण आता एक गोष्ट लक्षात ठेव. मी गरम गरम भाकरी करते. जेवल्याशिवाय जायचं नाही आणि बाळ न जेवता गेलास तर माझ्या हातचा मार खाशील बगा.'


किसा मावशी बोलायच्या थांबल्या. दादा किसा मावशीजवळ बसून होते. डोळ्यांतून घळाघळा अश्रू ओघळत होते. एक-दोन थेंब किसा मावशीच्या हातावर पडले आणि मावशी म्हणाल्या, 'बाळ, काय हे. असं नाही करायचं?'

दादा त्यावर एवढंच म्हणाले, 'आता मला 'मार खाशील बगा' असं म्हणणारं तुझ्याशिवाय कोण आहे?'

**– राम देशपांडे**

'अक्षर', आशियाना कॉलनी, जरगनगर-२, कोल्हापूर-४१६००७
दूरध्वनी : (०२३१) २६३७८६६ भ्रमणध्वनी : ८६००१४५३५३

ग्रंथाली



**छोट्या दोस्तांना ३५ वर्षे 'टॉनिक' देऊन सुदृढ बनवणाऱ्या मानकरकाकांच्या व्यक्तिमत्त्वाचा चौफेर वेध घेणारे पुस्तक**

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# अमेरिकेचं छिद्रान्वित परराष्ट्र धोरण




डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**लष्करी बळाचा नेतृत्वाशी काहीएक संबंध नाही. अमेरिका संरक्षण खात्यावर रशियापेक्षा १० पट जास्त खर्च करते. तरीही पुतिनमध्ये जे नेतृत्वगुण व द्रष्टेपण सापडते ती वॉशिंग्टनमध्ये सापडत नाही असा जगाचा समज झाला आहे. आपल्या घोडचुकीमुळे अमेरिकेनं सिरिया, इराण, इराक व रशिया हे चार देश आपल्या विरोधात एकत्र आणले आणि जवळचा मित्र इसराईलला दूर ढकलले. अमेरिकेची मेहरनजर मध्यपूर्व भागातील मुस्लिम देशांना आत्मघातकी ठरली. जवळजवळ सर्व देशात जुलूमशाही असे. त्या ऐवजी या देशांनी लोकशाही स्वीकारावी या उदात्त विचारानं अमेरिका पुनर्रचना करण्यास निघाली. हे खडकावर रोपटं उगवेल अशी आशा करण्यासारखं होतं.**

प्रत्येकालाच शत्रू असतात. सर्वांशी मैत्री जोडणं कठीण. मग अमेरिकेसारख्या महासत्ताक राष्ट्राला काही शत्रू असले तर त्यात फारसं अप्रूप नाही. पण अमेरिकेनं हल्ली त्याची स्पेशल्टी केली असं वाटतं. एक म्हणजे त्या देशाला खरा शत्रू कोण हेच ठाऊक नाही. या धूसरतेमुळे परराष्ट्र धोरणं आखणं कठीण होऊन त्याचे हास्यास्पद उपपरिणाम झाले. २०१२च्या निवडणुकीपूर्वी देशाचे परराष्ट्र संबंध नवीन पातळीवर नेऊ असं ओबामा म्हणाले. पण पुतिननं क्रायमिया काबिज केल्यावर ओबामा बिथरले आणि त्यांनी रशियाला धडा शिकवण्यासाठी युरोपी दोस्तराष्ट्रांबरोबर त्या माजी महासत्ताक राष्ट्रावर आर्थिक बंधनं लादली. आपली शेपटी दोन पायात घालून रशिया नमतं घेईल अशी अमेरिकेची अपेक्षा. पण झालं उलटंच. ते रशियन अस्वल चवताळून ओबामाच्या आत्मसन्मानाला ओरबाडण्यास सज्ज झालं. खरं म्हणजे क्रायमिया हा सुपारीएवढा लहान भूप्रदेश. तिथले बहुसंख्यांक लोक रशियन. म्हणून त्यांनी पुतिनशी एकनिष्ठा दाखवल्यानं जगाचं फारसं नुकसान झालं नाही. जगानं त्याची नोंद देखील घेतली नाही. त्या मोठ्या देशाशी वैर पत्करण्याएवढी ही बाब मोठी नव्हती. द्रष्टाशून्य अमेरिकन परराष्ट्र धोरणानं त्याची दखल घेतली नाही. रशियानं लगेच चीनशी हातमिळवणी करून अस्वलाचा भस्मासूर केला.

अमेरिका चीनला फुलासारखं वागवते. त्याच्या वाढत्या शक्तीचा आदर करते. पूर्वेकडील देशांवरील अमेरिकेचं प्रभुत्व नष्ट करून त्याची जागा आम्ही घेऊ असं आव्हान चीननं जाहीर करूनही त्या महासत्ताक राष्ट्रानं ब्र काढला नाही. त्या दृष्टीनं चीननं आपलं परराष्ट्र धोरण आखून संपूर्ण दक्षिण चिनी समुद्र आमच्या मालकीचा आहे अशी घोषणा केली. याचं महत्त्व असं की या समुद्रातून दरवर्षी ५ ट्रिलियन डॉलरचा व्यापार तर चालतोच पण त्याच्या तळात अमाप खनिज संपत्ती आहे. हे धोरण अंमलात आणण्यासाठी चीननं स्प्रॅटले नावाचा जो असंख्य लहानमोठ्या बेटांचा समुह आहे त्यातले काही जोडून तिथे आपला झेंडा रोवला. तिथे लष्करी छावणी उभारून भोवतालच्या अमेरिकेच्या दोस्तराष्ट्रांना अस्वस्थ केलं. बोर्निओ, मलेशिया, फिलीपाईन्स, इंडोनेशिया व एकेकाळचा शत्रू व्हिएटनाम या देशांनी अमेरिकेच्या पौरुषत्वाविषयी प्रश्नचिन्ह उभं केलं. तरीही त्या गोऱ्या देशानं पुतिनप्रमाणे चीनला कुठलीच शिक्षा दिली नाही. त्याला वठणीवर आणण्यासाठी बोट देखील उचललं नाही. त्या चुटुकल्या क्रायमियापेक्षा सर्व चिनी समुद्रावर जाहीर केलेलं सार्वभौमित्व केव्हाही जगातील शांततेला तडा पाडण्यासारखं. पण अमेरिकन परराष्ट्रधोरणानं त्याची पुरेशी दखल घेतली नाही.

चीनच्या आक्रमणास तीन वर्षांपूर्वी सुरुवात झाली. परगृहानं घेतलेल्या चित्रावरून चीनचं उद्दिष्ट सूर्यप्रकाशाएवढं स्पष्ट होतं. तरीही ओबामांनी सुस्ती दाखवली. शेवटी दोस्तराष्ट्रांनी व पेंटागॉननी जेव्हा ओबामांना जागृत केलं तेव्हा चीनचा विस्तार नामंजूर असून तो आम्ही ओळखत नाही असं जाहीर केलं. प्रत्येक देशाचं सार्वभौमत्व समुद्रात १२ सागरी मैलपर्यंत असतं असा आंतरराष्ट्रीय कायदा आहे. म्हणजे या चीनच्या नवीन छावणीपासून तेवढे मैल दूर राहणं आलंच. परंतु तसं केलं तर त्या पितदेशाचं प्रभुत्व मान्य केल्यासारखं होईल म्हणून ओबामांनी भीतभीतच मांजरीच्या पावलांनी अमेकिन नौदलाला या मर्यादेचं उल्लंघन करण्याची

परवानगी दिली. अमेरिकन USS Lasser नावाची विनाशिका स्प्रॅटले बेटावरून गेली आणि चीनच्या विस्ताराला आव्हान दिलं. चीननं अपेक्षेप्रमाणे साम्यवादाला शोभेल अशा शब्दांत अमेरिकेवर शिंतोडे उडवले.

पण एका फेरीमुळे संबंधित देशाची विश्वासार्हता वाढणे कठीणच. त्यासाठी त्या भागात सारखं परिवहन करणं आवश्यक आहे. अमेरिका त्यासाठी समर्थ आहे. पण ओबामांत तेवढी हिंमत आहे का या विषयी जग शंकीत आहे. अमेरिका नुसता भुंकतो पण चावत नाही अशी चीनची धारणा आहे. याचं कारण असं की चीननं ताठर भूमिका घेतली. सामान्यतः अशी भूलेखीय भांडणं संयुक्त राष्ट्र संघाची खास समिती सोडवते. फिलीपाईन्सनं त्या समितीसमोर आपली तक्रार नेली व तिनं त्या देशाच्या बाजूने निकाल दिला. पण चीननं तो धुडकावून दिला. या आडमुठेपणाचं कारण अमेरिकेचं दुर्बल परराष्ट्र धोरण असंच म्हणावं लागेल. खरं म्हणजे ते महासत्ताक राष्ट्र चीन आपला शत्रू आहे का या संभ्रमात पडलेलं आहे.

अमेरिकेचं धोरण किती न्हस्व दृष्टीचं आहे हे त्या देशानं नुकत्याच इराणशी केलेल्या अणुकरारावरून सिद्ध होतं. सध्या मध्यपूर्व भागातले अधिकांश तेलसमृद्ध देश युद्धानं पेटलेले असून त्यांचे अमेरिकेशी संबंध एकतर ताणलेले नाहीतर तुटलेले आहेत. ही जादू अमेरिकेनं कशी केली हे अभ्यासण्यासारखं आहे. या भागातला अमेरिकेचा जिवश्चकंठश्च मित्र म्हणजे इसराईल. दोन देशांतले संबंध एवढे दाट असत की जग त्या ज्यू राष्ट्राला अमेरिकेचा ५१वा प्रांत समजे. पण ओबामांनी त्याच्या पाठीत खंजीर खुपसला आणि त्याला दूर ढकललं. आता त्या दोन देशांतून विस्तव आडवा जात नाही. ही किमया कशी घडली?

मावळत्या कारकिर्दीची इतिहासाच्या पानात नोंद व्हावी म्हणून आपण काहीतरी करायला पाहिजे या उदात्त हेतूनं ओबामा आकृष्ट झाले. पण त्यासाठी त्यांनी जे लक्ष्य निवडलं ते बघून उभी अमेरिका व इसराईल त्यांच्या विरोधात उभे राहिले. इराण हा एक मानवी हक्क न जुमानणारा व दहशतवादी देश म्हणून अमेरिकेनं अनेक वर्षांपासून त्या देशावर बंधनं लादली होती. तो देश अण्वस्त्र संशोधन करीत असून पुढेमागे अण्वस्त्रधारी होण्याची शक्यता टाळण्यासाठी ओबामांनी त्या पारसी देशाशी एकतर्फी अणुकरार केला. पण त्याच्या मोबदल्यात अमेरिकेला निदान १० वर्षं तरी फ्लुटोनियमचं शुद्धीकरण करणार नाही या आश्वासनाशिवाय दुसरं काही एक मिळालं नाही. अणुभट्ट्या संवेदनशील भागात असतील तर त्यांचं स्वयंपरिक्षण करण्याचा अधिकार इराणला मिळाला. हे कोल्ह्याला मेंढ्यांची राखण करण्यास नियुक्त करण्यासारखं होतं. म्हणून अमेरिकेच्या अधिसभेनं तो ठराव बहुसंख्येनं नामंजूर केला. पण ओबामांचं विधेयक धुडकावून देण्यास अतिबहुसंख्या न मिळाल्यामुळे ते आपोआप पारीत होऊन बिचाऱ्या इसराईलवर संकट कोसळलं.

या ठरावामुळे इराणला गोठलेल्या खात्यातले पैसे मिळतील,



व्यापारी बंधनं ढिली करण्यात येतील व त्याची झपाट्यानं वाढ होईल. यापासून अमेरिकेला काय मिळालं? आयातोला खुमेनीची 'मुर्दाड अमेरिका' ही शिवीच पदरात पडली. त्यांच्या द्वेषाची धार मुळीच बोथट झाली नाही. उलट त्यांनी अमेरिकन कंपन्यांनी देशबांधणीत भाग घेऊ नये व अमेरिकन अधिकाऱ्यांपासून दूर रहावं असा फतवा काढला. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी अमेरिकन पर्यटकांना हेरगिरीच्या आरोपावरून अटक करण्यास सुरुवात केली व अमेरिकेवर संगणकीय हल्ले चढवून अनेक उद्योगांना हैराण केलं. ही कृतघ्नता बघून ओबामांना मुळीच वाईट वाटलं नाही. त्यामुळे इतिहासात त्यांच्या कारकिर्दीची जी नोंद होईल ती सकारात्मक नसणार हे उघड आहे.

पण महत्त्वाचं म्हणजे या करारावरील शाई वाळण्यापूर्वीच इराणनं रशियाशी सख्य जोडलं. ओबामांनी बंधनं लादून केलेल्या अपमानामुळे पुतिनच्या मनात अमेरिकेविषयी एक प्रकारचा द्वेष खदखदतच होता. म्हणून त्यानं इराणबरोबर अमेरिकेविरुद्ध रणनिती आखली. ओबामांनी सिरियाचे अध्यक्ष बाशर आसाद यांनी पदत्याग करावा म्हणून फर्मान काढलं होतं. महासत्ताक राष्ट्राच्या शब्दाला जग मान देई. पण ऑक्टोबर २०१५ मध्ये पुतिननं आसाद गादीवर राहतील असं बजावून ओबामांचं नाक कापलं. सप्टेंबर ३०, २०१५ रोजी रशियन लष्करातले एक तीन तारांकित सेनापती बगदाद येथील अमेरिकन दूतावासात गेले व एका तासात अमेरिकेनं आपलं लष्कर व विमानं मागे घ्यावीत असा अंतिम इशारा दिला. अमेरिकेसारख्या मोठ्या देशाला असे इशारे ऐकण्याची सवय नसते. पण ओबामांनी माघार घेऊन ती आज्ञा पाळली आणि रशियानं एकदम आयसिसवर वैमानिक हल्ले चढवले. आतापर्यंत ओबामांनी गेली दोन वर्षं सिरियावर असाच वर्षाव केला होता. पण रशियापुढे ते हल्ले निष्प्रभ ठरले. अमेरिकेनं एक महिन्यात जेवढे बॉंब टाकले नाहीत तेवढे रशियानं एका दिवसात शत्रूवर टाकले व त्याची सळो की पळो केली.

रशियाच्या दृष्टीनं 'शत्रू' म्हणजे निव्वळ आयसीस नव्हता तर आसादला विरोध करणाऱ्या सीआयए प्रशिक्षित व प्रणीत विरोधकांच्या छावण्या होत्या. पुतिननं पहिल्या हल्ल्यात त्यांचा समाचार घेऊन अमेरिकेला तोंडघशी पाडलं. त्यामुळे आसादला राजकीय स्थैर्य मिळालं व ओबामांना आपलं विधान मागे घ्यावं

लागलं. या मतपरिवर्तनामुळे अमेरिकेजवळ व्यूहरचना नाही असं रॉबर्ट गेट्स म्हणाले. ते अमेरिकेचे माजी संरक्षणमंत्री. त्यांच्या विधानाला वजन होतं.

रशियाचे हल्ले यशस्वी ठरुन आसादला अभय तर मिळालंच पण तुर्कस्थानमध्ये पळून गेलेले ८ लाख विस्थापित घरी परतले असं म्हणतात. नुकतंच आयसीस किंवा त्या संबंधित असलेल्या दहशतवाद्यांनी सामानात बॉंब घालून रशियाचं एक विमान पाडलं व त्यातले २०० हून अधिक पर्यटक त्या जळितकांडात ठार झाले. त्यामुळे पुतिन आता दुप्पट जोमानं व सर्वशक्तीनिशी आयसीसचा नायनाट करेल असं म्हणतात. जिथे अमेरिकेला दोन वर्षांत यश आलं नाही तिथे दोन महिन्यांत रशिया विजयी होईल.

या शक्ती प्रदर्शनाचे दोन परिणाम झाले. एक सौदी अरेबिया व दुसरा इराक. हे दोन्हीही अमेरिकेचे बंदे. ओबामांनी शिया इराणशी करार केला म्हणून सुनी सौदी अरेबिया कमालीचा नाखूष झाला. इराणनं जर अण्वस्त्र प्राप्त केले तर आम्हीही तसंच करू असं त्यानं ओबामांना बजावलं देखील. त्यासाठी पाकिस्तान धावून येईल यात शंका नाही. पण महत्त्वाचं म्हणजे सौदी अरेबियाची अमेरिकेवरील निष्ठा ढळत असून त्या देशानं रशियाशी प्रथमच संबंध जोडले व पुतिननं सौदी अरेबियात १६ अणुऊर्जेच्या भट्ट्या बांधण्याचं कबूल केलं.

इराक तर अमेरिकेच्या खिशात राहणारा देश. सद्दाम हुसेनचा नायनाट करून पाश्चात्त्य लोकशाही तिथे स्थापन करण्यासाठी अमेरिकेनं त्या देशात युद्ध लढलं. अब्जावधी डॉलर व हजारो जीव खर्च केले. पण ओबामांच्या चुकीच्या धोरणामुळे तो मित्रही फितूर झाला. अमेरिकेनं शस्त्रास्त्रं नाकारली व आयसिसनं देशाचा उत्तर भाग ताब्यात घेतला तरी त्याला हटवण्यासाठी पुरेसे प्रयत्न झाले नाहीत म्हणून इराकचे शिया पंतप्रधान हैदर अॅल आबादी अगोदरच ओबामांवर नाखूष होते. पुतिनचं नेतृत्व व बांधिलकी बघून आबादींनी आमच्या देशावरही हवाईहल्ले चढवून आयसीसचा नाश करा म्हणून रशियाला विनंती केली व अमेरिकेला डावललं. म्हणजे एवढी वर्षं युद्ध लढलं म्हणून उपकार मानण्याऐवजी अमेरिकेला चपराक मारली.

बलशाली नेतृत्वात चुंबकत्व असतं. इतर देश आकर्षित होतात. या सर्व घटनांमुळे पुतिनचं नेतृत्व जगाला दिसलं. नोव्हेंबर २०१५ला फोरब्ज या जगविख्यात अमेरिकन मासिकानं दरवर्षीप्रमाणे जगातील बलशाली नेत्यांची यादी प्रसिद्ध केली आणि राजकीय वर्तुळात खळबळ माजवली. पुतिनचा या यादीत पहिला नंबर लागला. जर्मनीच्या अँजेला मर्कल दुसऱ्या क्रमांकावर. ओबामा तिसऱ्या नंबरवर घसरले. नेतृत्वहिनतेमुळे झालेला अपमान फार काळ लपवून ठेवता आला नाही. आजही पुतिनची लोकप्रियता ९० टक्के तर ओबामांची फक्त ४५ टक्के आहे. लष्करी बळाचा नेतृत्वाशी काही एक संबंध नाही. अमेरिका संरक्षण खात्यावर रशियापेक्षा १० पट जास्त खर्च करते. तरीही पुतिनमध्ये जे नेतृत्वगुण व द्रष्टेपण सापडते ती वॉशिंग्टनमध्ये सापडत नाही असा जगाचा समज झाला आहे. आपल्या घोडचुकीमुळे अमेरिकेनं सिरिया, इराण, इराक व रशिया हे चार देश आपल्या विरोधात एकत्र आणले आणि जवळचा मित्र इस्राईलला दूर ढकललं. या अद्वितीय कार्यासाठी नोबेल समितीनं ओबामांचा दुसऱ्या पारितोषिकासाठी विचार करावा.

अमेरिकेची मेहरनजर मध्यपूर्व भागातील मुस्लिम देशांना आत्मघातकी ठरली. जवळजवळ सर्व देशात जुलूमशाही असे. त्या ऐवजी या देशांनी लोकशाही स्वीकारावी या उदात्त विचारानं अमेरिका पुर्नरचना करण्यास निघाली. हे खडकावर रोपटं उगवेल अशी आशा करण्यासारखं होतं. कारण या देशात पाश्चात्त्य मूल्यधारी लोकशाही नसण्यामागे कारण होतं. ते म्हणजे शिया व सुनींमधला पारंपरिक धार्मिक कलह. तो शेकडो वर्षांपासून धुमसत आहे. आपण तिथे जाऊन त्याचा नाश करू व त्या जागी लोकशाहीचं बीज पेरू हे एक कवीस्वप्न ठरलं. इथे कायदा व सुव्यवस्था असण्यासाठी चाबकाची जरुरी असते हे अमेरिकेला पटलं नाही. पण या चुकीसाठी अमेरिकेला भारी किंमत भरावी लागली. लोकशाहीऐवजी या देशात विषवृक्षच उगवले. लिबिया, येमन, इराक व सिरिया हे देश बेचिराख होऊन अमेरिकेविरुद्ध झाले. सद्दाम हुसेन कितीही निर्दयी व मौमार गडाफी कितीही क्रूर असला तरी त्यांच्या कारकिर्दीत त्या देशात कायदा व सुव्यवस्था होती. आता ती कुठे सापडते? त्या हुकूमशहांनी आपआपल्या देशांत प्रसंगी विषारी वायू वापरून वंशविच्छेद केला म्हणे. पण अमेरिकेनं तिथे घुसून काय कमावलं? लक्षावधी लोक मेले व दशलक्षावधी विस्थापित झाले. तुलनेनं सद्दाम हुसेन, मौमार गडाफी किंवा होसनी मुबारक देवदूत होते. मुबारक असताना इजिप्त अमेरिकेच्या प्रभाव वर्तुळात होता. त्याला ओबामांनी काढून टाकल्यावर तिथे अराजक पसरलं. आता तो देश रशियाकडे वळला. अफगाणिस्तानची दु:स्थिती अजूनच भयानक आहे. त्या देशाच्या अध्यक्षांची सत्ता फक्त काबूलएवढीच मर्यादित आहे. उर्वरित देशात अराजक पसरलेलं आहे. म्हणजे त्या देशाचे अध्यक्ष आणि मुंबईचे महापौर यात काही फरक नाही. दोघांच्याही सत्ता भौगोलिक दृष्ट्या मर्यादितच.

या वरून एक धडा शिकण्यासारखा आहे. जेव्हा जागतिक घडामोडीत अमेरिका पुढाकार घेत नाही व नेतृत्व दाखवत नाही तेव्हा जगात अराजक पसरतं असं आढळून आलं. पण सुरुवातीपासूनच ओबामांचा अमेरिकेच्या वर्चस्वाला व वेगळेपणाला विरोध होता. त्यामुळे अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणाला भोकं पडली आहेत. जानेवारी २०१७ मध्ये नवीन अध्यक्ष पदावर येईपर्यंत यात सुधारणा होणार नाही.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार (Ph.D.)**

latalabh@aol.com

(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षे चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

ग्रंथाली




## बाबासाहेब...! – यशवंत मनोहर

'बाबासाहेब...!' ही यशवंत मनोहर यांची विश्वतत्त्वज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील महाकविता! 'आंबेडकर' हे निरंतर सर्जनशीलता, उदंड मानवी सन्मानशीलता आणि विज्ञानदृष्टीशीलता या उजेडमूल्यांच्या पायावर संपूर्णच विश्वाची पुनर्रचना करू शकणाऱ्या महाप्रकल्पाचे नाव आहे. 'आंबेडकर' या शब्दाचे लेखन दुनिया आता आमूलाग्र क्रांती, असीम प्रज्ञान, माणुसकीचे अथांग किंवा अनंत उजेडायन असेही करते.

'आंबेडकर' हा आता पृथ्वीच्या पाठीवर सर्वात अधिक वेळा उच्चारला जाणारा महान शब्द झाला आहे. शोषणविहीन मानवी जीवनाच्या निर्मितीसाठी आता 'जयभीम' हा पासवर्ड झालेला आहे आणि मानवी हक्कांसाठी संग्रामदीक्षा देत तो दुनियेत दुमदुमतो आहे. म्हणूनच यशवंत मनोहर यांनी ही महाकविता लाडक्या लेकराप्रमाणे संपूर्ण विश्वालाच उराशी कवटाळणाऱ्या बाबासाहेबांच्या आर्तस्वी महाप्रज्ञेला एकशेपंचविसाव्या जयंतीच्या निमित्ताने सादर अर्पण केलेली आहे.

बाबासाहेबांच्या प्रत्येकच शब्दावर जगातल्या सर्वच माणसांची नावे सन्मानाने छापली आहेत आणि बाबासाहेबांच्या सर्वच शब्दांचे भाषांतर मनोहरांनी 'बाबासाहेब...!' या एकाच सूर्यशब्दात केलेले आहे आणि हे भाषांतर वाचकांना माणुसकीच्या परमशिखरावर घेऊन जाईल.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**


## मराठी व्याकरणातील वादस्थळे – डॉ. सुनील रामटेके




एका महत्त्वाच्या जटिल व व्यापक विषयाचा हा प्रयत्न खरोखर अभिनंदनीय आहे. विवेचन तर्कशुद्ध आहे. व्याकरणविषयक बहुतेक सर्व लेखकांची मते घेऊन त्या मतांचा साधकबाधक विचार केलेला आहे. मांडणी अतिशय सुस्पष्ट आणि सुसंगत आहे. मराठी व्याकरणविषयक एकेचाळीस लेखकांचे विचारधन येथे तपासले आहे. त्याशिवाय कोणताही महत्त्वाचा लेखक अभ्यासकाच्या नजरेतून निसटलेला नाही. या संशोधन प्रकल्पात लेखकाने बौद्धिक सचोटी दाखविली आहे. दामले, अर्जुनवाडकर, आगरकर, गुंजीकर, दावतर, ब्लूमफील्ड अशा ख्यातनाम व्याकरणकारांच्या मतांचा परामर्श लेखकाने निर्भयपणे, वस्तुनिष्ठपणे व समतोलपणे घेतला आहे. प्रस्तुत प्रबंध गुणसंपन्न आहे. हा प्रकल्प अभ्यासक व मार्गदर्शक यांच्याप्रमाणेच विद्यापीठांना भूषणावह आहे.

– डॉ. हे. वि. इनामदार

**मूल्य ४०० रु. सवलतीत ३०० रु.**




## मळवट – फ.मुं. शिंदे


फकीर मुंजाजी शिंदे उर्फ फ. मुं. शिंदे उर्फ सर्व मित्रांचा 'फ.मुं'. एक कवी. एक सालस, निगर्वी, अभिजात, बहुश्रुत व सर्वप्रिय असं लोभस व्यक्तिमत्त्व. पिंड कलावंताचा. व्यक्तिमत्त्व कवीचं. कुठलंही व्यासपीठ वर्ज्य नसलेला हा माणूस, श्रोत्यांच्या व रसिकांच्या मनात वसलेला.

श्रेयाचे व सन्मानाचे सर्व प्रतिष्ठित संस्कार लेऊन आपल्या शब्दनिष्ठ ताकदीनं आविष्कृत होणारा हा काव्याविष्कार म्हणजे फ.मुं. शिंदे यांच्या काव्यतपश्चर्येची सशक्त फलश्रुती आहे.

प्रतिष्ठितांच्या व प्रस्थापितांच्या यादीत केवळ 'कविता' या वाङ्मयप्रकाराच्या शिदोरीवर, मान्यतेच्या सर्व निकषांवर तावून-सुलाखून प्रस्थापित होत व राजमान्यतेसह लोकमान्यता मिळवत, असा हा कार्यकर्तृत्वाचा शिलालेख फ.मुं.नी मोठ्या हिमतीनं व हिकमतीनं मराठी साहित्य-प्रांतात गिरवून ठेवला आहे. आज सर्व मान्यवरांच्या यादीत फ.मुं. शिंदे हे नाव कवी म्हणून अग्रणी असणं हा साहित्य-शारदेच्या प्रांतातही प्रतिष्ठेचा भाग समजला जातो.

– प्रकाश कामतीकर

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**




# माझं लडाख

आत्माराम परब, नरेंद्र प्रभू

माझी लडाखची वारी
असे सर्वाहून न्यारी
जरी एकदाच केली
याद राहे जन्मभरी

**आ**मची पर्यटन संस्था 'ईशा टूर्स' आज जगातल्या ४५ ठिकाणी सहली नेत असली तरी 'लडाख' माझ्यासाठी अगदी खास आहे. कोकणातलं माझं गाव जसं मला आवडतं तसंच लडाखही मला प्यारं आहे. ज्या लडाखला माझं पहिलं जाणं झालं त्या प्रवासाचं वर्णन म्हणून एक पुस्तकच लिहावं लागलं. 'लडाख... प्रवास अजून सुरू आहे' या पुस्तकाचं वाचकांनी जोरदार स्वागत केलं. तीन वर्षात त्याची तिसरी आवृत्तीही निघाली. याच लडाखने माझ्या जीवनाची वाटही बदलून टाकली. मी पर्यटन व्यवसायाला वाहून घेतलं. त्यात लडाखचा खूप मोठा वाटा आहे.

आजवर १३,००० वर पर्यटक लडाखला आमच्या सोबत जाऊन आले. गेल्या काही वर्षात मी गावापेक्षा जास्त वेळा लडाखला जात आहे. असं काय आहे त्या लडाखमध्ये? सांगतो, पण लडाख अद्भुत आहे. अव्दितीय आहे. आयुष्यात एकदातरी गेलं पाहिजेच असं आहे. श्रीनगर जगातलं नंदनवन म्हणून गणलं जात असेल, पण तिथूनच पुढे लडाखच्या भूमीवर प्रवेश केल्याकेल्या मला नंदनवनात प्रवेश केल्याचा भास होतो. मी माझा रहात नाही.

श्रीनगरहून निघाल्यावर सोनमर्गपर्यंत वाटेतल्या हिरव्यागर्द वनश्रीने आपल्याला मोहित केलेलं असतं. पुढेही हजारो रंग छटा घेऊन लडाख प्रांत आपली वाट पहात असतो. मध्ये असतो दमछाक करणारा जोझिला पास. या जोझिला पासनेच या दोन प्रांतामधली सीमा निश्चित केली आहे. एका बाजूला गर्द वनराई आणि जोझिला चढून गेल्यावर रखरखीत उघडे पर्वत. जोझिला चढताना खाली बालतालचा पाडाव दिसतो. हा अमरनाथ यात्रेकरूंसाठीचा तळ. जुलै-ऑगस्टमध्ये अमरनाथला ने-आण करणारी हेलिकॉप्टर्स दिसतात. पण ही हेलिकॉप्टर्स वर मान करून पहावी लागत नाहीत. जोझिला पार करीत असताना आपण काहीसे वरच असतो. उंच हिमालयात असणाऱ्या लडाख प्रांतात आता आपला प्रवेश होणार असतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या जवानांनी कापून काढलेल्या बर्फाच्या कड्यांमधून गाडी प्रवास करू लागते आणि मंडळी उल्हासित होतात. बर्फाच्या भिंतीला टेकून एक सेल्फी काढण्याचा मोह सर्वांनाच होतो. त्यासाठी तर आपण

थांबतोच. लडाखचा प्रांत मनमुराद पहाता यावा, सहप्रवाशांचा खोळंबा न होता हवं तिथे थांबता यावं म्हणून या सफरीसाठी छोट्या वाहनांची सोय आम्ही करतो. एका वाहनात चार ते सहा पर्यटक असल्याने हे शक्य होतं. जोझिला पासच्या माथ्यावर तर सगळीच मंडळी गाडीमधून उतरतात, स्वच्छ शुभ्र बर्फात खेळण्याचा मोह ज्येष्ठांनाही होतो. पुढे पोहोचायची घाई कुणालाच नसते.

सर्वदूर पसरलेले गगनचुंबी पर्वतकडे, झाड झाडोऱ्याचं नामोनिशाण नाही, उघडीबोडकी पण सौंदर्यात कुठेही कमी नसलेली क्षितिजापर्यंत पसरलेली जमीन या पार्श्वभूमीवर वाट काढत जाणारा नागमोडी रस्ता आणि अधूनमधून साथ देणारे खळाळते प्रवाह. गर्दी, गजबाटापासून दूर असलेल्या राष्ट्रीय महामार्ग कमांक १ वरून चालू असलेल्या तुरळक वाहतुकीत आपणही असतो. कडे कोसळणं, भूस्खलन, अती शीतउष्ण तपमान या सर्वांवर मात करीत जिवाची बाजी लावून बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या जवानांनी तयार केलेल्या रस्त्यावरून आपली वाटचाल सुरू असते. या रस्त्यावरून जाताना मला नेहमीच आपल्या वीर जवानांचं आणि बिआरओचं खूप कौतूक वाटतं. जोझिला पासपासूनचा हा रस्ता म्हणजेच कारगिल युद्धाची रणभूमी. ते कठीण युद्ध इथेच लढलं गेलं. त्या युद्धाच्या अनेक खुणा इथे पहाता येतात. भारतीय जवानांचा पराक्रम आठवून आपण नतमस्तक होतो. कॅप्टन बात्रासारख्यांची आवर्जून आठवण येते. या सगळ्या युद्धखुणा पाहातच आपण द्रासला युद्ध स्मारकाजवळ येऊन पोहोचतो. साधारण संध्याकाळी चारच्या सुमारास इथे पोहोचण्याचा आमचा प्रयत्न असतो. पण कधी रात्र झाली तरी इथल्या जवानांच्या सहकार्यामुळे ईशा टूर्सच्या पर्यटकांना स्मारकाचं दर्शन घेता येतं. गेली दहा वर्षं सातत्याने २६ जुलैला कारगिल विजय दिनाच्या दिवशी ईशा टूर्सचे पर्यटक या आधुनिक तिर्थस्थळाला भेट देत आहेत. कॅप्टन बात्रा पॉईंट, टायगर हिल, तोलोलिंग टेकड्या ही ठिकाणं कारगिल युद्धाच्या वेळी आपण सर केलेली असतात. आज त्याचं प्रत्यक्ष दर्शन होत असतं. वीर जवानांचं अतुलनीय शौर्य या युद्धभूमीवर भारतीय जवानांच्या तोंडून हे ऐकताना अंगावर रोमांचं उभे राहतात.. कंठ दाटून येतो. 'For your tomorrow we gave our today' हे तिथे लिहिलेलं वाक्य किती सार्थ आहे. सैनिक म्हणजे काय? तो आपल्या पर्यायाने देशाच्या रक्षणासाठी सीमेवर कसा उभा ठाकलेला असतो ते पहाण्यासाठी अशा ठिकाणांना भेट दिलीच पाहिजे. पर्यटकांना फिरवताना आम्ही त्याचं भान नेहमीच ठेवतो आणि प्रसंगी वाट वाकडी करून अशी भेट घडवून आणतो. दोन हजार नऊ साली मुंबईत भरवलेल्या लडाखवरच्या छायाचित्र प्रदर्शनाचं उद्घाटन रणांगणावर कामी आलेल्या वीर जवानांच्या पालकांच्या हस्ते करण्यात आलं होतं. कारगिल युद्धभूमीचे फोटोही त्या प्रदर्शनात मांडले होते. त्या प्रसंगी बोलताना ही ज्येष्ठ मंडळी म्हणाली, 'आमच्या पोटच्या मुलांचं जिथे रक्त सांडलं ते ठिकाण निदान छायाचित्रात तरी आम्हाला पहायला मिळालं.' हे ऐकून मी सुन्न झालो. लगेचच त्यांना या वीरभूमीवर विनामूल्य नेण्याची मी





घोषणा केली आणि पुढील काळात ती अमलातही आणली. तिकडे अरुणाचल प्रदेशमधल्या चीन-भारत युद्धाच्या मार्गावरही पर्यटकांना नेऊन जवानांना श्रद्धांजली वाहिली जाते. केवळ फिरणं हा उद्देश डोळ्यासमोर न ठेवता देशाप्रती असलेल्या निष्ठा अधिक बळकट करायचं काम झालं तर त्या फिरण्याला आणि फिरवण्याला काहीएक अर्थ प्राप्त होतो असं माझं मत आहे. लडाखचा प्रांत संरक्षणदृष्ट्या खूपच महत्त्वाचा आहे. या प्रांतात सगळीकडेच लष्कराचं अस्तित्व जाणवत राहतं. सैनिकांप्रती असलेला आदरभाव व्यक्त करण्यासाठी आमच्यातर्फे रक्षाबंधन स्पेशल लडाख टूर नेली जाते. सीमेवर तैनात असलेल्या जवानांना जेव्हा आपल्या भगिनी राख्या बांधतात तेव्हा ते कणखर स्वभावाचे सैनिकही मृदू मुलायम होऊन जातात. सर्वांचीच मने हेलावून जातात.

संध्याकाळ गहीरी होत जाते, गारवा वाढत जातो आणि आपण कारगिल गावात मुक्कामाला पोहोचतो. बऱ्याच वेळा इथल्या हॉटेल सियाचीनमध्ये आपला मुक्काम असतो. या हॉटेलचे मालक सादीकभाई हसतमुखाने आपल्या स्वागताला हजर असतात. कारगिल युद्धाच्यावेळी याच सादीकभाईंनी आपल्या हॉटेलमध्ये कितीतरी वाटसरू, पत्रकार, सरकारी अधिकाऱ्यांना स्वत:च्या जिवावर उदार होऊन आसरा दिला होता.

युध्दभूमी कारगिलला मागे टाकून पुढे मार्गस्थ होताना संध्याकाळी लेहला पोहोचायचं असलं तरी वाटेत अनेक आकर्षणं असतात. त्या प्रदेशाचा अभ्यास करून आणि अनुभवाने आम्ही अनेक थांबे तयार केले आहेत. एरवी मुलबेक, फोटूला पास, नामकिला पास, लामायुरू अशा ठिकाणी कुणी थांबलं नसतं. निसर्गसौंदर्याच्या दृष्टीने अतिशय देखणा असलेला हा प्रदेश रमतगमत पहाण्यातच खरी मजा आहे. शिवाय चांद्रभूमी, सिंधू आणि झंस्कारचा संगम, मॅग्नेटीक हिल्स, पत्थरसाहेब गुरूव्दारा अशा ठिकाणी थांबत तिथल्या वैशिष्ट्यांची माहिती घेत, फोटो काढत संध्याकाळ होता होता आपण लेह शहरात प्रवेश करतो. श्रीनगर सोडल्यापासून दोन दिवसात लडाख प्रांताचा थोडा अंदाज मंडळींना आलेला असतो. पण 'अभी तो पिक्चर बाकी है।' अशी स्थिती मात्र नक्की असते.

सिंधू नदीच्या पवित्र तिर्थाला नमन करून सिंधू व्हॅली दर्शनाला सुरुवात होते. हीच ती सिंधू नदी जी फाळणीनंतर पाकिस्तानात गेली, पण सुमारे तीनशे किलोमिटर एवढा भारत पादाक्रांत केल्यावर ती पुढे निघून जाते, याची तिथे न गेलेल्या माणसाला कल्पनाच नसते. म्हणूनच तमाम भारतीयांच्या मनात आदराचं स्थान असलेल्या या नदीच्या घाटावर आमच्या पर्यटकांना घेऊन आम्ही जातोच जातो.

थिकसे मॉनेस्ट्री हे या दिवसाचं आणखी एक आकर्षण असतं. तिथल्या मैत्रेय बुद्धाच्या देखण्या मूर्तीला पाहिल्याशिवाय लडाखची सहल पूर्ण होऊ शकत नाही. लडाखची सहल ही दुर्गम भागातली असली तरी जवळजवळ सर्व ठिकाणी वाहनाने जाता येतं. इथेही अगदी गेटपर्यंत वाहन नेता येतं पण पुढे असलेल्या पायऱ्या पाहिल्यावर ज्येष्ठ मंडळी इथेच थांबतो म्हणतात. त्यांना तिथे बसू द्यायला माझं मन तयार नसतं, याचं कारण मैत्रेय बुद्धाची ती देखणी मूर्ती. मग चाला, दमलात तर बसा, आपल्याला मुळीच घाई नाही, इथे तर गेलंच पाहिजे असा काहीसा जास्तीचा आग्रह करून मंडळींना बुद्धाच्या मुखवट्यापर्यंत नेलं जातं. आजपर्यंत हा खटाटोप वाया गेलेला नाही. ईशा टूर्सचे कितीतरी पर्यटक सहलीनंतर याची आवर्जून आठवण काढतात आणि इतराना सांगतात. आमच्या पर्यटन संस्थेच्या वाढीला असे कितीतरी आशिर्वाद कारणीभूत झाले आहेत. तरुण मित्रांना मात्र तिथलं आभाळही मोकळं असतं, थिकसे मॉनेस्ट्रीच्या छतावर चढवून सिंधू पात्राचं विहंगम दृश्य त्यांना दाखवताना खाली रस्त्याच्या एका बाजूला दिसणारी हिरवाई आणि दुसऱ्या बाजूला असलेला रुक्ष भाग यांचा एक फोटो घ्यायला लावतोच. घरापासून हजारो मैल दूरवर आलेल्या पर्यटकाने जर अशी दृष्यं अनुभवली तर माझा त्यांना फिरवण्याचा उद्देश सफल होतो असं मला वाटतं.

ज्या प्रांतात आपण जातो तिथली संकृती, परंपरा, रहाणी ही तिथल्या लोकांमध्ये मिसळल्याशिवाय आपल्या लक्षात येणार नाही. भारताच्या इतर प्रांतापेक्षा लडाख तर खूप वेगळं आहे. सफरी दरम्यान पर्यटकांना लडाखी घराची भेट आम्ही मुद्दामहून घडवतो. या भेटीत त्यांना आपल्या घरापेक्षा अगदी भिन्न असलेलं लडाखी घर पहायला मिळतं, तिथल्या माणसात मिसळता येतं. लडाखी सांकृतिक कार्यक्रम हे या सहलीचं आणखी एक आगळं वैशिष्ट्य आहे. लडाख प्रांतातले सहा वेगवेगळे नृत्य प्रकार या कार्यक्रमात सादर केले जातात. लडाखी लोकांचा परंपरागत पहराव, त्यांची शस्त्रं, दागदागिने, साजशृंगार या सर्वांचं दर्शन या दरम्यान घडतं आणि या कलाकारांसोबत नाच करताकरता आपले फोटोही काढता येतात. नुब्रा व्हॅलीमधल्या बॉनफायरपर्यंत मंडळी अगदी एकेमकाच्या पूर्ण परिचयाची होतात आणि मग मस्ती-गाण्यालाही उधाण येतं.

खारदुंगला पासवरचा प्रत्येक क्षण ही आयुष्यभराची साठवण असते. तिथे जगातल्या सर्वात उंच अशा मोटरेबल रोडवर जाणाऱ्या सर्वांनाच एका फ्रेममध्ये एकत्र कुटुंबाचा अथवा मित्रमैत्रिणींचा फोटो हवा असतो, अशा वेळी माझ्या गळ्यात, खिशात सगळ्यांचे कॅमेरे घेऊन फोटो काढण्याचा कार्यक्रम होतो. हुंडरच्या वाळवंटातली रम्य संध्याकाळ, मावळत्या उन्हातला शांती स्तूप अशी काही ठिकाणं त्या त्या ठराविक वेळीच पाहण्याची मजा असते. हा वेळ साधून पर्यटकांना तिथे नेण्याची धडपड इशा टुर्सच्या प्रत्येक सहलीत केली जाते.

पँगाँग लेक हा आता लडाखचा चेहराच झाला अहे. तिथे जाताना लागणाऱ्या पागल नाल्याचा अडसर आता दूर झाल्याने ठरल्यावेळी निघून लेकवर जाता येतं. अगदी चार वर्षांपूर्वीपर्यंत मात्र तिथे जायची वेळ आधी ठरवता येत नव्हती. त्या नाल्याच्या लहरीपणावर विसंबून रहावं लागायचं. कित्येकवेळा रात्री दोन वाजता, पहाटे चार वाजता असं (त्या पागलला) वाट्टेल तेव्हा पँगाँग लेकसाठी लेहमधून निघावं लागत असे. पण पँगाँग लेक तर

पहायलाच हवा म्हणून कधीही कसलंही कारण पुढे न करता आम्ही तिथे जात असू. लडाखचे रस्ते आणि तिथला प्रदेश हा गाडीचालकासाठी आव्हानच आहे. पण लडाखी ड्रायव्हर मित्र ते आव्हान अगदी लिलया पेलतात. पर्यटकांची सर्व प्रकारची काळजी घेत, त्याना हा सुंदर प्रदेश आमच्या वतीने दाखवत, प्रसंगी हाताला धरून ने आण करीत हे मित्र 'अतिथी देवो भव'चा प्रत्यय अगदी क्षणोक्षणी देत असतात. त्यांना बरोबरीची वागणूक देऊन आम्ही आणि आमचे पर्यटक त्यांच्या सेवेचा लाभ घेत आहोत. लडाखच्या सहलीचा ते चालक कणाच आहेत असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही.

लडाख हा उत्सवांचा प्रदेश आहे असं म्हणावं एवढे उत्सव तिथे साजरे केले जातात. सिंधू फेस्टिवल, हेमिस फेस्टिवल, कारगिल विजय दिन, स्वातंत्र्य दिन, लडाख फेस्टिवल, थिकसे फेस्टिवल असे अनेक सणं तर साजरे केले जातातच शिवाय गावागावातल्या प्रत्येक मॉनेस्ट्रीमध्ये त्या त्या मॉनेस्ट्रीचा उत्सव तिथे धूमधडाक्याने साजरा होतो. या फेस्टिवल दरम्यानची वेळ साधून इशा टूर्सच्या सहली तिकडे नेल्या जातातच शिवाय इतर सहलींच्या वेळी एखादा उत्सव साजरा होत असेल तरीसुद्धा पर्यटकांना मुद्दामहून तिथे नेण्यात येतं. या शिवाय फोटोग्राफी स्पेशल, चित्रकारांसाठी अशा सहली नेऊन त्यांना या देखण्या प्रदेशाची चित्रं मनसोक्त काढता यावी याची काळजी घेतली जाते.

दुर्गम अशा या आडवळणाच्या प्रदेशात कौटुंबिक सहली यशस्वी केल्याला आता बराच काळ लोटला आहे. सर्व वयोमानाचे, प्रकृतीचे पर्यटक इशा टुर्ससोबत लडाख पाहून तृप्त झाले. २०१३ साली माझी लडाखची १०० वी वैयक्तिक सफर झाली. या कार्यक्रमाला तिथले अधिकारीही हजर होते, सुरुवातीला १५० च्यावर पर्यटक घेऊन आम्ही आलो आहोत यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता, पण पर्यटकांच्या प्रत्यक्ष दर्शनाने ते थक्क झाले. तिथले व्यावसायिक, चालक, लडाखी लोक, अधिकारी अगदी आमदार, मंत्रीही माझ्या मित्रपरिवारात सामिल झाले आहेत हे मी माझं भाग्य समजतो.

आपल्या गावातली प्रत्येक बातमी जशी आपल्याला समजली की बरं वाटतं, तसं लडाखची बितंबातमी काढत असतो. २०१० साली लडाखमध्ये ढगफुटी झाली तेव्हा खरं तर मी केनयामध्ये होतो पण तिसऱ्यातच दिवशी तिथून येऊन थेट लडाख गाठलं. ईशा टूर्सच्या पर्यटकांनी एकत्र केलेली मदत तिथल्या गरजूंपर्यंत पोहोचवली. लडाखशी माझं असं हे घट्ट झालेलं नातं जन्मांतरीचं असावं. ईशा टूर्सच्या पर्यटकांना याची अनेकदा प्रचिती आली आहे. लडाखच्या उन्हाळ्यात चालणाऱ्या तिथल्या सहली संपल्यावर मला आता इथे येता येणार नाही, म्हणून मन खट्टू होतं. पण मग त्यावरही एक उपाय शोधून काढलाय तो म्हणजे विंटर लडाखचा, त्या विषयीही पुन्हा कधी तरी सांगतो. पण आता उन्हाळ्यात आणि हिवाळ्यातही लडाख वारी करता येते म्हणून मी खूश असतो.

**– आत्माराम परब**

**शब्दांकन : नरेंद्र प्रभू**



पद्मगंधा प्रकाशन


# ग्रंथपान

## 'सर्वमंगल क्षिप्रा'बद्दल

'पद्मगंधा प्रकाशना'तर्फे 'सर्वमंगल क्षिप्रा'बद्दल हे डॉ. अंजली सोमण यांनी संपादित केलेले महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यातील काही भाग.

हरिभाऊ मोटे हे मराठीतील एक ख्यातनाम प्रकाशक. धाडसी निर्णय घेऊन हरिभाऊंनी आगळीवेगळी पुस्तके प्रकाशित केली. विभावरी शिरूरकर, विश्राम बेडेकर अशा लेखकांची पुस्तके त्यांनी काढली. प्रकाशनव्यवहार आणि सिनेव्यवसाय या दोन्ही क्षेत्रात तन-मन-'धन' पणाला लावून त्यांनी जुगारच खेळला. 'सर्वमंगल क्षिप्रा' या त्यांच्या आत्मचरित्रात ते सारे आलेले आहे.

हरिभाऊंना पत्रसंग्रहाचे वेड होते. महाराष्ट्रातील मान्यवरांची पत्रे 'विश्रब्ध शारदा' या त्रिखंडात्मक ग्रंथात त्यांनी एकत्र करून प्रसिद्ध केली. 'सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मचरित्रावर अनेक मान्यवरांनी पत्रे लिहिली. त्यातील हे एक पत्र-




नागपूर
दि. ७-८-८१

प्रिय हरिभाऊ

सा. न. वि. वि.

मी सहज लिहायला बसलो, प्रिय लिहून टाकले. भावना तीव्र झाल्याचे द्योतक.

आता सायंकाळचे ५ वाजले आहेत. गेले तीन दिवस 'सर्वमंगल क्षिप्रा'च्या नादात होतो. आता या क्षणी ते हातातून सोडले. पेन घेतले. लिहायला हवे, उशीर नको.

'क्षिप्रा' मला अति-अती आवडले. त्यातला अलिप्त आपलेपणा ही साधनेची परिणती. ती आयतीच हाती आली. संयत भाषाही आयतीच सर्व शोभवून गेली. स्वच्छंद, व्याप, पसारा यांनाही गोमटे, गोजीरवाणे रूप आले. छान वाटले. आनंद झाला....

खूप लिहिले तरी शब्दच वाढतील. आशय हाच!

आपला
वामन चोरघडे

पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर काही स्नेह्यांची, परिचितांची पुस्तकविषयी मते मांडणारी पत्रे आपणहून आली. हरिभाऊंवरील प्रेमामुळे! तीही खूप काही सांगणारी आहेत. विंदा करंदीकर पत्रात म्हणतात-

७ आनंदवन, साहित्य सहवास
वान्द्रे (पूर्व) मुंबई ५१
ता. ३-१२-८०

प्रिय हरिभाऊ

आपण पाठविलेले २० नोव्हेंबरचे पत्र आणि पाठोपाठ आलेली 'एक सर्वमंगल क्षिप्रा'ची सस्नेह भेट ही दोन्हीही मिळाली. अल्प परिचय असूनही माझ्याबद्दल आपणाला ओढ वाटते असे आपण पत्रात लिहिलेत आणि यात कुठे तरी सुखावल्यासारखे वाटले. ज्यांच्याबरोबर बोलताना एका पिढीचे अंतर कधी जाणवले नाही किंवा आपल्या बोलण्यावर शिष्टाचाराचा लगाम घालावा असेही वाटले नाही अशी दोन माणसे म्हणजे रामूभय्या आणि तुम्ही. तुमच्या या पुस्तकाच्या कच्च्या हस्तलिखिताचा मी पहिला वाचक असेही तुम्ही लिहिता. पण माझ्या आठवणीप्रमाणे तुम्ही पुस्तकाचा फक्त काही भागच मला दाखवलेला होता. त्यावेळी मी काय प्रतिक्रिया व्यक्त केली ते मला आता तपशीलवार आठवत नाही. पण जे काही वाचले त्यावरून एक चांगले आत्मचरित्र तुमच्या हातून लिहिले जाण्याची शक्यता जाणवली होती.

ती अपेक्षा काही प्रमाणात 'एक सर्वमंगल क्षिप्रा'च्या या पहिल्या भागाने पुरी केली. पण जितकी मला त्यावेळी जाणवली होती तितकी पुरी झाली नाही. तुमचे आयुष्यच वैशिष्ट्यपूर्ण व वैचित्र्यपूर्ण आहे, तेव्हा त्याचा हा आलेख वाचनीय ठरणे ही गोष्ट अटळ होती. तुम्ही सराईत व कसबी लेखक नसल्यामुळे भाषेचा फुलोरा व फुगवटा यांची बाधा तुमच्या भाषेला होणार नाही याचीही खात्री वाटत होती. शिवाय दोन डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली व भोगलेली अवस्था तिसऱ्या डोळ्याने पुन्हा पाहण्यासाठी जो तटस्थपणा लागतो तोही तुमच्या वृत्तीत उपलब्ध झालेला होता. या सर्व गोष्टींचा प्रत्यय 'एक सर्वमंगल क्षिप्रा' वाचताना जरूर आला. मग खटकले काय? उणीव कशाची भासली? विशेष खटकली ती अनावश्यक पत्रांची भरताड आणि विशेष उणीव भासली ती नितळ एकसंधपणाची. कदाचित या दोन गोष्टी परस्परसंबद्धही असतील. 'पत्र' या गोष्टीचाच मला उबग आहे असे नव्हे. 'नवी ओळख' या विभागातील पत्रे हा तुमच्या आत्मचरित्राचा अंगभूत भाग वाटतो, त्यामुळे पुस्तकाला अपाय झालेला नाही. (अत्रेंचे कोर्टापुढील ॲफिडेव्हिट हाही त्या घटनेचा अंगभूत भाग आहे) पण उरलेली बहुसंख्य पत्रे गाळली गेली असती व निवेदनाच्या ओघात त्यांचा आवश्यक तेवढाच उल्लेख केला गेला असता तर पुस्तकाला आता नसलेला एकसंधपणा कदाचित लाभला असता असे वाटते. जिथे पत्रांचा अतिरेक नाही अशी 'प्रकाशन व्यवसाय व व्यवहार' आणि 'चकवा' ही प्रकरणे मला आत्मचरित्राच्या लयीशी अधिक मिळतीजुळती व अधिक परिणामकारक वाटली. आपण छापलेल्या पत्रांना वाङ्मयाच्या संशोधक चिकित्सकांच्या दरबारी एक वेगळं महत्त्व आहे ही गोष्ट उघडच आहे. पण चांगले आत्मचरित्र हा अशा लोकांसाठी लिहिलेला साधनग्रंथ नव्हे.

असो, 'वीस-चाळीस ओळींमध्ये आपले मत परखडपणे कळवावे' असे आपण पत्रात लिहिलेत व धिटावणी दिलीत. ओळींबद्दलची आपली अपेक्षा पुरी झाली नसली तरी परखडपणात फारशी उणीव राहिलेली नसावी!

आपला
गो. वि. करंदीकर (विंदा करंदीकर)

**'सर्वमंगल क्षिप्रा'बद्दल**
संपादक : डॉ. अंजली सोमण
मूल्य : ३०० (अंदाजे) पृष्ठ : २४० (अंदाजे)
**'ग्रंथाली' येथे सवलतीत**

## रोहन प्रकाशन ग्रंथपान

### श्रृंगार नायिका

स.आ. जोगळेकर

भारतीय कलेच्या इतिहासात अनेक उत्तमोत्तम अशी प्राचीन मंदिरं, लेणी, शिल्पं, भित्तिचित्रं आणि चित्रकलेचे नमुने पहायला मिळतात. अनेक प्राचीन मंदिरांमध्ल्या नायिकांची विविध पावित्र्यातील हावभाव दर्शवणारी व आभूषणांनी नटलेली अशी शिल्पं आपलं लक्ष वेधून घेतात. या मंदिरांमध्ये बऱ्याच नायिका श्रृंगारिक दाखवलेल्या आहेत. नवरसांपैकी श्रृंगार हा रसांचा राजा असल्यामुळे प्राचीन शिल्पकारांनी नायक-नायिकांना श्रृंगाररसाने सजवणं साहजिक आहे. प्राचीन मंदिरांमधील या शिल्पांना साहित्याचा संदर्भ आहे. काही प्राचीन ग्रंथकारांनी रंगवलेल्या श्रृंगार-नायिकांना लैंगिकतेची बैठक दिली होती. उदाहरणार्थ, कामशास्त्र लिहिणारा वात्स्यायन व अनंगरंगरतिशास्त्रकार कवी कल्याणमल्ल. हे दोन ग्रंथ थेट लैंगिक व्यवहाराचं मार्गदर्शन करतात. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात मात्र नायिकांचा स्थायीभाव लैंगिकता नसून नाट्याच्या दृष्टीने नायिका कशी असावी हा आहे. नंतरच्या साहित्यशास्त्रकारांनी त्यांच्या ग्रंथांत- रसमंजिरी, दशरूपक, साहित्यदर्पण आणि गाथा सप्तशती - नायिकांचे अनेक प्रकारे वर्गीकरण केलं आहे. हे भेद व्यक्तिनिष्ठ व स्वभावावर आधारीत आहेत. अष्टनायिकांचं वर्गीकरण मात्र प्रसंगानुरूप अवस्थेवर आधारलेलं आहे. (उदा. स्वाधिनपतिका, वासकसज्जिका, प्रेषितभर्तृका आणि इतर)




अशा या श्रृंगारनायिकांवर स.आ. जोगळेकर यांनी अतिशय संशोधनपूर्ण लिहिलेलं पुस्तक - 'श्रृंगारनायिका' १९५५ मध्ये प्रकाशित झालं होतं. विख्यात चित्रकार दीनानाथ दलाल यांनी नायिकांची वर्णनं प्रतिबिंबित करणारी मोहक व समर्पक चित्रं या पुस्तकात रेखाटली होती. दलालांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'रोहन प्रकाशन'ने हे पुस्तक आता पुनर्प्रकाशित केलं आहे. या पुस्तकात एकूण पाच प्रकरणं आहेत व नायिकांची लक्षणं समजावून सांगणारी रेखाचित्रं व रंगीत चित्रं आहेत. त्याचबरोबर पुस्तकात वापरलेल्या संदर्भग्रंथांची सूचीही दिली आहे.

पहिल्या प्रकरणात कामशास्त्रकारांनी केलेली नायिकांची व्याख्या दिली आहे जी मुख्यत्वे सत्वं व लैंगिक लक्षणांच्या अनुरोधाने केली आहे. उदा. कन्या, पुनर्भू व वेश्या (व त्यांचे पोटभेद).

दुसऱ्या प्रकरणात भरताने नाट्यशास्त्रात नायिकांची जी वर्गीकरणं दिली आहे त्याची चर्चा आहे.

तिसऱ्या प्रकरणात श्रृंगारमंजिरी व रसमंजिरीमध्ये दिलेले नायिकांचे वर्गीकरण. उदाहरणार्थ :- उत्तमा, मध्यमा व अधमा याविषयीचं विवेचन आहे.

चौथं प्रकरण हे स्वतंत्रपणे अष्टनायिकांवर भाष्य करतं. या आठही नायिकांचं वर्गीकरण त्यांच्या अवस्थेवर अधिष्ठित आहे.

शेवटच्या प्रकरणामध्ये नायक व नायिकांचे प्रेमप्रकरण सिद्धीस नेणारे व मध्यस्थाची भूमिका बजावणारे दूती व दूती यांचा परामर्ष घेतला आहे. त्यांची व्याख्या, लक्षणं व वर्गीकरण या प्रकरणात वाचायला मिळतं. या सर्व प्रकरणांमध्ये विविध संस्कृत व प्राकृत ग्रंथांमधील नायिकासंदर्भातील व्याख्या व लक्षणं सांगणारे श्लोक व त्यांचा अर्थ दिलेला आहे.

पुस्तकाच्या शेवटी 'उपसंहारा'मध्ये लेखकाने पुस्तकाकडे कसं बघावं हे थोडक्यात व प्रभावीपणे सांगितलं आहे. त्याचा सार थेट त्यांच्याच शब्दांत- 'नायिका, मग त्या साहित्यातल्या असोत किंवा प्रत्यक्षांतल्या, त्या सजीव आहेत व भावनाप्रधान आहेत, त्यांचे अंगी व्यक्तिमत्त्व आहे, ते त्यांच्या गुणदोषांमधून आणि अवस्था व प्रकृती यांमधून व्यक्त होणारे आहे. हे मनात बाळगून रसिकांनी या लेखाचे रसग्रहण करावे.'

'रोहन प्रकाशन'ने हे पुस्तक पुनर्प्रकाशित केलं नसून त्याला एक नवीन चेहरा दिला आहे. या पुस्तकाची वैशिष्ट्यं म्हणजे - ● मराठी बरोबरच इंग्रजीमध्येही संहितेचा अनुवाद दिल्याने हे पुस्तक द्वैभाषिक झालं आहे. ● मूळ संहिता संशोधनपूर्ण असून तिचा गायत्री पगडी यांनी केलेला अनुवाद अचूक व उत्कट आहे. ● पुस्तकामध्ये पानोपानी केलेली पारंपरिक अलंकरणाची पखरण सुखद वाटते. ● दलालांनी रेखाटलेली चित्रं ह्रदयस्पर्शी असून संहितेमध्ये दिलेली लक्षणं सोपेपणाने समजवण्यास मदत करतात.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे अधिक आकर्षक वाटणारी चित्रं व उत्कृष्ट पुस्तकनिर्मिती यामुळे हे पुस्तक हाताळणं म्हणजे आनंदानुभव आहे!

केवळ कलेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच नव्हे; तर कोणत्याही सामान्य कलाप्रेमींसाठीही हे पुस्तक माहितीचा आणि निखळ समाधानाचा स्त्रोत ठरेल!

**श्रृंगार नायिका**
स.आ. जोगळेकर
पृष्ठे १५०, मूल्य २५००
**'ग्रंथाली' येथे सवलतीत**

# ग्रंथपान

...'थालियाची थाळी' या पुस्तकाचं नाव प्रारंभी ठरवलं होतं; 'पापडकुरडया' पुस्तक साकारत गेलं आणि चारी ठाव थाळी सजली. नाव बदलावं लागलं...




ग्रीकांच्या नऊ वाग्देवतांपैकी, थालिया ही विनोदाची अधिष्ठात्री. मानवी स्वभावातली, जीवनातली विसंगती, ग्राम्यता, अहंता यातली हास्यास्पदता दर्शवणारी थालिया, प्रसंगी भोंदूपणा, बेगडीपणा आणि मूर्खपणा यांचं वस्त्रहरण करते. कधीतीक्ष्ण धारेसारखा उपरोध उफाळून आला तरी माणुसकीच्या जाणिवेमुळं तिच्या विनोदाला कारुण्याचं अस्तर असतं. ते घमेंडखोरी, दाखवेगिरीमागे लपलेल्या लोकांना जीवनसन्मुख बनवतं...सर्वांत मोलाची, विनोदामागे दडलेली तिची चिंतनशीलता...

थालियाची थाळी हा स्त्रियांच्या मौखिक आणि मुद्रित विनोदी साहित्याचा, शंभराहून अधिक वर्षांचा कालक्रमानुसार संकलित लेखाजोखा आहे.

या पुस्तकाच्या उद्दिष्टांपैकी प्रमुख उद्दिष्ट 'बायकांना विनोदबुद्धी नसते' या सतत आळवल्या जाणाऱ्या आक्षेपाला, मुँहतोड जवाब नाही, तरी हसरं उत्तर देणं.

दुसरं, भूमिकन्या, ग्रामकन्या, सुशिक्षित नागरकन्या, आणि आजच्या उच्चशिक्षित परदेशस्थ विनोदिनींपर्यंतचा हास्येतिहास पुरवणं. यात 'विनोदलक्ष्मी' टिळकांपासून त्यांची पणती डॉ. विद्यागौरी टिळकांपर्यंत, नामवंतांपासून नवोदितांपर्यंत निवडक लेखिकांच्या, कवयित्रींच्या नमुन्यांची कमान अभिप्रेत आहे.

तिसरं; विनोदिनींच्या या वाटचालीच्या ओघाने विनोदी वाङ्मयनिर्मितीचा धांडोळा घेणं यात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक पैडाघदरांचा समावेश अभिप्रेत....

आणखीही एका अर्थाने आमचा हा पहिला मर्यादित प्रयत्न महत्त्वाचा ठरावा. 'It is a man's world' या अर्थाने जगभरच असलेल्या पुरुषकेंद्री संस्कृतीत, स्त्री सर्वच पातळ्यांवर बंदिस्तपणाची बळी ठरत आली, असा आजवरचा ग्रहेतिहास सांगतो. ज्या संस्कृतीत आतापर्यंत स्त्रियांच्या हसण्या-बोलण्यावरचे; दिसण्या-चालण्यावरचे निर्बंध घोरवयापासून असायचे; त्या समाजातल्या स्त्रीसाहित्याचा अभ्यास केल्यास, ज्या 'चिवटजिवट' वृत्तीने स्त्रिया या विदारक वास्तवातही तग धरून राहिल्या, तिचं एक प्रमुख अंग होतं विनोदबुद्धी; हे जाणवावं...

—प्रस्तावनेतून

मूल्य ४०० रु. ग्रंथाली येथे सवलतीत ३२० रु.

साधना प्रकाशन

# ग्रंथपान




साने गुरुजींच्या साधना प्रकाशनाने काटेमुंढरीच्या मुनघाटे गुरुजींनंतर त्याच परंपरेच्या मेटकरी गुरुजींना महाराष्ट्रापुढे आणले आहे. 'माझे विद्यार्थी' हे पुस्तक केवळ एका शिक्षकाने काही विद्यार्थ्यांच्या लिहिलेल्या आठवणी नाहीत तर त्यापेक्षा बरेच काही आहे. म्हणजे शिक्षक-विद्यार्थी नात्यापुरतेच हे पुस्तक मर्यादित नाही, तर शिक्षक आणि समाजाचे नाते, शिक्षकाच्या कामाची कक्षा कुठपर्यंत जावी आणि सामाजिक प्रश्न व शाळांची भूमिका अशा अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे.

शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते व्यवस्थात्मकच बदलत गेले आहे. पूर्वी ऋषिकुल व्यवस्थेत सुरुवातीची १२ वर्षे विद्यार्थी शिक्षकाकडेच राहायचा, ती व्यवस्था आता ऑनलाइन कोर्सेस/होम स्कूलिंगपर्यंत आली आहे. त्यामुळे शिक्षक-विद्यार्थी नाते कोणत्या पातळीवर असावे याचे उत्तर शोधताना, हे पुस्तक एक दीपस्तंभ म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षणविश्वात आले आहे.

एखादा जुना चित्रपट नव्याने काढताना त्याचे कथानक पुढे सरकत जावे, तसे मेटकरी गुरुजींच्या बाळबोध गावातील मुलांच्या वाट्याला आलेल्या त्या प्रश्नांचा परीघ आज विलक्षण गुंतागुंतीचा झाला आहे. त्या अल्लड शबानावर आता नुसता अत्याचार होत नाही, तर ती विकली जाते. अनेक गजा वेदना लपवत आईच्या गिऱ्हाइकाची सरबराई करतात. अनेक शिल्पा, सुनेत्रा बालविवाहातून अनेक अर्थांने उद्ध्वस्त होताहेत. केवळ तमाशा बघणारा राजेश आज पोर्न बघताना कुठल्याकुठे फेकला जातोय. जितेंद्र म्हस्केचा, हरीश-गिरीशचा निरागस खोडकरपणा चित्रपटांच्या प्रभावाखाली येऊन आज वर्गमित्रांचे जीव घेण्याइतपत मजल मारतोय.

शहरी भागात तर जीवनसंघर्ष तीव्र होताना त्याचे अपरिहार्य बळी मुले ठरत गेली. वाढत्या झोपडपट्ट्या, बालमजुरी, बालविवाह, देहव्यापारासाठी मुलांची विक्री, कुटुंबांच्या स्थलांतरातून होणारी गळती, हे कनिष्ठ आर्थिक स्तरात घडत राहिले. मध्यमवर्गीय स्तरात कोलमडणाऱ्या कुटुंबव्यवस्थेत मुलांच्या भावविश्वाची पडझड चालू राहिली. उच्च-मध्यमवर्गीय होण्याच्या नादात मूल्यव्यवस्थेला आलेले पराभूत स्वरूप, माध्यमक्रांतीने मुलांना येणारे प्रौढपण आणि पालकांच्या महत्त्वाकांक्षाचा येणारा मुलांवरचा तणाव. हे सारे घडत असताना आज समाजाला हजार मेटकरी गुरुजी हवे आहेत. म्हणजे व्यवस्थात्मक रचना आणि सारेच संदर्भ बदलत चाललेत, या पुस्तकाचं आज औचित्य खूप महत्त्वाचं वाटतं ते यामुळेच!

रघुराज मेटकरी...

काय म्हणायचं या माणसाला. एक शिक्षक, पालक की सामाजिक कार्यकर्ता? एखादा समीक्षक म्हणेल की, 'प्रत्येक शिक्षकाला आयुष्यभर मुलं भेटतच असतात. शाळेतली मुलं हा काय लेखनाचा विषय असू शकतो?' मी हिशोब मांडून पहिला. साधारणत: ३५ वर्षांच्या जुन्या नोकरीत दरवर्षी ४० प्रमाणे विद्यार्थी धरले तर एका शिक्षकाच्या वाट्याला १४०० विद्यार्थी येतात. यातील अगदीच वेगळी मुले फक्त लक्षात राहतात. मी स्वत: २० वर्षांपासून शिक्षक आहे. आठवून बघतो, पण इतक्या तपशीलाने नाही आठवत. मेटकरी गुरुजींना मात्र बिनचेहऱ्याची सगळी मुले त्यांच्या पूर्ण नावानिशी आठवतात. बिनचेहऱ्याची, जीवनसंघर्षात हरलेली ही मुलं इतक्या वर्षांनंतर त्यांना जशीच्या तशी आठवतात, हे सर्व कसे घडते?

'माझे विद्यार्थी' हे पुस्तक लिहिणाऱ्या या शिक्षकाने स्वत:च्या नोकरीला आणि शिक्षकी पेशाला शक्य होईल तिथपर्यंत ताणले आहे... नोकरीचे तास किती असावेत, याचा हिशोब हे पुस्तक वाचताना लागत नाही. शाळेची वेळ रात्री की दिवसा, हे कळत नाही. शाळेचे कंपाऊंड हीच शाळेची हद्द असते की मुलाचे घर, पोलिस स्टेशन, रिमांड होम इथपर्यंत शाळेची हद्द असते? हेही प्रस्तुत पुस्तक वाचताना उमजत नाही.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृतीच असते, ती समाजापासून वेगळी काढता येत नाही. समाजातील प्रश्न शाळेत येऊन उभे राहतात तेव्हा अनेकजण शाळा आणि त्या प्रश्नांना वेगळे करत स्वत:ची सुटका करून घेतात. ते काहीसे स्वाभाविकही आहे. मेटकरी गुरुजींनी मात्र शाळेत घुसलेल्या या प्रश्नांना शाळेत तर उत्तरे शोधलीच, पण वेळप्रसंगी शाळेबाहेर जाऊनही उत्तरे शोधली. या त्यांच्या धडपडीचे विश्लेषण करायला हवे.

- हेरंब कुलकर्णी

**माझे विद्यार्थी : रघुराज मेटकरी**
पृष्ठे - १५२, मूल्य १२५ रुपये
सवलतीत १०० रुपये (टपाल खर्च वेगळा)
**'ग्रंथाली' येथे सवलतीत**

पुस्तक प्रकाशन वृत्तांत

# डॉक्टरचा स्पर्श हेच खरे औषध - डॉ. स्नेहलता देशमुख

मुंबई : सध्याच्या युगात यांत्रिकीकरण खूपच वाढले आहे. पॅथॉलॉजिकल तपासण्यांचे रिपोर्ट मोबाइलद्वारे पाहून दूर असलेल्या रुग्णावर उपचार करणे यापेक्षा रुग्णाला स्वत: तपासून, त्याला शब्दांचा धीर देऊन औषध देणे केव्हाही चांगले. प्रेमाचे ऋण ह्या पुस्तकातील लेख मला खूप आवडले. क्रोध हा प्रेमाच्या अगदी विरुद्ध आहे. आपण यांत्रिकीकरण आणि प्रेमाचा स्पर्श यात सुवर्णमध्य गाठला पाहिजे, असे विचार माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख यांनी नुकतेच 'ग्रंथाली'च्या दोन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात व्यक्त केले.

गोरेगाव येथील प्रज्ञाबोधिनी स्कूलमध्ये रविवार, दि. ३ एप्रिल २०१६ रोजी आयोजित केलेल्या समारंभात 'प्रेमाचे ऋण' आणि 'नामरंगी रंगले' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

सौ. माधवी कवीश्वर यांनी लिहिलेले 'प्रेमाचे ऋण' नावाच्या पुस्तकाला यशवंत पाठक व लोकसत्तेच्या आरती कदम या दोघांची प्रस्तावना लाभली असून हे पुस्तक डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते प्रकाशित झाले. शशिकांत कवीश्वर यांनी लिहिलेल्या 'नामरंगी रंगले' या पुस्तकाला यशवंत पाठक व डॉ. रवीन थत्ते यांनी प्रस्तावना लिहिली असून निवृत्त प्राध्यापक म. वि. केळकर यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले. दोन्ही पुस्तके एकाच वेळी प्रकाशित करण्यात आली.

प्रकाशनाचा कार्यक्रम अतिशय रंगला. शशिकांत व सौ. माधवी यांचा मुलगा डॉ. विकास, सून डॉ. चारुता, यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. समारंभाला कवीश्वर कुटुंबावर प्रेम करणारी जवळजवळ २०० मंडळी इंदूर, पुणे, ठाणे, मुंबई इत्यादी गावांहून आली होती. डॉ. विकास यांनी सुदेश हिंगलासपुरकर व धनश्री धारप यांचे स्वागत केले. सुदेश हिंगलासपुरकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

अरुण शेवते म्हणाले, 'माझ्या पत्नीमुळे माझी सौ. कवीश्वर यांच्याशी ओळख झाली. त्या एकदा डॉ. वर्षा दंडवते यांना घेऊन माझ्याकडे आल्या व लोकसत्तेत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखांचे पुस्तक व्हावे ही त्यांची इच्छा आहे असे म्हणाल्या. यथावकाश ते पुस्तक झालेही. पण मी सौ. कवीश्वरांना म्हणालो की तुमचे लोकसत्तेत प्रसिद्ध झालेले लेख लोकांना खूप आवडले आहेत. त्याचे पुस्तक तुम्ही का नाही काढत? त्यांचा होकार मिळताच मी माझे मित्र ग्रंथालीचे ट्रस्टी सुदेशजींना घेऊन त्यांच्या घरीच गेलो आणि दोन महिन्यात दोन पुस्तके तयार झालीही.'

आरती कदम म्हणाल्या, 'माधवीताईंच्या संवेदनक्षम मनाने टिपलेल्या असंख्य अनुभवांचा, सकारात्मक जगण्याचा, रंगीबेरंगी कॅनव्हास म्हणजे प्रेमाचं ऋण हे पुस्तक. त्यांच्या लिखाणात वेगळा विचार असतो. त्यांच्या लिखाणाची शैली ओघवती आहे. आजही लोकसत्तेत त्यांचे सदर - चित्ती असू द्यावे समाधान - दर शनिवारी प्रसिद्ध होते. त्यांची लेखनशैली कधी भावनिक हळुवार होत जाते तर कधी मधुमेहासारखा कडू विषय मांडतांना मिश्किल होत जाते.'

स्वत:च्या आईबाबांबद्दल म्हणजे सौ. माधवी व श्री. शशिकांत कवीश्वर यांच्याबद्दल बोलताना डॉ. विकास म्हणाले, 'साधी रहाणी, उच्च विचारसरणी, शिक्षणाची आवड, मेहनतीची तयारी, आणि प्रामाणिकपणा हे गुण दोघांच्या पत्रिकेत जुळणारे. बाबा इलेक्ट्रिकल इंजिनीअर. आईने लग्नानंतर एम.एस्सी. पूर्ण केले. आई वयाच्या साठीत संगीत विशारद झाली. संत चरित्रावर आधारित अनेक कार्यक्रम दोघांनी मिळून केले. आई भावनाप्रधान तर बाबा बुद्धिप्रधान. पत्त्यांच्या भाषेत बोलायचे तर आई भावनेची राणी तर बाबा बुद्धीचे राजा, त्यांना जोडणारा हुकमाचा एक्का म्हणजे परस्परावरील प्रेम. या एक्का राजाराणीने कुटुंबाचा प्रेमाचा सिक्वेन्स नेहमीच जुळवत ठेवला.'

सौ. माधवी कवीश्वर म्हणाल्या, '१९८९ साली माझं मोठं आजारपण झालं. मनात विचार आला की माझ्याच वाट्याला एवढी संकटे का? तारुण्य म्हणजे वसंत ऋतू. अशा काळात माझ्याच वाट्याला ही शिशिरातली पानगळ का? हळूहळू शांत झाल्यावर जाणवले की संकटे सगळ्यांनाच येतात. अशा वेळी निरपेक्ष प्रेम करणाऱ्या जगातील चांगल्या माणसांचा शोध घे. या देवाने पृथ्वीवर पाठवलेल्या देवदूतांच्या विचारात माझे दु:ख कुठल्याकुठे पळाले आणि त्यातून अनेक व्यक्तिचित्रे कागदावर उमटू लागली. लोकसत्तेच्या चतुरंग पुरवणीत हे लेख प्रसिद्ध झाले. त्यातील काही लेखांचे संकलन म्हणजे -प्रेमाचं ऋण - हे पुस्तक. ज्या विषयात बाबांनी रस घेतला त्याचा मनासारखा अभ्यास झाल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. 'नामरंगी रंगले' या पुस्तकात त्यांची प्रतिभा जागोजागी दिसते.'

शशिकांत कवीश्वर त्यांच्या भाषणात म्हणाले, 'तो आणि ती यांच्यातील प्रेम ही आसक्ति असते. खरे प्रेम निरपेक्ष असते. फक्त संतच असे प्रेम सर्व जगावर करतात. ईश्वराचे नाम म्हणजे प्रेम सागरावरील तरंग. मालाडचे सत्पुरुष प.पू. के.वि. उर्फ बाबा बेलसरे ह्यांच्या रूपात मला माझे सद्गुरू श्री. गोंदवलेकर महाराज दिसले. अनेक उच्चपदस्थ व उच्चशिक्षित मंडळी महाराजांच्या विचारांनी भारुन गेली आहेत. जिज्ञासा आणि कुतूहल म्हणून तरी सर्वांनी या ज्ञानाचा लाभ घ्यावा.'

प्रा. म. वि. केळकर म्हणाले, 'डॉ. रविन थत्ते यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ध्यास, परिश्रम, जिज्ञासा, अंतर्मुखता , विज्ञान, श्रद्धा आणि ज्ञानाचा स्पर्श ह्या सात रंगांच्या इंद्रधनुष्याचे चित्र म्हणजे हे पुस्तक. खरे तर ग्रंथच. कारण आकार लहान असला तरी अतर्क जाड्या पुस्तकांपेक्षा इथे समाविष्ट असलेला मजकूर जास्त मौल्यवान आहे. त्यानंतर सर्व दहा लेखांचा आढावा घेऊन त्यांनी त्याचे सविस्तर विवरण केले.'

डॉ. विनीता गजेंद्रगडकर यांनी सर्वांचे आभार मानले.

**ग्रंथाली**




## प्रेमाचं ऋण

**माधवी कवीश्वर**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

माधवी कवीश्वर यांनी लिहिलेल्या 'प्रेमाचं ऋण' या पुस्तकातील आठवणी कृतज्ञतेचे रेखीव दव आहे. ज्यांनी आपल्यावर निरपेक्ष प्रेम केले त्यांच्याविषयीच्या आठवांनी लेखिकेचे मन भरून येते. यामध्ये काही त्यांचे वैयक्तिक अनुभव आहेत. जगताना आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यांवरील काही घटना-प्रसंग लक्षात राहतात. ते वाटचालीचे पुढले मार्ग दाखवणारे काही क्षण विश्रांतीचे थांबे असतात. थांबा जीवनाचे वेगळे प्रत्यंतर देणारा क्षण असतो. तो पकडणे महत्त्वाचे असते. ते यात आहे. यातून लेखनाचे मर्म कवीश्वरांनी सहज जाता जाता सांगितले आहे. ते म्हणजे आपल्या मनाला जे वाटते, ते आपण मनापासून करावे. त्यात आनंद असतो. तो नव्या नव्या कामांना हुरूप देतो. हेच कोणताही आजार बरा करणारे उत्तम औषध असते. ते आपल्यात असते. त्याचा शोध आपला आपल्यालाच घ्यावा लागतो.

या लेखनात काहीसे आत्मकथन आहे. काही समाजात वावरताना आलेले अनुभव आहेत. प्रेमातल्या विविध भावांचे स्व-भावासह चित्रण आहे. छोट्या छोट्या घटनांमधून काही ना काही शिकता येते हा बोध आहे.

**– यशवंत पाठक**

लेखनातून माणूस दिसतो, माणूस कळतो, असं म्हणथात. माधवीताई कवीश्वर या त्यांच्या लेखांतून अशाच पानोपानी दिसत राहतात. लेखन हे माणसांच्या जगण्याचा, विचारांचा, अनुभवाचा एक कोलाज असतो. माधवीताईंच्या संवेदनक्षम मनानं टिपलेल्या अशाच असंख्य अनुभवांचा, सकारात्मक जगण्याचा, रंगीबेरंगी कॅनव्हास म्हणजे 'प्रेमाचं ऋण' हे पुस्तक.


**– आरती कदम**

---

शशिकांत वा. कवीश्वर यांचा 'नामरंगी रंगले' हा लेखसंग्रह विविध विषयांनी नटलेला आहे. विविध प्रसंगांच्या निमित्ताने केलेले हे लेखन आहे. यामध्ये 'भारतीय तत्त्वज्ञान', 'राम आणि रामायण-विविध दृष्टिकोन', 'पतंजलींची योगसूत्रे', 'जीवनविकासासाठी गीतेचे मार्गदर्शन', असे विविध विषय आहेत. 'राम विरुद्ध कृष्ण' हा भावात्मक संवाद आहे. 'तुकोबांचे वैकुंठगमन' ही छोटी नाटिका आहे. 'प्रयत्न की प्रारब्ध' अशा नेहमीच्या विषयावर चर्चा आहे. विविध संतांच्या अभंगांचे गूढार्थ आणि काही पदांचे गूढार्थ आहेत. कबीरांच्या काही दोह्यांचे सविस्तर विवेचन आहे.

या लेखांतून लेखकाने वाचकाशी सुलभ संवाद साधला आहे.

**– यशवंत पाठक**




## नामरंगी रंगले

**शशिकांत वा. कवीश्वर**

ध्यास, परिश्रम, जिज्ञासा, अंतर्मुखता, विज्ञान, श्रद्धा आणि ज्ञानाचा स्पर्श ह्या सात रंगांच्या इंद्रधनुष्याचे चित्र म्हणजे हे पुस्तक किंवा ग्रंथ. खरे तर ग्रंथच कारण आकार लहान असला तरी अतर्क जाड्या पुस्तकांपेक्षा इथे समाविष्ट असलेला मजकूर जास्त मौल्यवान आहे.

**– डॉ. रवीन थत्ते**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

'ऍखादं छान पेंटिंग किंवा एखादं छान शिल्प यांचा काय उपयोग असतो माहीत आहे? दे़ज आर इन्स्पिरेशन फॉर थाउजण्डस् ऑफ पिपल. मे बी फॉर मिलियन्स.' किती छान विचार आहे हा! कुठलीही कलाकृती ही नुसतीच डोळ्यांना, कानांना वा मनाला रिझवणारी नसते, तर प्रेरणेची उर्जा पुरवणारी ती मोठी शक्तीही असू शकते. हा विचार मांडला आहे शिल्पा खेर यांनी. त्या मुळातच इतरांच्या साठी काही आपण केलेच पाहिजे, या ऊर्जेने भारावलेल्या आहेत. ती उर्जा त्यांनी कृतीत आणली आहे. भाग्यश्री फाउंडेशन ही त्यांची संस्था त्या ऊर्जेचे प्रतीक आहे. आणि तिच्या मुळाशी आहे भविष्याचा वेध घेणारा विद्यार्थी. त्याची भरारी, त्याचा उत्कर्ष. शिवाय इतरही अनेक उपक्रम आहेत, ज्यातून केवळ मदतीचा हात नव्हे तर, माणूस समजून घेण्याचे,घडवण्याचे कार्य चालते. याचाच एक भाग म्हणजे त्यांचे साहित्य. आतापर्यंतचे प्रकाशित झालेले त्यांचे साहित्य याची ग्वाही देते.

जस्ट बिलिव्ह

शिल्पा खेर




मुलांच्या ठायी अनेक उपजत गुण असतात, परंतु त्यांची जाणीव त्यांना नसते. ती कुणीतरी करून द्यावी लागते. तिचा विश्वास त्यांच्यात निर्माण करावा लागतो. ते करण्याचे काम मॅगनस व्हाईट करतो. मॅगनस हा एलियन आहे. परग्रहावरून तो आला आहे. तो जगातल्या पाच मुलांची निवड करतो, जी मुले जगातली सगळ्यांत हुशार आहेत. ती जगातल्या वेगवेगळ्या भागातून आलेली आहेत. त्यांच्याकडे असलेली बुद्धिमत्ता, क्षमता, आणि उर्जा ही उच्च कोटीची आहे. ती कशी प्रकट करायची आणि तिच्याशी या मुलाचा परिचय कसा करून द्यायचा, हे महत्त्वाचे कार्य करतो तो मॅगनस. त्यासाठी मजेशीर कल्पकता तो उपयोजतो. प्रत्येक मुलासाठी एक दिवस देतो, स्वप्नातला. आणि स्वप्नात तो कोणते स्वप्न कोणत्या प्रकाराने साध्य करतो, हे इतर मुलांना दाखवतो. किंबहुना इतर मुले ही त्याच्या स्वप्नाचा एक भाग असतात. त्यातून प्रत्येकाला स्वतःची ओळख होते, तशी एकमेकांची देखील होते. त्यातून एक वाक्य उत्स्फूर्तपणे येते, 'आपला टॅलेण्ट दुसऱ्यांना कळण्यापेक्षा महत्त्वाचं आहे आपल्याला स्वतःला त्याची जाणीव असणं, आपल्यावर विश्वास असणं.'

या पाच मुलांची नावे आहेत, समर, जेम्स, लिन्सी, मिसा आणि निक. प्रत्येकाचा देश वेगळा, संस्कृती वेगळी, वर्ण वेगळा, शरीरयष्टी वेगळी, तशी प्रत्येकाची स्वप्ने,ध्येय वेगवेगळी. त्यामुळे जे प्रसंग उभे केले आहेत, ते त्यांना अनुसरून. त्या प्रसंगात तो कसा वागतो, कोणते निर्णय घेतो, त्यापाठी त्याची भूमिका कशी आहे, इतरांसाठी तो काय करू शकतो, स्वतःपेक्षा इतरांची किती काळजी घेऊ शकतो, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यातून बाहेर पडण्याचे त्याचे कसब कसे आहे, हे सारे त्यातून पाहिले जाते, उलगडले जाते. आणि जगातल्या हुशार मुलांपैकी तो एक का आहे, याची ओळख त्यातून करून दिली जाते. त्यातले उदाहरण घ्यायचे तर मिसाचे 'रेस्ट ॲट यूवर होम'चे स्वप्न. ती एक अतिशय सुखवस्तू घरातील मुलगी असूनही अशा ठिकाणी हॉस्पिटल चालवते, एक डॉक्टर म्हणून, जेथे हॉस्पिटल ही संकल्पनाच कुणाला ठाऊक नाही, आणि ती मान्य नाही, अशा अतिशय दुर्गम आदिवासी भागात, अंधश्रद्धेच्या गर्तेत सापडलेल्या भागात. तिथे तिला अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागते, अगदी जिवे मारण्याच्या घटनेपर्यंत. तरीही ती आपले व्रत सोडत नाही. उलट सगळ्यांचा विश्वास संपादन करते. त्यातले एक वाक्य ती सांगते, 'पेशंट जर माझ्याकडे येत नसेल तर मला पेशंटकडे गेले पाहिजे.' आणि लोक तिचे हॉस्पिटल जाळायला निघतात, तेव्हा ती सांगते,'विश्वास ठेवा, इथलं हॉस्पिटल जाळल्यानंतर इथे पुन्हा दुसरं हॉस्पिटल उभं राहील. अधिक नव्या आशा आकांक्षा घेऊन. तुम्हा सर्वांची अधिक जोमाने सेवा करण्यासाठी.'

मुलांचे भावविश्व उभे करणे, ही मोठी अवघड कला आहे. स्वभाव आणि प्रसंग यांची सांगड घालायची हे काम आव्हानात्मक स्वरुपाचे असते. परंतु लेखिकेने, प्रत्येक मुलाचे वेगळेपण त्याच्या वैशिष्ट्यांसह ठळकपणे जपले आहे. त्याला अधिकाधिक उजाळा दिला आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, तो धागा घट्ट गुंफला आहे. पालकांना आपल्या मुलांच्या टॅलेण्टकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असावा, हे या मॅगनसच्या व्यक्तिरेखेतून साकारते, तसे मुलांना स्वतःच्या टॅलेण्टला आपण कसे आकार देऊ शकतो, ते या पाच मुलांच्या व्यक्तिरेखांतून दाखविले आहे. त्यासाठी भाषेकडे अधिक लक्ष द्यावे लागते. आपल्याला जे सांगायचे ते सुलभरीतीने वाचकाला उमगले पाहिजे, याचेही भान लेखिकेने जपले आहे. अलीकडे सर्वच स्तरावर इंग्रजीचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे. चार मराठी वाक्यात दोन इंग्रजी वाक्यांचा समावेश होऊ लागला आहे. ते वास्तव लेखिकेला नजरेआड करणे शक्य नव्हते. त्यामुळेच काही वाक्ये इंग्रजीतून फेरली आहेत. जगातली हुशार मुले म्हटल्यानंतर इंग्रजीला वगळून कसे चालेल?

बालसाहित्यात मुखपृष्ठाचे महत्त्व वेगळे आहे. आतला विषय कोणता आहे, आणि तो जिज्ञासेला पूरक आहे की नाही, हे मुखपृष्ठानेच अगोदर सांगायचे असते. पुंडलिक वझे यांनी मुलांना समोर ठेवून चित्रकलेची काही पुस्तके यापूर्वीच प्रसिद्ध केलेली आहेत. त्यामुळे या पुस्तकातील समर ऊर्फ सिमी या मुलाचे भावविश्व काय होते आणि ते कसे साकारले गेले, याची कल्पना स्पष्ट व्हावी, असेच मुखपृष्ठ त्यांनी तयार केले आहे. छान!

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

'लोकांना नुसता रस्ता दाखवून लोक त्यावर चालत नाहीत. त्यांना दिशा दाखवली पाहिजे, त्यांच्यासोबत चाललं पाहिजे.' 'माझ्या समाजाला कुणाही समोर हात पसरावे लागू नयेत. त्यांना त्यांचे अधिकार कळावेत, आपले अधिकार मिळवण्याची कुवत आणि हिम्मत त्यांच्यात यायला हवी, हे माझं स्वप्न आहे.' 'आपण करत असलेले काम हे केवळ कुणालातरी वाटते म्हणून करायची गोष्ट नाही. हे काम करण्यात आपल्याला आनंद, समाधान मिळते यापलीकडेही ती अधिक जबाबदारीने करायची गोष्ट आहे.'

हे उद्गार आहेत, प्रत्यक्ष समाजात राहून समाजासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे. गाव सुधारणा, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार हमी, ग्रामसभा, लोकाधिकार अशा अनेक क्षेत्रात ग्रामपातळीवर काम करणारे हे कार्यकर्ते आहेत. आपण काही केले पाहिजे, आणि जे करायचे ते मनापासून करायचे, असे हे कार्यकर्ते आहेत. गावपातळीवरील, गावाशी नाळ जोडलेले. आंतरिक तळमळ आणि परिश्रम करायची तयारी असलेले. त्यांचे कार्य कसे चालते, ते करतांना कोणत्या दिव्यातून त्यांना जावे लागले, त्यांच्या कार्याचे फळ कसे आहे आणि व्यक्ति म्हणून या कार्यकर्त्यांची ओळख काय आहे, याचा परिचय देणारे पुस्तक म्हणजे हे 'पंख आणि पंजे' होय.




'कोरो साक्षरता समिती' नावाची संस्था अनेक उपक्रम चालवते. त्यासाठी कार्य करणाऱ्या, कार्याची आवड असलेल्या उत्साही कार्यकर्त्यांची निवड करून त्यांना फेलोशिप देते. आवश्यक ते प्रशिक्षण आणि मार्गदर्शनही देते. अशी फेलो मंडळी आपापल्या गावी, वस्ती वा त्यांच्या समुहात जाऊन काम करतात. यात ज्यांनी उत्तम प्रकारे काम केले आहे, करीत आहेत, अशा बारा कार्यकर्त्यांचा परिचय व त्यांचे कार्य याविषयी या पुस्तकात माहिती दिलेली आहे. लेखक स्वतः याच संस्थेत कार्यरत असल्याने व्यक्ति आणि कार्य यांच्याशी परिचित आहेत. एका अर्थाने ही सगळीच मंडळी सहप्रवासी आहेत.

'मेळघाटची गंगा' या लेखातील गंगा ही बारावी शिकलेली आहे. कोरकू, मराठी हिंदी या भाषा तिला अवगत आहेत. समाजकार्याची आवड असलेली गंगा धाडसी आहे. तिच्या कार्यामुळे ती सरपंच म्हणून निवडली गेली. सरपंच म्हणून वागताना कुणाला पंचायतीच्या कचेरीवर येण्याची गरज भासणार नाही याची काळजी घेते. तिथे दप्तर बुलेटवर असते. स्वतः बुलेट घेऊन ती सगळ्यांच्या मदतीला हजर असते. इतकेच नाही तर, गावात पाणी न सोडणाऱ्या इंजिनिअरचा भ्रष्टाचारी स्वभाव पाहून एक दिवस त्याच्या कानाखाली वाजवायला ती कमी करीत नाही. तिने तिच्या गावाला 'मॉडेल गाव' बनवण्याचा ध्यास घेतला आहे. 'इस्तो' या लेखातील विठ्ठल सोनारवाडी, चंदगड तालुक्यातला. शिक्षणात आपला गाव मागे का असावा, या चिंतेतून त्यावर मात करण्याचा तो चंग बाधतो. शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्याशी बसून या प्रश्नाचे मूळ शोधून काढतो. त्याची वर्गवारी करून उपाय ठरवतो. आज या गावातले पालक मुलांच्या शिक्षणासाठी आग्रही झाले आहेत आणि मुलांनी गावाचे नाव काढायला सुरुवात केली आहे. 'पुढचं पाऊल' मधील बबीता ही उस्मानाबाद जिल्ह्यातील कवेर गावची. पाच लमाण तांडे एकत्रित करून तिथे रेशन दुकान, स्मशानभूमी, ग्रामपंचायत यासाठी पुढाकार घेते. शिक्षणात आपली मुले मागे राहतात कारण त्यांची भाषेची अडचण. त्यांना लमाणी भाषा येते. शिक्षण प्रमाण मराठीतून. त्यामुळे ते समजत नाही. म्हणून शाळेतच जाणे नको. ही समस्या ओळखून ती दूर करण्यासाठी प्रत्येक तांड्यावर 'सांकशाळा' या नावाने मुलांचे वर्ग घेते. कावळा, कोंबडा, मांजर, गाय, डोंगर यांना दोन्ही भाषेत कोणते शब्द आहेत ते समजावून सांगते. यातून मुलांच्या मनातला गोंधळ दूर होतो. मुले शाळेकडे वळू लागतात. वर्गातील मुलांची संख्या आपोआप वाढली. पाच वर्षात १३२ बचतगटांच्या माध्यमातून १८५० महिलांना संघटित केले. शिधापत्र, ओळखपत्र, आधारकार्ड, जातीचे दाखले मिळवून देण्यात ती आघाडीवर असते. 'दशा आणि दिशा' या लेखातील द्वारकाताई 'लोकाधिकार' आंदोलन संघटनेच्या जिल्हा प्रवक्त्या आहेत. पारधी समाजाला गायरानाची शेती मिळावी म्हणून आंदोलन करतातच परंतु त्याचवेळी गावातले वातावरण सलोख्याचे असावे म्हणून प्रयत्न करतात. 'असाध्य ते साध्य, करिता सायास' या लेखातील सूर्यकांत अनेक चळवळीत काम करतो. परंतु त्याचे खरे कार्य आहे ते कोरडी असलेली माण नदी जिवंत करण्याचे. सगळ्यांच्या सहभागातून पाणी अडवण्याचे. भालवडी हे त्यामुळे टँकरमुक्त झाले. 'गावकारभारीण' या लेखातील मंगल कांबळे ही महिला कुटुंबाचे घर केवळ नवऱ्याच्या नावावर न राहता, जोडीने पत्नीच्या नावाचाही त्यात समावेश असावा, यासाठी प्रयत्न करते. ही संयुक्त घर कल्पना पुरुष मंडळींच्या विरोधाला न जुमानता, समजावून ती राबवतात. यात आणखी कुलदीप राठोड, वनिता वाघमारे, महेश माने, शोभा बोलाडे, कबीर बनसोडे सारखे कार्यकर्ते आहेत. या सगळ्यांची माहिती वाचताना लक्षात येते, गावपातळीवर करण्यासारखी किती कामे आहेत. आणि ही कामे करणारी माणसे सुद्धा किती साधी, तरी किती मोठी आहेत. लेखकाने चांगल्याप्रकारे त्यांची ओळख करून दिलेली आहे. एक वेगळे पुस्तक वाचल्याचा आनंद हे पुस्तक देते.

झेप घेणारे पंख धारदार नखे असलेले पंजेही होऊ शकतात, ही सतीश भावसारांची कल्पना आकर्षक, त्यामुळे मुखपृष्ठही आकर्षक झाले आहे.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी होत असलेल्या लेखनाशी वाचक म्हणून आपण बरेचसे परिचित आहोत. एक व्यक्ती म्हणून असलेले बाबासाहेब, समाजधुरीण म्हणून असलेले बाबासाहेब, राजकारण-सामाजिकीकरण आणि वैश्विक विचारकरण म्हणून असलेले बाबसाहेब, असे अनेक पैलू असलेल्या बाबासाहेबांना महामानव का म्हटले जाते, यांचा परिचय आपनास होतो, तो याच लेखनातून. हा परिचय होत असताना अनेक नवे संदर्भ देखील नव्याने आपल्यासमोर उलगडलेले दिसतात. धनंजय कीर, डॉ. नरेंद्र जाधव यांच्यासारख्या अनेक सिद्धहस्त लेखकांचे त्यात असलेले योगदान मोठे आहे. त्यांच्याच पंक्तीला आणखी एक लेखक आहे, योगीराज बागूल. त्यांचे 'आठवणीतले बाबासाहेब' हे पुस्तक आपण या पूर्वीच वाचलेले आहे. त्यात त्यांनी एक वेगळा दृष्टिकोन समोर ठेवला होता, निवडक व्यक्तींच्या अनुभवांचा, ज्या व्यक्तींना प्रत्यक्ष बाबासाहेबांचा दीर्घकाळ सहवास लाभलेला होता. आता बागूल यांनी पुढचे पाऊल टाकले आहे. ते अशाच व्यक्तींचा परिचय आपल्याला करून देत आहेत, ज्यांनी बाबासाहेबांच्या सोबत दीर्घकाळ एकत्रित राहून त्यांचे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. निष्ठा, ध्येय आणि दृष्टिकोन या दृष्टीने सगळ्याच व्यक्ती बाबासाहेबांच्या कार्याशी एकजीव होत्या, मात्र त्या दलितेतर होत्या. या सगळ्यांचे संदर्भ शोधणे, मिळेल तिथून ते प्राप्त करणे, संबंधितांच्या कुटुंबियांशी संपर्क करून त्यांच्या मुलाखती मिळवणे, मोठ्या कष्टाचे परंतु तितकेच मौलिक काम बागूल यांनी केले. त्यातून हा ग्रंथ साकारला गेला, ज्याचे नाव आहे, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी.'

रावबहादूर सीताराम केशव बोले, हे भंडारी समाजातील, मुंबई प्रांताच्या नवीन विधिमंडळात निवडून गेलेले. दलित समाजाची शोचनीय अवस्था दूर व्हावी म्हणून त्यांनी क्रांतीची ठिणगी ठरावी असा ठराव या विधिमंडळात मांडला; सरकारी पाणवठे, विहिरी, धर्मशाळा, न्यायालये, कचेऱ्या, दवाखाने इ. ठिकाणी  दलित वर्गाला मुक्त प्रवेश मिळावा. तो दिवस होता, ४ ऑगस्ट १९२३. गणेशोत्सवात गणेशमूर्तीची पूजा करण्याचा मान दलितांनाही मिळाला पाहिजे म्हणून दादरच्या मंडळाच्या मंडपात ठाण मांडले, नव्हे तो मान मिळविला. या सत्याग्रहात बाबासाहेबांच्या सोबत अनेक नेते होते, त्यात बोले हे एक होते.

नारायण मल्हार जोशी हे तर त्याकाळचे कामगारांचे मोठे नेते. परंतु त्याचवेळी ते बाबासाहेबांचे शिक्षक. सोशल सर्व्हिस लीगचे काम अनेक पातळ्यांवर सुरु होते. ब्रिटिश सरकारच्या मध्यवर्ती सरकारमध्ये दोघेही होते. कामगार परिषदेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर दलित कामगार प्रतिनिधी असावा या प्रयत्नाला यश आले, ते या दोघांच्या प्रयत्नांमुळे.

देवराव विष्णू नाईक हे ब्राह्मण तरीही बाबासाहेबांच्या आणि दलित समाजाविषयी आस्था असलेले. 'समता'  पाक्षिकाची त्यांनी नुसतीच धुरा सांभाळली नाही, तर या चळवळीचा, मोर्च्यांचा, सत्याग्रहाचा वृत्तांत आणि बाबासाहेबांच्या बातम्या व भाषणे यातून देण्यावर त्यांचा भर असायचा. 'बहिष्कृत भारत' चे संपादकत्व त्यांनी भूषविले. त्यांची तळमळ पाहून बाबासाहेब लिहितात, 'माझ्या भावनांशी, जनतेच्या सुखदु:खांशी व त्यांच्या आकांक्षांशी तुम्ही इतके समरस व एकजीव होऊन गेला आहात की तुम्ही आमच्याप्रमाणे जन्मजातीने दलित नाहीत एवढीच तुमच्यात काय ती आमच्यापेक्षा भिन्नता.'

गंगाधर नीळकंठ सहस्त्रबुद्धे यांचा मोठेपणा असा, मनुस्मृतीचे जाहीर दहन करताना, तिचे एकेक पान फाडून अग्नीच्या मुखात सोडताना जे स्वाहाऽचे श्लोक म्हणायचे ते त्यांनी म्हटले होते.

अनंतराव चित्रे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी इंदिराबाई याही महारवाड्यात स्वयंपाकासाठी गेल्या म्हणून त्यांच्या हातची दिवाळीच्या फराळाची ताटे स्वधर्मीयांनी परत केली. हे असे कटू अनुभवही अनेकांच्या वाट्याला आले. परंतु कुणी आपल्या कार्यापासून फारकत घेतली नाही.

यात एकूण अकरा सहकाऱ्यांचा परिचय आहे. हे सहकारी केवळ बाबासाहेबांचे सहकारी होते, म्हणून तेवढाच परिचय करून दिलेला नाही. तर ते त्यांच्या कार्याने कसे श्रेष्ठ होते, त्यांची कौटुंबिक परिस्थिती कशी होती, नंतरच्या राजकारणात ते कसे आणि कुठे राहिले, अशी संपूर्ण माहिती लेखकाने वाचकांच्या समोर ठेवलेली आहे. बाबासाहेबांचे कार्य अनेक पातळीवर चालत असे. त्या सगळ्या पातळ्यांवर हे सहकारी प्रसंगी कसे सहभागी असत, याची माहिती मिळते तशी ते प्रसंग कसे घडले, यांचीही माहिती यात दिलेली आहे. या प्रसंगांना स्थळ आणि दिनांकांची जोड दिल्याने त्यांचे संदर्भमूल्य वृद्धिंगत झाले आहे. बाबासाहेबांचे चरित्र, त्यांचे कार्य आणि या सर्व सहकाऱ्यांचे कार्य व चरित्र अशी सुरेख सांगड लेखकाने घातलेली आहे, तीही तितक्याच चांगल्या ओघवत्या शैलीत.

योगीराज बागूल यांनी नमूद केल्याप्रमाणे हा पहिला खंड आहे. दुसऱ्या खंडाची उत्सुकता लावणारा हा खंड आहे. मुखपृष्ठाची कल्पना त्यांचीच आहे, तरी तिला सजवण्याचे सतीश भावसारांचे कौशल्य तितकेच सुंदर आहे. त्या फोटोत कोणकोण सहकारी आहेत, त्यांची नावे आतल्या पृष्ठावर दिलेली आहेत. त्यावरूनच सहकाऱ्यांच्या सहभागाची कल्पना स्पष्ट होते.

**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**

## 'प्रेमाचे ऋण'
## आणि
## 'नामरंगी रंगले'
## पुस्तक प्रकाशन


डॉ. स्नेहलता देशमुख


प्रा. म.वि. केळकर


आरती कदम


डॉ. विकास कवीश्वर


डॉ. चारुता कवीश्वर


शशिकांत कवीश्वर


माधवी कवीश्वर




माधवी कवीश्वर लिखित 'प्रेमाचे ऋण' आणि शशिकांत कवीश्वर लिखित 'नामरंगी रंगले' या पुस्तक प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, अरुण शेवते, शशिकांत कवीश्वर, माधवी कवीश्वर, डॉ. स्नेहलता देशमुख, प्रा. म.वि. केळकर आणि आरती कदम



RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.


## ऑफबीट भटकंतीचा १३ वर्षांचा प्रवास

### लेह लडाख



०१ जून: सिंधू फेस्टीव्हल स्पे — ११ जुलै : हेमीस फेस्टीव्हल स्पे
२५ जुलै : कारगील विजय दिन स्पे — १२ ऑगस्ट : स्वातंत्र्य दिन स्पे
१४ ऑगस्ट : रक्षा बंधन स्पे — १७ सप्टेंबर : लडाख फेस्टीव्हल स्पे

इतर तारखा : २३ मे, ३० मे, २२ जून, ०४ जुलै, २१ ऑगस्ट

### केनिया-टांझानिया



१९ मे, २ नोव्हेंबर
मायग्रेशन स्पेशल : ८ जुलै, ५ ऑगस्ट, ४ सप्टेंबर

### स्कॅन्डीनेव्हिया
स्विडन - नॉर्वे - फिनलँड



मिडनाईट सन : २१ जून
नॉर्थन लाईटस् : १५ डिसेंबर

### किन्नौर स्पिती
हिमाचल



२१ ऑगस्ट, १६ सप्टेंबर

### श्रीलंका
व्हेल वॉचिंग सह



२ नोव्हेंबर

### आसाम-अरुणाचल-मेघालय



२० एप्रिल
हॉर्नबील फेस्टीव्हल २१ नोव्हेंबर

### भूतान



१९ मार्च, १६ एप्रिल,
३० एप्रिल, १४ मे

### टर्की



२१ ऑगस्ट, २४ सप्टेंबर

### साऊथ आफ्रिका



८ ऑक्टोबर

### न्यूझिलंड



३ नोव्हेंबर

वाईल्ड लाईफ व बर्डींग : ग्रेटर आणि लिटील रण ऑफ कच्छ, ताडोबा, सातताल पँगोट, रणथंबोर, भरतपूर
फॅमिली टूर्स : अंदमान, केरळ, काश्मिर, उत्तरांचल, हिमाचल, सिक्कीम, राजस्थान, ओरिसा

isha tours®
Lets explore the world...

मुख्य कार्यालय : १/ए, मुरलीधर को-ऑप. सोसायटी, ब्राह्मण सोसायटी, गोखले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ०२२-२५४३७४७०
दादर : ९३२००३१९१० बोरिवली : ९३२४५३१९१० पुणे : ९३२०१३१९१० लेह : ९३२०२३१९१०
Email : Info @ishatours.net ✆ 8080144000 Website: www.ishatours.net


मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.